# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

दिनांक २५-०१-१९८९ ते २१-०३-१९८९

रजि. क्र. ०३

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २५-१-८९ रोजी बुधवार दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समितीचा इतिवृत्तांत बुधवार, दिनांक २५-१-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी व खालिल स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. अलफ खॉ हुसेन खाँ
२) श्री.इकबालसिंग प्रितमसिंग गिल
३) श्री.मिर्झा अन्वरबेब हमीदबेग
४) श्री.यादव अशोक सायन्ना
५) श्री.अजितकुमार शेळके
६) श्री.मोरेश्वर दिनानाथ सावे
७) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
८) श्री.कचरू चंद्रभान नवपूते
९) श्री.स.अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१०) श्री.हुसेन स.अहमद

**विषय क्र.: ८३१**

दिनांक १८ जानेवारी ८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

स.सभासद श्री.यादव अशोक सायन्ना यांनी सुचविले की, मागील सभेत मी वॉर्ड क्र.१ च्या मंजुर झालेल्या कामाबाबत सविस्तर माहिती देण्याची मागणी केली होती. तेव्हा त्यावर खुलासा करावा. सध्या वॉर्ड क्र.१ मध्ये चालु असलेल्या गटारीचे कामावर वापरण्यात येणाऱ्या हाफ राऊंड गटारी चांगल्या प्रकारच्या नसून अनेक हाफ राऊंड गटारी तुटलेल्या आहेत. व त्याच गटारी साईटवर बसविण्यात येत आहेत. तेव्हा चांगल्या प्रकारचा माल (साहित्य) वापरण्यात यावे. पडेगांव येथील शाळेचे बांधकाम नकाशाविरूध्द चालु असल्याचा खुलासा मी मागील सभेत केला होता. याबाबत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा. यावर खुलासा करतांना कार्यकारी अभियंता यांनी पाणी पुरवठा / जलनिस्ससारण / स्लम विभागातर्फे या वॉर्डात चालु असलेल्या कामाची लेखी माहिती स. सभासद श्री.यादव अशोक सायन्ना आणि सभागृह यांना दिली, आणि कामावर वापरण्यात येणारे हाफ राऊंड गटारीची चाचणी करून देण्यात येईल असे सुचविले. तसेच पडेगांव शाळा बांधकामाबाबत खुलासा करतांना शहर अभियता म्हणाले कि, शाळेभोवती असलेली कंपाऊंड तात्पुरत्या स्वरूपाची होती. त्या ठिकाणी खाजगी मालकीची जागा असल्याची बाब लक्षात घेवून शाळेसाठी तयार केलेल्या नकाशातील एक रूमचे बांधकाम, कमी करून अल्प बांधकाम सुरूवात केली आहे. यावर खुलासा करतांना मा. सभापती म्हणाले कि, स.सभासदांनी संबंधित नागरिकांबरोबर चर्चा करून शाळेस सदर जागा मिळविण्याचा प्रयत्न केला.

कार्यालयासाठी आवश्यक असलेले ए.सी.प्रेशर पाईप सी.आय.डी.जॉईंट्स खरेदी बाबतच्या ठरावावर मा. आयुक्त टिप्पणी कार्यकारी अभियंता सभागृहाला वाचून दाखवित

असे. स. सभासद श्री.मोरेश्वर सावे, श्री.अलफ खॅा हुसेन खॉ , श्री.मिर्झा अन्वर बेग आणि श्री.मोतीराम घडामोडे यांनी तसा आक्षेप घेवून सुचविले कि, स्थायी समितीने मंजुर केलेल्या ठरावावर नंतर अशा प्रकारे टिप्पणी करणे योग्य नव्हते. तेव्हा समितीने मंजूर केलेला ठरावच कायम कराण्यात यावा. स्थायी समिती महापालिकेच्या आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी असते. पाईप खरेदीचा ठराव दिनांक १८-१-८९ च्या सभेत प्रशासनातर्फे ऐनवेळी ठेवण्यात आला होता. तेव्हा समितीने या विषयावर घेतलेला निर्णय कायम ठेवण्यात यावा. यावर खुलासा करतांना मा. आयुक्त यांनी सूचविले कि, एम.एस.एस.आय.डी. ही शासन अंगिकृत संस्था आहे व प्राप्त दरपत्रकामधून एम.एस.एस.आय.डी.सी. यांचे दरपत्रकाची शिफारस केली आहे. मे.हैद्राबाद इंडस्ट्रीज लि. हैद्राबाद यांनी मिटींग झ ााल्यानंतर सुट देण्याचे पत्र दिले आहे. या सर्व बाबींचा विचार करून मत दिले आहे. हैद्राबाद कंपनीकडून मागील वर्षीही २२ लाखाचे पाईप मागविण्यात आले होते. त्यावेळी अशी सुट मिळालेली नाही यावर खुलासा करताना स. सभासद श्री.मोरेश्वर सावे, श्री मोतीराम घडामोडे, हुसेन खॉ व श्री.मिर्झा अन्वर बेग म्हणाले की, हैद्राबाद कंपनीकडून मागविण्यात आलेल्या गतवर्षीच्या पाईप खरेदी वरील सुट हस्तगत करावयाची कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक होते. ती सुट मिळणे आवश्यक आहे. चारमिनारचे पाईप मजबूत असल्यामुळे खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. हैद्राबाद इंडस्ट्रीज लि.हैद्राबाद यांच्याकडून मॉडरेट सूट मिळण्याबाबत लेखी संमती आहे. या बाबीचा विचार करून ठराव क्र.८२९ दुरूस्ती सह मंजुर करता येईल.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले कि, ठराव क्रमांक ८२९ मध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्ती करण्यासह मे.हैद्राबाद इंडस्ट्रीज लि.हैद्राबाद यांचेमार्फत खालील दर्शविलेले पाईप त्या समोरील दरात आणि शासनाकडून मिळणारी सुट आणि आर्थिक फायदा लक्षात घेवून खरेदी करण्यास सर्वानुमते खालील अटींवर मंजूरी देण्यात येते.

गेल्या वर्षी हैद्राबाद इंडस्ट्रीज लि.हैद्राबाद यांचेकडून खरेदी केलेल्या पाईपवरील शासनाकडून मिळणारी सूट आणि आर्थिक फायदा (मॉडरेट) यांचा परतावा महापिालकेस करण्यास राजी असल्यासच ही ऑर्डर वरील कंपनीस देण्यात यावी.

वरील कंपनीस ही अट मान्य नसल्यास मे.एम.एस.एस.आय.डी.सी.यांना ऑर्डर देण्यात यावी. व दुरूस्तीसह दिनांक १८-१-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.८३२ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वॉर्ड क्र.४९ मधील पंचशीलनगर ते नाथनगर अशी १०० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या रक्कम रू.२२,३१०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२०० दिनांक ११-८-८८ अन्वये मंजूरी मिळाली आहे. मनपा / पापु/७००/८८ दिनांक २३-८-८८ अन्वये पाईपसह सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा पत्रके प्राप्त झाली.

१) श्री.अर्शद नोमी ३०.१% जास्त दराने

२) श्री.पॉल कन्ट्रक्शन्स ३५.१०% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया ठेकेदार श्री.अर्शद नोमी यांची निविदा कमी दराची आहे. मा. आयुक्तांच्या दिनांक २८-१०-८८ रोजीच्या आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी पाईप व इतर

साहित्य वगळता मनपा/पापु/५३४/८८ दिनांक ५-११-८८ अन्वये फेरनिविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | परदेशी वासूद्रव इंटरप्राईजेस | ०.१०% कमी दराने |
| २) | अर्शद नोमी | १०.२०% जास्त दराने |
| ३) | के.बी.काल्डा | ११.०५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ठेकेदार परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांची असून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराची आहे. करीता विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील पंचशीलनगर ते नाथनगर अशी १०० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्या सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८३३ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.५२ मधील पगारीया कॉलनी उमाजी कॉलनी , व बन्सीलालनगर येथे ८० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाच्या रक्कम रू.२२,३००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२०६ दिनांक ११-८-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा / पापु/७००/८८ दिनांक २३-८-८८ अन्वये सदरील कामासाठी जाहिररित्या निविदा मागविण्यात आल्या असता.(पाईपसह) खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | सजनानी कन्सट्रक्शन्स | १७% जास्त दराने |
| २ | अे.अे.अबेदी | १८.०५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा सजनानी कन्सट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची आहे. यानंतर मा. आयुक्तांच्या दिनांक २२-११-८८ च्या आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी पाईप वगळता मनपा/पापु/५३४/८८ दिनांक ५-११-८८ अन्वये फेरनिविदा मागविण्यात आल्या असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली असून ती ठेकेदार श्री.अे.अे.अबेदी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४४% कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५२ मधील पगारीया कॉलनी, उमाजी कॉलनी व बन्सीलालनगर येथे ८० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री. अे.अे.अबेदी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्ष ०.४४% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८३४ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.११ मधील सेक्टर एन -११ एच ब्लॉक क्र.१४,१५,१६, व १७ सिडको येथील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी ८०,१०० व १५० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रू.३६,६००/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.१९ दिनांक २९-६-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा/पापु/६६०/८८ दिनांक १६-८-८८ अन्वये जाहिररित्या निविदा मागविण्यात आल्या

असता एकच निविदा प्राप्त झाली होती व ती ठेकेदार श्री. पी.बी.पवार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५० कमी दराची आहे. ठेकेदार श्री.पी.बी. पवार यांनी दिनांक ११-१०-८८ रोजी अर्ज देवून सदरील कामासाठी त्यांनी दाखल केलेली निविदा रदद् करावी अशी विनंती केली होती. त्यानंतर मा. आयुक्तांच्या दिनांक २४-१०-८८ रोजीच्या आदेशान्वये पाईप व इतर साहित्य वगळता जाहिररित्या फेरनिविदा मनपा/पापु/५३४/८८ दिनांक ५-११-८८ अन्वये मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदरील काम तातडीचे असल्याकारणाने उपलब्ध गुत्तेदारामार्फत करून घेण्याचे ठरले.

तीन गुत्तेदारांना कोटेशन मागितले असता खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.बी.एम.काथार | २.१०% कमी दराने |
| २ | श्री.टेकचंद | २% कमी दराने |
| ३ | श्री.अर्शद नोमी | १ % कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ठेकेदार श्री.बी.एम.काथार यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१० % कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११ मधील सेक्टर एन-११ (एच) ब्लॉक क्र.१४,१५,१६ व १७ सिडको येथील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी ८०,१०० व १५० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.१०% कमी दराची श्री.बी.एम. काथार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८३५ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.१२ मधील कटकट गेट जवळील युनुस कॉलनी मध्ये पिणाच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी ८० एम.एम.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या र.रूपये २७,७६५ च्या अंदाजत्रकास ठराव क्र.५८७/३३ दिनांक २४-११-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे.

सदरील कामामध्ये साहित्याची किंमत र.रू.१९,६००/- एवढी होते व निव्वळ मंजूरीची र.रू.६,७७१/- एवढी होते. सदरील काम तातडीचे असल्यामुळे निविदा न मागविता अ-१ नमुन्यावर अंदाजपत्रकीय दरावर उपलब्ध गुत्तेदार श्री.सय्यद तौफिक अहमद यांचेमार्फत करून घेण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१२ मधील कटकट गेट जवळील युनूस कॉलनी मध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेसाठी ८० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी व सदरील काम तातडीचे असल्यामुळे निविदा न मागविता "अ-१" नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने उपलब्ध गुत्तेदार श्री.सय्यद तौफिक अहमद यांचेमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय ८३६ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.११ मधील सिडको, गुलमोहर कॉलनी साठी १५० मी मी व्यासाची ए.सी. पाईप लाईन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.७१,८००/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११ मधील सिडको गुलमोहर कॉलनीसाठी १५० मी मी व्यासाची ए.सी.पाईप लाईन टाकण्याच्या कामाकरीता रक्कम रू.७१,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.८३७ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.१८ मधील किलेअर्क दरवाजे ते सिटीचौक पोलिस स्टेशन चौक पर्यंत १५० मी मी व्यासाची ए.सी.पाईप लाईन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.७१,०००/- चे असून अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१८ मधील किलेअर्क दरवाजा ते सिटीचौक पोलीस स्टेशन पर्यंत १५० मी मी व्यासाची अे.सी.पाईप लाईन टाकण्याच्या कामासाठी रक्कम रू.७१,०००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय ८३८:**

वॉर्ड क्र.४४ मोहल्ला शिवाजी को-ऑप.हौसिंग सोसायटी येथील गणपती मंदिरासमोरील सखल भागातील पावसाचे व सांडपाणी काढण्याकरीता गटार बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.६,२४५/-ला स्थायी समिती ठराव क्र.७ दिनांक २१-९-८८ द्वारे मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/८३०७/८८ दिनांक २२-११-८८ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा विकण्यात आल्या असता एकूण नऊ निविदा विकण्यात आल्या व केवळ सात निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एच.डी.कटारीया | ११.१७% कमी |
| २) | श्री. संतोष पगारे | ६.२५% कमी |
| ३) | प्रविण मजूर सहकारी संस्था | ११.७६% कमी |
| ४) | श्री.के.बी.काल्डा | १५.९% कमी |
| ५) | श्री.बी.एम.काथार | १२.०% कमी |
| ६) | श्री.आर.बी.चव्हाण | २१% कमी |
| ७) | श्री.उत्तम सरोदे | १२% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २१% कमी दराचे श्री. आर. बी. चव्हाण यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४ मोहल्ला शिवाजी को-ऑप.हैासिंग सोसायटी येथील गणपती मंदिरासमोरील सखल भागातील पावसाचे व सांडपाणी काढण्याकरीता गटार बांधण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २१% कमी दराचे श्री.आर.बी.चव्हाण यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय ८३९**

वार्ड क्र.५८ चैतन्य को-ऑप.हौसिंग सोसायटी येथे १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यू.जी.ड्रेनेज लाईन टाकणे व सेप्टीक टँक बांधण्याच्या कामासाठी र.रू.१,५७,६००/-

च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.८ दिनांक २२-९-८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/८३०७/८८ दिनांक २२-११-८८ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १० निविदा विकण्यात आल्या असून केवळ सात निविदा वसूल झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पी.जे.तमखाने | ९.७७% कमी |
| २) | श्री. ए.एन.काल्डा | १३.९% कमी |
| ३) | श्री.एस.बी.इंगळे | १७.७६% कमी |
| ४) | आनंद बिल्डर्स | १९.६% कमी |
| ५) | श्री.कुलवंत सिंग | १०% जास्त |
| ६) | पॉल कन्स्ट्रक्शन्स | ९.९% कमी |
| ७) | एन.जी.गुणवानी | १३.७८% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.६ % कमी दराचे श्री.आनंद बिल्डर्स यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५८ चैतन्य को-ऑप.हौसिंग सोसायटी येथे १५० मी.मी.व्यासाची एस.डब्ल्यू.जी.ड्रेनेज लाईन टाकणे व सेप्टीक टँक बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.६% कमी दराचे श्री.आनंद बिल्डर्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय ८४० :**

झोन क्र.३ व वॉर्ड क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी १५० मी मी व्यासाची एस.डब्ल्यू जी.ड्रनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.१,१०,८५०/- ला स्थायी समिती ठराव क्र.२६ दिनांक २१-९-८८ द्वारे मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/८३०७/८८ २२-११-८८ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आल्या व केवळ चार निविदा वसूल झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.एन.जी.गुणवाणी | ११.११% | कमी |
| २) | श्री.कुलवंतसिंग | ९% | जास्त |
| ३) | श्री.आनंद बिल्डर्स | १४.६% | कमी |
| ४) | श्री.हबीब खान | १८.५ % | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.५% कमी दराचे श्री.हबीब खान यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ मध्ये विविध ठिकाणी १५० मी मी व्यासाची एस.डब्ल्याू.जी. ड्रेनेज लाईन टाकणे करीता तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १८.५% कमी दराचे श्री.हबीब खान यांचे दरपत्रकास सर्वांनुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.८४१ :**

वॉर्ड क्र.६० येथील चिकलठाणा प्रा.शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २४-११-८८ठराव क्र.५६९ अन्वये र.रू.६३,२८५/- चे अंदाजपत्रकास

सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.९/८८-८९ दिनांक ५-१२-८८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तेरा निविदा मागविण्यात आल्या होत्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण १३ तेरा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सय्यद तौफिक अहेमद | २९.७८६% कमी दराने |
| २) | श्री.बाबासाहेब गायकवाड | २५.५% कमी दराने |
| ३) | श्री.हबीब खान | २१% कमी दराने |
| ४) | श्री.रविंद्र सिंग | १८.९०% कमी दराने |
| ५) | विपूल कन्स्ट्रक्शन | १६% कमी दराने |
| ६) | श्री.बी.ए.काल्डा | १५.९९% कमी दराने |
| ७) | श्री.एस.ए.नवाब | १५.१५% कमी दराने |
| ८) | श्री.संजय वामनराव रोकडे | १३ % कमी दराने |
| ९) | एस.एच.असोसिएट्स | २० % कमी दराने |
| १०) | श्री.एच.डी.कटारीया | १३.७८६ % कमी दराने |
| ११) | श्री.पी.जे.तमखाने | १२.२२ % कमी दराने |
| १२) | श्री.पुरूषोत्तम मंत्री | ९.९ % कमी दराने |
| १३) | श्री.एस.बी.इंगळे | निरंक |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.७८६ % कमी दराची श्री. तौफिक अहमद यार्ची निविदा आहे. सदरचे दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा फारच कमी दराचे असल्यामुळे व सदरचे काम गुत्तेदार निविदा शेडयूला प्रमाणे कसे करणार यासाठी कार्यालयीन प.क्र.जा.क्र./मनपा/बांध-२/१०७०/८८ दिनांक २२-१२-८८ अन्वये रेट अनालिसीस करीता पत्र दिले असता सदर गुत्तेदाराने दिनांक २६-१२-८८ अन्वये लेखी कळविले कि, त्यांच्याकडे जे मजूर काम करतात ते दैनिक वेतनाचे नसून मासिक वेतनाचे आहेत. तसेच स्वत:ची आहे त्यामुळे सदरचे काम त्यांना परवडते. सबब सदर कामाची २९.७८६ कमी दराची जी सय्यद तौफिक अहेमद यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६० येथील चिकलठाणा प्रा.शाळेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.७८६% कमी दराची श्री.तौफिक अहेमद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र८४२ :**

वॉर्ड क्र.६० येथील बीड रोडवरील जकात नाक्यासमोर खडी रस्ता कन्व्हेटसह तयार करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५१८ दिनांक १७-११-८८ अन्वये र.रूपये १,४३,५३७/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी दिनांक ५.१२.८८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक १६.१२.८८ ला उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सुखबीरसिंग | २९.१०% कमी दराने |
| २) | श्री.एस.एच.असोसिएट्स | २५.७% कमी दराने |
| ३) | श्री.एस.जी.शहा | २४.३% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ४) | श्री.रविंद्रसिंग | २३.९% कमी दराने |
| ५) | श्री.पी.जे.तमखाने | २३.७९% कमी दराने |
| ६) | श्री.एस.ए.नवाब | २१.१०% कमी दराने |
| ७) | श्री.बी.ए.काल्डा | १७.५९% कमी दराने |
| ८) | श्री.एच.डी.कटारिया | निरंक दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.१०% कमी दराची श्री.सुखबीरसींग यांची निविदा आहे. सदरचे दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा फारच कमी असल्यामुळे कार्यालयीन प.क्र.मनपा/बांध-२/१०७१/८८ दिनांक ३१-१२-८८ अन्वये कळविले कि, त्यांचेकडे स्वत:चे चार ट्रक्स असून स्वत:ची खदान आहे. तसेच लेबर देखील स्वत:चेच आहे. म्हणून त्यांना सदरचे काम परवडते. सबब सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.१० % कमी दराची श्री. सुखबीरसींग यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ६० येथील बीड रोडवरील जकात नाक्यासमोर खडी रस्ता कल्व्हर्टसह तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.१०% कमी दराची श्री. सुखबीरसींग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ८४३:**

वॉर्ड क्र.९ येथील ब्रिजवाडी प्रा.शाळेस विद्युतकरणाचे कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १४-१२-८८ ठराव क्र.६७५ अन्वये रक्कम रू. १२,७६५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना दिनांक १५-१२-८८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पांच निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक २९-१२-८८ ला उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ४% | जास्त दराने |
| २) | मे.इगल इलेक्ट्रीकल्स | ७.५ % | जास्त दराने |
| ३) | मे.शांती इलेक्ट्रीकल्स | १०% | जास्त दराने |
| ४) | मे.पाठक इलेक्ट्रीकल्स | ९% | जास्त दराने |
| ५) | मे.रिगल इलेक्ट्रीकल्स | ११% | जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% दराची मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांची निविदा आहे. सदरचे अंदाजपत्रकाचे दर हे ८६-८७ चे असल्यामुळे आणि ८८-८९ चे दरापेक्षा २०% कमी दराचे आहे. सबब दराची तफावत लक्षात घेता सदर कामासाठी मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांची ४% जास्त दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकाखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९ येथील ब्रिजवाडी शाळेचे विद्युतीकरणाच्या कामासाठी सन १९८६-८७ च्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक तयार केले असल्यामुळे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४% जास्त दराची ( म्हणजेच

सन १९८८-८९ चे डी.एस.आर.दरापेक्षा २०% कमी दराची) मे लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ८४४:**

वॉर्ड क्र.५१ येथील पदम्पूरा येथे फायर स्टेशन बिल्डींगच्या आवारात (अ) खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सा.बा.खात्याचे डी.एस.आर.दराने र.रूपये ४०,५९३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचे काम पद्मपूरा येथील अग्निशामक विभागासाठी मोटार गॅरेज, कंट्रोल रूम व कार्यालयीन इमारत या कामाच्या स्थापत्य कामातून (सिव्हील वर्क्स) झालेल्या बचतीमधून करावयाचे आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.७,४४,७२०/- ला ठराव क्र.२८१ दिनांक २८-७-८७ नुसार प्रशासकीय मान्यता मिळालेली असून ठराव क्र.५४४ दिनांक १९-१०-८७ अनुसार सदर काम करणेच्या एजन्सीस मिळालेली आहे. सदर कामावर एकूण र.रू.९६,०००/- ची बचत होत आहे.

(ब) सदर कामाची गरज असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.मझरूल हक यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास्तव व अंदाजपत्रक र.रू.४०,५९३/- चा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद** :

अग्निशामक दलाचे कार्यलक्षात घेता, या कार्यालयात कमतरता असलेल्या सर्व बाबींबाबत एकच प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यात यावा अशी उपसुचना स. सभासद श्री.मोरेश्वर सावे यांनी केली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५१ येथील पद्मपूरा येथे फायर स्टेशन बिल्डींगच्या आवारात खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.४०,५९३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सदरचे कामाची गरज असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.मझहल हक यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.८४५:**

वॉर्ड क्र.२ येथील बेगमपूरा प्राथमिक शाळेसाठी इमारतीमध्ये तीन खोल्या (वाढीव) बांधकाम करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २६-१०-८८ ठराव क्र.४९५ प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.३,२८,४६०/- ला मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.८/८९००/८८ दिनांक २२-१२-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण आठ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक १२-१-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एस.एच.असोसिएट्स | ५% जास्त |
| २) | श्री.पाल कन्सट्रक्शन | ११.११ % कमी |
| ३) | श्री.जी.एम.बालचंदानी | ३.७८६ % जास्त |
| ४) | श्री.कुलवंत सिंग | ५% जास्त |
| ५) | श्री.मझहल हक्क | ४% जास्त |

| | | |
|---|---|---|
| ६) | श्री.एस.ए.नवाब | ९% जास्त |
| ७) | श्री.एन.जी.गुणवानी | ९.९ % कमी |
| ८) | श्री.अजितसिंग | ४.९९ % जास्त |

वरील पैकी अ.क्र.२ श्री.पॉल कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकापेक्षा ११.११ % कमी व तुलनात्मकदृष्टया कमी आहेत. विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२ येथील बेगमपूरा प्राथमिक शाळेसाठी इमारतीमध्ये तीन खोल्या (वाढीव) बांधकाम करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.११% कमी दराचे श्री.पॉल कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८४६:**

मांडकी येथील ट्रेंचिंग ग्राऊंडवर खडी रस्ते तयार करणे व गडडे् खोदणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २१-१०-८८ ठराव क्र.४८१ नुसार अंदाजपत्रक र.रू.४,२४,३००/- ला मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.८/८९००/८८ दिनांक २२-१२-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक १२-१-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.जी.एम.बालचंदानी | ०.१% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) | श्री.कुलवंतसिंग | १०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) | श्री.डी.अजितसिंग | ४.९% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | श्री. एस.एच.असोसिएट्स | २२.५५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५) | श्री.एस.ए.नवाब | ८ % जास्त |
| ६) | श्री.एन.जी.गुणवाणी | १६ % अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ७) | श्री. मझऊल हक | ५% जास्त |
| ८) | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | २१% जास्त |
| ९) | श्री.एल.एम. चचलानी | ६% जास्त |

वरीलपैकी अ.क्र.४ श्री.एस.एच.असोसिएटस् यांचे दर अंदाजपत्रका पेक्षा २२.५५% कमी व तुनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मांडकी येथील ट्रेंचिंग ग्राऊंडवर खडी रस्ते तयार करणे व गडडे् खोदणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अहंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.५५% कमी दराची श्री.एस.एच.असोसिएटस् यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८४७**

वॉर्ड क्र.८ हर्सूल येथील जुन्या ग्रामपंचायतीच्या इमारतीच्या दुरूस्ती व वाढ करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १७-११-८८ ठराव क्र.५१४ नुसार अंदाजपत्रक र.रू.५४,७४०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन

निविदा क्र.८ /८९००/८८ दिनांक २२-११-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १२-१-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारांसमक्ष उघडयात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.संजय पी.सरवदे | ५ % जास्त |
| २) | श्री.सईइ रफीकद्यीन | ०.५०% कमी |
| ३) | श्री.जी.एम.बालचंदानी | ४.७८६ % जास्त |

वरील पैकी अ.क्र.२ श्री.सईद रफीकउद्यीन यांचे दर अंदाजपत्रकापेक्षा ०.५०% कमी व तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८ हर्सूल येथील जुन्या ग्रामपंचायतीच्या इमारतीची दुरूस्ती व वाढ करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ०.५०% कमी दराचे श्री. सईद रफीकद्यीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय ८४८ :**

वॉर्ड क्र.६ येथील फाजलपूरा क्वॉर्टरची दुरूस्ती करण्याचे कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ३०-११-८८ ठराव क्र.६०४ नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये १,०३,५८०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कर्यालयीन निविदा क्र.८/८९००/८८ दिनांक २२-१२-८८ नूसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १२-१-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमोर उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अब्दुल सत्तार | १४.७८६% कमी |
| २) | श्री.अंबादास इंगळे | १५% कमी |
| ३) | श्री.सलिम अहेमद | १९.५ % कमी |

वरील अ.क्र.३ श्री.सलिम अहेमद यांचे दर अंदाजपत्रकापेक्षा १९.५% कमी व तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६ येथील फाजलपूरा क्वार्टरची दुरूस्ती करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा १९.५% कमी दराचे श्री.सलिम अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८४९ :**

वॉर्ड क्र.१३ येथील मकसूद कॉलनी व मुजीबकॉलनी अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २४-११-८८ ठराव क्र.५२४ नुसार अंदाजपत्रक र.रूपये ३,७०,०००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.८/८९००/८८ दिनांक २२-१२-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ९(नऊ) निविदा दर मला प्राप्त झाल्या त्या दिनांक १२-१-८९ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एल.एम. चचलानी | ६%अंदाजपत्रकापेक्षा कमी |

| | | |
|---|---|---|
| २) | श्री.एम.जी.गुणवाणी | १६%अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) | श्री.एस.एस.नवाब | १८%अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | श्री.मझरुल हक्क | ४%अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५) | पॉल कन्सट्रक्शन | १५%अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ६) | श्री.कुलवंतसिंग | ९%अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ७) | डी अजितसिंग | ४.९९%अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ८) | श्री.एस.एच.असोसिएट्स | १९.३ %अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ९) | श्री.जी.एम.बालचंदानी | ०.१० %अंदाजपत्रकापेक्षा कमी |

वरील पैकी अ.क्र.८ श्री.एस.एच असोसिएटस् यांचे दर अंदाजपत्रकापेक्षा १९.३ %अंदाजपत्रकापेक्षा कमी व तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ येथील मकसुद कॉलनी व मुजीब कॉलनी अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.३% कमी दराचे श्री. एस.एच.असोशिएटस् यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५० :**

वॉर्ड क्र.६ येथील उद्यानाजवळ मुत्री बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ५-१०-८८ (ठराव क्र.३९१) नुसार अंदाजपत्रक र.रू.११,६८०/- ला मंजुरी प्राप्त झ्झालेली आहे. सदर कामासाठी कार्याल्यीन निविदा क्रमांक ८/८९००/८८ दिनांक २२-१२-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक १२-१-८९रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संजय पी सरवदे | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| २) | सईद रफिकउद्यीन | १% जास्त |

वरील पैकी अ.क्र.१ श्री. संजय पी. सरवदे यांचे दर अंजदाजपत्रकाप्रमाणे व तुलनात्मकदृष्टया कमी आहेत. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६ येथील उद्यानाजवळ मुत्री बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दराचे श्री.संजय पी सरवदे यांचे दरत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५१ :**

वॉर्ड क्र.येथील पडेगांव येथे समाजमंदिर बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी सिमती दिनांक ५-१०-८८ विषय क्र.३९२ नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये १,०९,३३०/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा क्र.८/८९००/८८ दिनांक २२-१२-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा मागविण्यात आल्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक १२-१-८९

रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.संजय पी सरवदे | १०% | कमी |
| २) | श्री.जी.एच.बालचंदानी | १.७८६% | जास्त |
| ३) | श्री.अब्दुल सत्तार | ११.७८६ % | कमी |

वरील पैकी अ.क्र.३ श्री.अब्दुल सत्तार यांचे दर तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकापेक्षा ११.७८६% कमी आहेत. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१ येथील समाजमंदिर बांधणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकापेक्षा ११.७८६% कमी दराचे श्री.अब्दुल सत्तार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५२ :**

उप अभियंता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.७ मी सिध्दार्थनगर स्लम भागात खडी रस्ता व खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी दिनांक २१-९-८८ च्या ठराव क्र.१५ अन्वये स्थायी समितीची मंजूरी मिळाल्यानंतर प्रकट निवेदनाद्वारे निविदा मागविल्या असता खालील तीन निविदा दाखल दिनांकास प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अे.के.थोरात | २१% कमी |
| २) | श्री.कुलवंतसिंग | १७% कमी |
| ३) | श्री.आर.एस.अडणे | १५ % कमी |

सर्वात कमी दराची निविदा श्री.अे.के.थोरात यांची होती परंतू त्यांनी पत्र देवून खुलासा केला की, वरील दर नजर चुकीने पडले असून त्यांनी २% कमी दर भरलेले आहेत.

दुसरी निविदा श्री.कुलवंतसिंग यांची असून ती १७% कमी दराची आहे. मा. आयुक्तांनी ती मंजुर करण्याचे आदेश दिले आहेत. तरी श्री.कुलवंतसिंग यांची निविदा १७% कमी दराची मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. अंदाजपत्रकीय रक्कम रू.४३,०००/-

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७ मो. सिध्दार्थनगर स्लम भागात खडी रस्ता व खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी श्री.अे.के.थोरात यांनी लेखी खुलासा केल्यावरून तुलनात्मकदृष्टया दुसऱ्या क्रमांकाची कमी दराची श्री.कुलवंतसिंग यांची अंदाजपत्रकीय कमी दरापेक्षा १७% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.५ मोहल्ला किलेअर्क येथील सध्या अस्तित्वात असलेली खांडकी काढून नविन खडी रस्ता व डांबरीकरण करणेचे काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे उपलब्ध ठेकेदार श्री.रणजीत पॉल यांचेकडून अ-१ नमुन्यानुसार करून घेण्यात यावे. तरी अंदाजपत्रक रक्कम रू.२६,८५०/- च्या खर्चास मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला किलेअर्क वार्ड क्र.५ येथील सध्या अस्तित्वात असलेली खांडकी काढून नविन खडी रस्ता व डांबरीकरण करणेच्या कामाची तातडी लक्षात घेता उपलब्ध ठेकेदार श्री. रणजीत पॉल यांचेकडून अ-१ नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामासाठी अंदाजपत्रक रू.२६,८५०/- च्या खर्चात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५४ :**

उप अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक १८-१-८९ च्या स्थायी समितीत ठरविण्यात आले की, डांबरीकरण करण्याचे काम निविदा प्राप्त न झाल्यामुळे वॉर्ड क्र.१ मोहल्ला भावसिंगपूरा (भिमनगर) येथील स्लम विभागात सध्या अस्तित्वात असलेल्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम उपलब्ध ठेकेदार श्री. रणजीत पॉल यांचे कडून अ-१ नमुन्यावर करून घेण्यात यावे. याबाबत मान्यतेसाठी व विचारार्थ सादर(अंदाजपत्रक र.रू.२,४८,५०७/- )

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१ मोहल्ला भावसिंगपूरा (भिमनगर) येथील स्लम विभागात सध्या अस्तित्वात असलेलया खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम निविदा प्राप्त न झाल्यामुळे उपलब्ध ठेकेदार श्री.रणजीत पॉल यांचेकडून अ-१ नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५५ :**

उप अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिनांक १८-१-८९ च्या स्थायी समितीत ठरविण्यात आले की, डांबरीकरण करण्याचे काम निविदा प्राप्त न झाल्यामुळे वॉर्ड क्र.४ व ५ मो.घाटी येथील खडी रस्त्यावर २० मी.मी. सील सरफेस करणेचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.रणजीत पॉल यांचेकडून अ-१ नमुन्यावर करून घेण्यात यावे. बाबत मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

( अंदाजपत्रक र.रू.१,०७,१००/-)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४ व ५ मोहल्ला घाटी येथील खडी रस्त्यावर २० मी.मी. सील सरफेस करणेचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.रणजीत पॉल यांचेकडून अ-१ नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५६:**

सहाय्यक आयुक्त -२ यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती दिनांक ५-८-८८ ठराव क्र.८६ द्वारे स्टेशनरी व ड्रॉइंग साहित्याच्या कमी दराच्या दरपत्रक धारकाच्या नावासमोर देण्यात आलेली आहे. त्या मध्ये मे.हेमांगी स्टेशनरी ॲन्ड सप्लायर्स औरंगाबाद यांचा समावेश आहे.

मे.हेमांगी स्टेशनरी ॲन्ड स्पलायर्स यांना या कार्यालयातर्फे स्टेशनरी साहित्य पुरवठा करण्यास आदेश देण्यात आलेले आहेत. परंतू त्यांनी आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा केलेला नाही. त्यामुळे कार्यालयात स्टेशनरी व ड्राइंग साहित्याचा तुटवडा भासत आहे. तरी मे.

हेमांगी स्टेशनरी अॅन्ड सप्लायर्स यांच्या नावे मंजुर झालेल्या अॅटमच्या दरापेक्षा दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर व अॅटम खालीलप्रमाणे आहेत.

स्टेशनरी साहित्य

| | | |
|---|---|---|
| १ | स्टॅपलर पीन २४/६ | २.२० प्र.बॉक्स- मे.हेमंत ट्रेडर्स |
| २ | जॉटररिफिल विल्सन | ३०.५० प्र.डझन-मे.विजय जनरल |
| ३ | पीनबॉक्स १०० ग्रॅम | १.९५ प्र.बॉक्स-मे.हेमांगी ट्रेडसै व मुरली स्टेशनर्स |
| ४ | पीनबॉक्स ४०० ग्रॅम | ४.००प्र.बॉक्स-मे.मॉर्डनस्टेशनर्स व जनरल सप्लायर्स |
| ५ | विल्सन पेन स्टॅंड (चार पेन सह) | ३५.९० प्रतीनग -मे.मुरली स्टेशनरी |
| ६ | रिफिल कॅलेंडर स्टॅंड | १७.८० प्रती नग-हेमंत ट्रेडर्स |
| ७ | लाकडी पटट्ी १२ | ९.२० प्रती डझन - मे.सिंगो |
| ८ | गोदरेज कुलूप लिव्हर ६" | ४०.८० प्रतीनग-मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ९ | गोदरेज कुलूप लिव्हर ५" | २९.८० प्रतीनग-मे.विजय जनरल स्टोअर्स |
| १० | गोदरेज कुलूप लिव्हर ७" | ६०.०० प्रतीनग--मे.मॉर्डनस्टेशनर्सवजनरल सप्लायर्स |
| ११ | रंगीत खडू | २.९५ प्रती बॉक्स-मे.विजय जनरल स्टोअर्स |
| | ड्रॉइंग साहित्य | |
| १ | ड्रॉइंग बोर्ड १२x१९ | ३२.६० प्र.नग - मे.सिंगो एजन्सीज |
| २ | लाल पेन्सील | ११.०० प्र.डझन -मे.सिंगो एजन्सीज |
| ३ | कॉपींग पेन्सील | १०.०० प्र.नग हेमंत ट्रेडर्स |
| ४ | आरोग्राफ इंक | ८.०० प्र.नग मे.मॉर्डन स्टेशनरी अॅन्ड सप्लायर्स |
| ५ | आरोग्राफ पेन | ४४.०० प्र.नग हेमंत ट्रेडर्स |
| ६ | ड्रॉईंग क्लीप | ३.८० प्र.बॉक्स मे.सिंगो एजन्सीज |
| ७ | पे.सर्कल | १०.९० प्र.नग मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ८ | सेटस् क्वायर फायबर | १५.९५ प्र.नग मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ९ | अमोनिया लिक्वीड | ४.७० प्र.बॉटल मे.हेमंत ट्रेडर्स व सिंगो एजन्सीज |
| १० | मायक्रो स्केच पेन | ४०.००प्र.डझन मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ११ | सेलीटेप ट्रान्सपरंट | २.१० प्र.बंडलमे.विजय जनरल स्टोअर्स |
| १२ | टिक्सो कलर टेप | ३.८० मे.विजय जनरल स्टोअर्स |

तरी वरील प्रमाणेच्या दरास मान्यता देण्यात येवून ठराव क्र.८६ च्या ज्या दरास मान्यता दिली आहे. त्यापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाच्या पोटी मे.हेमांगी स्टेशनरी अॅन्ड जनरल सप्लायर्स यांनी भरलेली निविदा अनामत रक्कम रू.६०००/- जप्त करून महापालिका फंडात जमा करण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे.हेंमांगी स्टेशनरी अॅन्ड सप्लायर्स यांना कार्यालयातर्फे स्टेशनरी साहित्य पुरवठा करण्यास आदेश देवूनही त्यांनी मालाचा पुरवठा केलेला नाही. म्हणून त्यांच्या नावे मंजुर झालेल्या अॅटमच्या दरापेक्षा दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेल्या अॅटमच्या समोर दर्शविण्यात आलेल्या दरपत्रकधारकांच्या दरात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच ठराव क्र.८६ दिनांक ५-८-८८ नुसार ज्या दरास मान्यता दिली आहे. त्या पेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाच्या पोटी मे.हेंमांगी स्टेशनरी अॅन्ड सप्लायर्स यांनी भरलेली निविदा

अनामत रक्कम रूपये ६०००/- जप्त करून महापालक ा फंडात जमा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात`यते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले दर व दरपत्रकधारक खालील प्रमाणे

स्टेशनरी साहित्य

| | | |
|---|---|---|
| १) | स्टॅपलर पीन २४/६ | २.२० प्र.बॉक्स- मे.हेमंत ट्रेडर्स |
| २) | जॉटररिफिल विल्सन | ३०.५० प्र.डझन-मे.विजय जनरल |
| ३) | पीनबॉक्स १०० ग्रॅम | १.९५ प्र.बॉक्स-मे.हेमांगी ट्रेडसै व मुरली स्टेशनर्स |
| ४) | पीनबॉक्स ४०० ग्रॅम | ४.००प्र.बॉक्स-मे.मॉर्डनस्टेशनर्स व जनरल सप्लायर्स |
| ५) | विल्सन पेन स्टॅंड (चार पेन सह) | ३५.९० प्रतीनग -मे.मुरली स्टेशनरी |
| ६) | रिफिल कॅलेंडर स्टॅंड | १७.८० प्रती नग-हेमंत ट्रेडर्स |
| ७) | लाकडी पटट्ी १२ | ९.२० प्रती डझन - मे.सिंगो |
| | गोदरेज कुलूप लिव्हर ६" | ४०.८० प्रतीनग-मे.विजय जनरल स्टोअर्स |
| | गोदरेज कुलूप लिव्हर ५" | २९.८० प्रतीनग-मे.विजय जनरल स्टोअर्स |
| | गोदरेज कुलूप लिव्हर ७" | ६०.०० प्रतीनग--मे.मॉर्डनस्टेशनर्सवजनरल सप्लायर्स |
| ८) | रंगीत खडू | २.९५ प्रती बॉक्स-मे.विजय जनरल स्टोअर्स |

**<u>ड्रॉइंग साहित्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | ड्रॉइंग बोर्ड १२x१९ | ३२.६० प्र.नग - मे.सिंगो एजन्सीज |
| २) | लाल पेन्सील | ११.०० प्र.डझन -मे.सिंगो एजन्सीज |
| ३) | कॉपींग पेन्सील | १०.०० प्र.नग हेमंत ट्रेडर्स |
| ४) | आरोग्राफ इंक | ८.०० प्र.नग मे.मॉर्डन स्टेशनरी ॲन्ड सप्लायर्स |
| ५) | आरोग्राफ पेन | ४४.०० प्र.नग हेमंत ट्रेडर्स |
| ६) | ड्रॉईंग क्लीप | ३.८० प्र.बॉक्स मे.सिंगो एजन्सीज |
| ७) | पे.सर्कल | १०.९० प्र.नग मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ८) | सेटस् क्वायर फायबर | १५.९५ प्र.नग मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ९) | अमोनिया लिक्वीड | ४.७० प्र.बॉटल मे.हेमंत ट्रेडर्स व सिंगो एजन्सीज |
| १०) | मायक्रो स्केच पेन | ४०.००प्र.डझन मे.विजय जनरल स्टोअर्स |
| ११) | सेलीटेप ट्रान्सपरंट | २.१० प्र.बंडलमे.विजय जनरल स्टोअर्स |
| १२) | टिक्सो कलर टेप | ३.८० मे.विजय जनरल स्टोअर्स |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५७ :**

वॉर्ड क्र.४८ येथील बाबा हरदास रामनगर येथील क्षेत्रनगर जवळील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.५६८ दिनांक २४-११-८८ अन्वये र.रूपये १८,४२०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. बांध-२/९९० दिनांक ५-१२-८८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत फक्त एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली. ती दिनांक १६-१२-८८ ला उघडण्यात आली. सदरची निविदा मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची ४.९ % अंदाजपत्रकाचे दरापेक्षा जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त

असल्यामुळे दर आणखी कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र.मनपा/बांध-२/१०६८ दिनांक २२-१२-८८ अन्वये पत्र दिले असता सदर गुत्तेदाराने दिनांक २७-१२-८८ अन्वये लेखी अर्ज दिला कि, सदरचे काम ते ४.९% जास्त दराऐवजी ३% अंदाजपत्रकाचे दरापेक्षा जास्त दरानेकरण्यास तयार आहेत.

सबब मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४८ येथील बाबा हरदास रामनगर येथील क्षेत्रनगर जवळील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांना लेखी दिल्याप्रमाणे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५८ :**

वॉर्ड क्र.९ नारेगांव येथील मनपा प्रा.शाळेच्या अप्रोच रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ६-८-८८ ठराव क्र.१३४ अन्वये र.रूपये ३८,१६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.मनपा/बांध-२/९८०/८८ दिनांक ५-१२-८८ अन्वये निविदा मागविण्यात आला असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण फक्त एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली. ती दिनांक १६-१२-८८ ला उघडण्यात आली. सदरची निविदा ही मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची ४.९% अंदाजपत्रकाचे दरापेक्षा जास्त दराची आहे. आदेशान्वये दर कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र.मनपा/बांध-२/१०६८/८८ दिनांक २२-१२-८८ अन्वये ४.९% जास्त दराऐवजी ३% जास्त अंदाजपत्रकाचे दरापेक्षा काम करण्यास लेखी संम्मती दिली आहे. सबब मे. गुरूनानक इंडस्ट्रीज यांची ३% जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९ नारेगांव येथील मनपा प्रा.शाळेच्या अप्रोच रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांनी लेखी संम्मती दिल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८५९ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील रस्ते अतिवृष्टीमुळे फारच खराब झाले आहेत. त्यांना दुरूस्तीची निकड लक्षात घेवून किमान पॅचवर्क दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी (६६ मे.टन) ८०/१०० चे डांबर मे.इंडीयन ऑईल कार्पोरेशन मुंबई (भारत सरकार उपक्रम) कडून त्यांनी रू.३३४२-५० प्रति मे. टन सर्व प्रकाराचे करासह दिलेला दर आहे. त्याची एकूण रू.२,२०,६०५-०० ही किंमत होते. तसेच त्यास आणण्यासाठी वाहनावळीचा खर्च रू.१४,५००/- हा अंदाजे अपेक्षित आहे. तरी वेळेवर उपलब्ध असलेल्या वाहतुक गुत्तेदाराकडून सदरील डांबर वाहनावळ करण्यास खर्चास मंजुरी घेणे व प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**स.सभासद श्री.मोरेश्वर सावे :** यांनी सुचविले कि, नळ कनेक्शन मंजुर करतांना रस्ता दुरूस्तीची रक्कम संबधिताकडून वसूल केली जाते पण शहरात बऱ्याच ठिकाणी नळ कनेक्शनसाठी खोदलेले रस्ते दुरूस्त केले जात नाही. बालाजी अपार्टमेंट/खडकेश्वर/पशुवैद्यकीय चिकित्सालय येथील रस्त्याचे दुरूस्तीबाबत झोनमध्ये रिपोर्टही दिला आहे. परंतु अद्याप काम झाले नाही. यासाठी निश्चित अशी कालमर्यादा कायम करणे जरुरीचे आहे. याचवेळी स.सभासद श्री.स.हुसैन स.अहमद यांनी खासगेट व इंदिरानगर आणि स.सभासद श्री. अजितकुमार शेळके यांनी भडकलगेट येथील शाकुंतल लॉज जवळील रस्ता दुरूस्तीची मागणी केली.

**स.सभासद श्री.मोतीराम घडामोडे:** यांनी सिडको विभागात महापालिकेतर्फे टाकण्यात आलेल्या नविन पाईपलाईनमुळे आणि नवीन नळ कनेक्शनमुळे नादुरूस्त झालेले रस्ते दुरूस्त करण्याची मागणी केली. यावर खुलासा करतांना कार्यकारी अभियंता म्हणाले कि, सिडको विभागात नविन नळ कनेक्शनसाठी खोदण्यात आलेला रस्ता महापालिकेतर्फे दुरूस्त करून देता येईल. पण नविन पाईप लाईन टाकतांना खराब झालेला रस्ता सिडको प्रशासनाने दुरूस्त करावा. याबाबत जलगृह अभियता यांनी सिडको प्रशासनास सविस्तर माहिती पाठवावी.

नळ कनेक्शनसाठी खोदलेला रस्ता त्वरीत दुरूस्त करून घेण्याबाबत जलगृह अभियता यांनी विशेष लक्ष देवून काम पूर्ण करून घेण्याची कार्यवाही करावी. अशी सुचना मा. सभापती यांनी केली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अतिवृष्टीमुळे शहरातील खराब झालेल्या रस्त्यांना पॅचवर्क दुरूस्ती करणेच्या कामासाठी रक्कम रू.३३४२-५० प्रती मे.टन या दराने ८०/१०० चे डांबर मे. इंडियन ऑईल कार्पोरेशन मुंबई (भारत सरकार उपक्रम) यांचेकडून ६६ मे. टन डांबर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. त्याची एकूण किंमत र.रू.२,२०,६०५/- व उपलब्ध गुत्तेरांकडून सदरील डांबर वाहनावळ करण्यास आणि वाहनावळीचा खर्च रक्कम रूपये १४,५००/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.८६० :**

वॉर्ड क्र.२१ येथील भडकलगेट ते सिटीक्लब या ९६० मीटर लांब १००" डी.पी. रोडचे लेवलिंग करणेचे कामासाठी (अ) सन १९८८-८९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर.दराने र.रू.९८,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. (ब) सदरचे रस्त्यावरील अतिक्रमणे हटविल्यामुळे सदरचे मटेरियल उचलून रस्ता लेवल करणे आवश्यक आहे. सबब कामाची तातडी लक्षात घेता सदरचे काम अ-१ निविदा नुसार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येत आहे. सदरचा खर्च विकास योजना रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२१ येथील भडकलगेट ते सिटीक्लब या ९६० मीटर लांब १००" डी.पी. रोडचे लेवलिंग करणेचे कामासाठी र.रू.९८,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच काम तातडीच्या स्वरूपाचे असल्यामुळे श्री.एस.ए.नवाब, गुत्तेदार यांचेमार्फत "अ-१" निविदानुसार अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८६१ :**

वॉर्ड क्र.२१ महानगरपालिका सभागृह टाऊनहॉलचे विकास करणेच्या सिव्हील कामासाठी र.रू.२,१५,३४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.४२ दिनांक २९-६-८८ अन्वये व सदरील कामासाठी ठराव क्र. ९५ दि. ६-८-८८ नुसार श्री.एस.ए.नवाब गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.८३% कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मुंजुरी मिळालेली आहे. मा. शहर अभियंता व मा. आयुक्त यांचे संयुक्त पहाणीनुसार बऱ्याच कामाचा मुळ अंदाजपत्रकात समावेश नसल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक र.रू.१९,०१५/- ची बचत होत आहे. तरी सिव्हील कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रू.३,२३,०८४/- व गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून जास्तीचे काम अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका सभागृह टाऊनहॉलचे विकास करणेच्या सिव्हील कामासाठी सुधारित अंदाजपत्रक र.रू.३,२३,०८४/- व सदरचे काम गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचेकडून जास्तीचे काम (एक्ट्रा ॲटम) अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.८६२ :**

वॉर्ड क्र.२१ टाऊन हॉल इमारतीमध्ये (सभागृह ) आवाज व्यवस्था तयार करणे व इतर कामासाठी स्थायी समिती दिनांक २९-६-८८ विषय क्र.४२ अन्वये अंदाजपत्रक र.रू.४,२५,३४०/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे.

या कामासाठी दिनांक ११-१-८९ च्या सुचनेप्रमाणे निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | टोनोट्रानिक्स कार्पोरेशन पुणे | - | ३,०९,०३०/- |
| २) | इमके पुणे | - | ३,२७,७८०/- |
| ३) | डलाईस पुणे | - | ३,२३,४५०/- |

वरील पैकी अ.क्र.१ टोंनोट्रानिक्स कार्पोरेशन पुणे यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहे.

विचारार्थ सादर.

**संवाद :**

यावर आपले विचार मांडतांना स. सभासद श्री.मोरश्वर सावे म्हणाले कि, सभागृहामध्ये ध्वनिक्षेपणाची व्यवस्था करतांना फिलिप्स, जी.ई.सी.आहुजा अशा नामवंत कंपनीचे साहित्य वापरले जाईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच फर्निचरची

व्यवस्था करतांनाही नामांकित संस्थेच्या दरपत्रकाचा विचार करण्यात यावा आणि त्यांचे कडून फर्निचरचे नमुने मागवून घेण्यांत यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल इमारतीमध्ये (सभागृह) ध्वनिक्षेपण व्यवस्था आणि इतर कामासाठी रक्कम रू.३,०९,०३०/- च्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या मे.टोनोट्रानिक्स कार्पोरेशन पुणे यांच्या दरपत्रकास सर्वानुंमते मंजुरी देण्यांत येते. ध्वनिक्षेपणाच्या कामासाठी फिलिप्स कंपनीच्या साहित्याचा वापर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८६३:**

वॉर्ड क्र.२१ येथील टाऊन हॉल इमारतीमध्ये (सभागृह) मिटींग करीता फर्निचर तयार करणे व इतर कामासाठी स्थायी समिती दिनांक २९-६-८८ ठराव क्र.४२ अन्वये अंदाजपत्रक र.क्र.४,२५,३४०/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे.

या कामासाठी दिनांक ११-१-८९ च्या सुचनेप्रमाणे निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तिन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | शंकर रामचंद्र वाणी ब्रदर्स ,पुणे | २,०६,०४०/- |
| २) | तारासिंग विठठ्लसिंग नांदेड | २,३६,९५०/- |
| ३) | स्टार स्टील वुडन फर्निचर,औरंगाबाद | १,०८,५४०/- |

वरील पैकी अ.क्र.३ स्टार स्टील उडन फर्निचर यांची निविदा रक्कम रू.१,०८,५४०/- सर्वात कमी आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊनहॉल इमारतीमध्ये (सभागृह) फर्निचर तयार करणे आणि इतर कामासाठी रक्कम रूपये १,०८,५४०/- च्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या मे.स्टार स्टील वुडन फर्निचर औरंगाबाद यांच्या दरपत्रकासव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. फर्निचरच्या कामासाठी फर्निचरचे नमुने मागवून घेण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८६४ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.३९मधील कैलासनगर येथे ८० मी मी व १५० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१९,१८१/- ला ठराव क्र.२५५ दिनांक १७-८-८८ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. मनपा /पापु/७००/८८ दिनांक २३-८-८८ अन्वये वरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त
झाली नाही.

सदरील कामामध्ये लेबर पेमेंट ३,८८०/- असल्यामुळे व साहित्याचा पुरवठा मनपा तर्फे होत असल्याने व तातडीचे काम असल्यामुळे फेरनिविदा न मागविता उपलब्ध गुत्तेदार श्री. अमीर मिस्त्री यांचेमार्फत सदरील काम करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३९ मधील कैलासनगर येथे ८० मी मी व १५० मी मी व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामामध्ये लेबर पेमेंट रू.३,८८०/- असल्यामुळे व साहित्याचा पुरवठा मनपातर्फे होत असल्यामुळे कामाची तातडी लक्षात घेता फेरनिविदा न मागविता सदर काम गुत्तेदार श्री.अमीर मिस्त्री यांचेमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

यांनतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ८-२-८९ रोजी भरलेल्या स्थायी समितीचा इतिवृत्तांत बुधवार दिनांक ८-२-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपीलका कार्यालयाने सभा कक्षांत सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली सभेस सुरूवात झाली. सभेमध्ये पुढील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री.इकबालसिंग प्रितमसिंग गिल
२) श्री.गाढे गंगाधर सुखदेव
३) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
४) श्री.यादव अशोक सायन्ना
५) श्री.अजितकुमार शेळके
६) श्री.मोरश्वर दिनानाथ सावे
७) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
८) श्री. कचरू चंद्रभान नवपुते

**संवाद:**

**श्री.मोरेश्वर सावे :** स.स. यांनी सुचविले कि, कार्यक्रमपत्रिकेसोबत जोडलेल्या लेखा विभागाचे तक्त्यात मे/जून च्या आकडेवारी बरोबर एप्रिल ८८ च्या आकडेवारीचा उल्लेख नाही. तेव्हा यापुढे माहे एप्रिल /मे/जून अशी आकडेवारी देण्याची व्यवस्था करावी. जाहिरात करा विषयी आकडेवारी लक्षात घेता माहे मे/जून ८८ मध्ये अनुक्रमे रू.३०० व ७७२ चे उत्पन्न प्राप्त झाले असून या शिर्षकासाठी रक्कम रू.७५,०००/- ची तरतुद दाखविण्यात आली आहे. तेव्हा शहरातील ठिकठिकाणी लावण्यात आलेले जाहिरात फलकांची संख्या विचारात घेता अंदाजपत्रकात या शिर्षकासाठी करण्यात आलेली तरतुद अत्यल्प आणि प्रत्यक्षात झालेली वसूली नगण्य आहे. तेव्हा या शिर्षकाबाबत वरील सर्व बाबींचा विचार करता सन १९८९-९० च्या अर्थसंकल्पात योग्य ती वस्तुनिष्ठ तरतुद करण्यांत यावी.

**स.सभासद श्री. यादव अशोक सायन्ना, गंगाधर गाढे व इकबालसिंग गील :** यांनी सूचित केले कि, मागील सभेमध्ये शहरात किती जाहिरात फलक आहे ? त्यापैकी किती जाहिरात फलकांना मनपातर्फे परवानगी देण्यात आली आहे आणि किती जाहिरात फलक अनाधिकृत आहेत व जाहिरात करापासून किती उत्पन्न मिळते? अधिकृत जाहिरात फलक धारकांकडून किती दंड वसूल करण्यात आला याबाबत सविस्तर माहिती देण्याचे मालमत्ता अधिकारी यांनी आश्वासन दिले होते. तेव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा. लेखाधिकारी यांनी सुचविले की, जाहिरात कराच्या रक्कमेची वसूली सर्वसाधारणपणे (आर्थिक वर्षाचे शेवटी) मार्च मध्ये कटाक्षाने करण्यात येते. यावर खुलासा करताना स.सभासद सर्वश्री मोरेश्वर सावे, गंगाधर गाडे यांनी सूचीत केले की, जाहरात फरक मुव्हेबल प्रॉपर्टी या सदरात मोडतात तेव्हा या बाबींचा विचार करता मार्च मध्ये जाहरात कराची कटाक्षाने वसूली करण्यात येते हे म्हणणे चुकीचे ठरेल. तेव्हा सुरवातीलाच संपूर्ण वर्षाचा जाहीरात कर वसूल

करण्यात यावा. तसेच अनधिकृत जाहरात फलकांबाबत संबधितांकून विलंबित जाहीरात कराशिवाय दंड वसूल करण्यात यावा. जाहीरात कराप्रमाणे इमारत भाडे, नाटयगृह,जनावरांचा बाजार आठवडी बाजार इ. ची वसूली कमी वाटते. तेव्हा या अन्य शिर्षकाबाबत योग्य त्या सविस्तर माहितीसह संपूर्ण अहवाल पुढील सभेत ठेवण्यात यावा अशी सूचना मा. सभापती यांनी केली.

**विषय क्र. ८६५ :**

दिनांक २५ जानेवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

दिनांक २५ जानेवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८६६ :**

वॉर्ड क्र.३७ बायजीपूरा येथील महेशनगर अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबत र.रू.८२,४५०/- चे अंदाजपत्रक सन १९८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३७ बायजीपूरा येथील महेशनगर अंतर्गत खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी रक्कम रू. ८२,४५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८६७ :**

वॉर्ड क्र.६० येथील चिकलठाणा प्राथमिक शाळेस वायर फेसिंग करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६५० दिनांक २८-१२-८८ अन्वये र.रू.१९,५५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.एच.डी.कटारिया | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा १% | कमी |
| २) | श्री.के.बी.काल्डा | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% | कमी |
| ३) | श्री.अब्दुल सलाम | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराची श्री.एच.डी.कटारीया यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६० येथील चिकलठाणा प्राथमिक शाळेस वायर फेन्सींग करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री.एच.डी.कटारिया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८६८ :**

वॉर्ड क्र.४४ क्रांतीचौक ते महाविर चौक (अदालत रोड) रस्त्याचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७७० अन्वये र.रू.५,६६,२६४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.डी.एस.जग्गी | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५% कमी |
| २) | श्री.पी.एम.चोरडीया | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी |
| ३) | श्री.गुरूनानक इंडस्ट्रीज | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५.७५% कमी दराची श्री.डी.एस.जग्गी यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४ क्रांतीचौक ते महाविर चौक (अदालत रोड) रस्त्याचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.७५ % कमी दराचे भ्ी.डी.एस. जग्गी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८६९**

वॉर्ड क्र. ४५ नुतन कॉलनी ते बडा तकीया संवाद पर्यंतचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.७७२ दिनांक ५-१-८९ अन्वये र.रू.१,४९,६९६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.एम.चोरडिया | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी |
| २) | श्री.गुरूनानक इंडस्ट्रिज | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ६% कमी |
| ३) | श्री.डी.एस.जग्गी | अंजदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.८७% कमी दराची श्री.पी.एम.चोरडिया यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**संवाद:**

**स.स. श्री.गंगाधर गाडे व श्री.मोरश्वर सावे** : यांनी सूचविले कि, सदर काम सुरू झाल्याची माहिती मिळाली आहे. तेव्हा स्थायी समितीच्या मंजुरीपूर्वी सदर काम कोणत्या आधारे पूर्ण करण्यात आले याबाबत संबंधित अंधिकाऱ्यांनी खुलासा करावा. यावर मा. सभापती यांनी खुलासा केला की, सदर कामाची दरपत्रके प्राप्त झाली होती आणि रस्ता फारच खराब झालेला होता. यावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना स. सभासद श्री.मोरश्वर सावे यांनी सूचविले कि, सदर रस्ता खराब झाला म्हणून काम हाती घेतले ही बाब लक्षात घेतली तर मग शारदा कॉलनीतील खराब झालेल्या रस्त्याचे काम हाती का घेण्यात आले नाही ? सिंधी कॉलनीतील खडी रस्ते पूर्ण झाले पण त्या भागातील नागरिकांना विकास खर्चाची रक्कम रूपये पाच लाख भरण्यास सांगितले जाते. मग या रस्त्यांच्या कामास अशी अडवणूक का? यावर खुलासा

करतांना मा. सभापती यांनी सुचविले कि, या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार नसल्यामुळे काम हाती घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. स.सभासद श्री.यादव अशोक सायन्ना व इकबालसिंग गिल यांनी सुचविले कि, संबंधित वॉर्डाचे नगरसेवकांनी काम लवकर करून घेण्याची मागणी केली होती. ती लक्षात घेवून काम हाती घेण्यात आले आहे. तेव्हा या कामास मंजुरी देण्यात यावी. आणि यापुढे स्थायी समितीच्या मंजुरीपूर्वी काम हाती घेतले जाणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४५ नुतन कॉलनी ते बडा तकीया पर्यंतचे रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच स्थायी समितीच्या मंजुरीपूर्वी कोणतेही काम हाती घेतले जाणार नाही याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षत घ्यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.८७० :**

वॉर्ड क्र .११ सिडको एन-७ येथील समाजमंदिराची दुरूस्ती व फेरफार करणेच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक २८-१२-८८ ठराव क्र.८७० अन्वये र.रू.९२,६५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.संजय पंडितराव सरवदे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी |
| २) | श्री.एस.बी.इंगळे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.८८% कमी |
| ३) | श्री.मोतीलाल जैस्वाल | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.५% कमी |
| ४) | श्री.एन.जी.गुणवाणी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०८% कमी |
| ५) | श्री.संजय खर्डीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १६% कमी दराची श्री.संजय पंडितराव सरवदे यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११ सिडको एन-७ येथील समाजमंदिराची दुरूस्ती व फेरफार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची श्री.संजय पंडितराव सरवदे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७१ :**

वॉर्ड क्र.६० येथील चिकलठाणा झोन नं.५ कार्यालयासमोर भाजी विक्रेत्यांसाठी रोड बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २८-१२-८८ ठराव क्र.६७१ अन्वये र.रू.५१,४५७/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती

घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अ.सलिम | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०४% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री.अ.सलाम यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६० येथील चिकलठाणा झोन.नं.५ कार्यालयासमोर भाजी विक्रेत्यासाठी शेड बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री.अ.सलाम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७२:**

वॉर्ड क्र.५७ शहानुरवाडी येथील निरंजन सोसायटी ते रामतारा सोसायटी पर्यंतच्या खडी रस्त्याचे काम करणेसाठी स्थायी समिती दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७५५ अन्वये र.रू.५५,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण नऊ निविदा दरनिर्दिष्ट प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.जावीद खान | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.४९% कमी |
| २) | आनंद बिल्डर्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.३% कमी |
| ३) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी |
| ४) | श्री.सुखबीरसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.२०% कमी |
| ५) | पॉल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९७% कमी |
| ६) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.१०% कमी |
| ७) | एस.एच.असोसिएट्स् | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| ८) | श्री.अ.सलाम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी |
| ९) | श्री.बी.ए.काल्डा | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.४% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २४.४९ कमी दराची श्री.जाविदखान यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील निरंजन सोसायटी ते रामतारा सोसायटी पर्यंतच्या खडी रस्त्याचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.४९% कमी दराची श्री.जावीदखान यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र ८७३ :**

वॉर्ड क्र.४८ क्रांतीचौक स्थित झाशीच्या राणी उद्यानातील कॉलनी अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी स्थायी समिती दि.२८-१२-८८ ठराव क्र. ६४९ अन्वये रक्कम रु.३६,८००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती

घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.खुर्शिद अली | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी |
| २) | श्री.रविंद्रसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.१०% कमी |
| ३) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२% कमी |
| ४) | श्री.अ.सलाम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| ५) | एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २४% कमी दराची श्री.खुर्शिद अली यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४८ क्रांतीचौकस्थित झाशीच्या राणी उद्यानातील कॉलनी अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी दराची श्री.खुर्शिद अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७४ :**

वॉर्ड क्र.४९ रणजीतनगर अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक २८-१२-८८ ठराव क्र.६५१ अन्वये र.रू.३७,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.खुर्शिद अली | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी |
| २) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी |
| ३) | श्री.कुलवंतरसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१०% कमी |
| ४) | एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| ५) | श्री.एच.डी.कटारिया | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २३% कमी दराची श्री.खुर्शिद अली यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ रणजीतनगर अंतर्गत खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची श्री.खुर्शिद अली यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७५ :**

(विषय क्र.११ व १३ चा एकत्रित सुधारीत प्रस्ताव)

वॉर्ड क्र.४१ पैठणगेट येथील वाहतुक बेटाचा विकास करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६७२ दिनांक २८-१२-८८ अन्वये र.रू.१,९६,८४५/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळालेली आहे. सदरच्या कामामध्ये खालील कामांचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | खडी रस्त्याचे काम अंदाजपत्रक | र.रू. ५०,११५/- |
| २ | डांबरीकरण करण्याचे काम अंदाजपत्रक | र.रू. ४६,२८०/- |
| ३ | आयलँडचे काम अंदाजपत्रक | र.रू.१,००,४५०/- |
| | एकूण: | र.रू.१,९६,८४५/- |

अ) अ.क्र.१चे कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१% कमी |
| २) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७७% कमी |
| ३) | श्री.अ.सलाम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५०% कमी |
| ४) | एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१ % कमी दराची श्री.एस.ए.नवाब यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

ब) अ.क्र.३ चे कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अ.सलाम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.२०% कमी |
| २) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.१०% कमी |
| ३) | श्री.एल.एम.पडघण | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.०५% कमी |
| ४) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.१% कमी |
| ५) | एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी |
| ६) | श्री.एन.जी.गुणवाणी | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.२०% कमी दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, (अ) खडी रस्ता तयार करण्याचे कामी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१ % कमी दराची श्री. एस.ए.नवाब यांची निविदा आणि (ब ) आयलंडचा विकास करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२.२०% कमी दराची श्री.अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७६ :**

वॉर्ड क्र.५८ येथील जवाहर कॉलनी येथील मनपा आरोग्य केंद्राचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १४-१२-८८ ठराव क्र.६७४ अन्वये र.रू.१८,०५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.इगल इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त |
| २) | मे.पाठक इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त |
| ३) | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त |
| ४) | मे.शांती इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त |

५) मे.रिगल इलेक्ट्रीकल्स अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची मे.लुना इलेंक्ट्रीकल्स यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जवाहर कॉलनी येथील मनपा आरोग्य केंद्राचे विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराचे मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८७७ :**

वार्ड क्र.४६ भाग्यनगर येथील खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७६९ अन्वये र.रू.१,०९,४००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.रविंद्रसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७० कमी |
| २) | श्री. कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.७०% कमी |
| ३) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी |
| ४) | श्री.एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% कमी |
| ५) | पॉल कन्सटक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७०% कमी दराची श्री.रविंद्रसिंग यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भाग्यनगर येथील खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.७०% कमी दराची श्री.रविंद्रसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.८७८ :**

वॉर्ड क्र.३९ संत एकनाथ हौसिंग सोसायटी अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २८-१२-८८ ठराव क्र.६९६ अन्वये र.रू.९६,८२०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी |
| २) | श्री.बदरबीन सलाम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.८५% कमी |
| ३) | श्री.जी.एम.बालचंदानी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी |
| ४) | एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.५% कमी |
| ५) | श्री.अंबादास इंगळे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१% कमी |
| ६) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१% कमी |
| ७) | पॉल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.५% कमी दराची श्री.एस.एच.असोसिएट्स यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३९ संत एकनाथ हैसिंग सोसायटी अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.५% कमी दराची श्री.एस.एच. असोसिएट्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ८७९:**

वार्ड क्र.६ येथील नेहरू उद्यानास संरक्षित भिंत वॉचमन क्वॉर्टर बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक ११-८-८८ ठराव क्र.२२३ नुसार र.रू.२,३०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण आठ दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| २) | श्री. मझरुल हक्क | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ३) | श्री.एस.एच.असोसिएटस् | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त |
| ४) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी |
| ५) | पॉल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी |
| ६) | श्री.ज.एम.बालचंदानी | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ७) | श्री.अंबादास इंगळे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५% कमी |
| ८) | श्री.एन.जी.गुणवाणी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.९५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५% कमी दराची श्री.अंबादास इंगळे यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६ येथील नेहरू उद्यानास संरक्षित भिंत व वॉचमन क्वॉर्टर बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५% कमी दराची श्री. अंबादास इंगळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८०:**

वार्ड क्र.२४ येथील नागेश्वरवाडी मनपा शाळेला संरक्षित भिंत बांधणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक २६-१०-८८ ठराव क्र. ४९८ नूसार र.रू. ४६,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. किशोर के. सदावले | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी |

२) श्री.रविंद्रसिंग अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.२१% कमी
३) श्री.स.रफिकउद्यीन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.९०% कमी
४) विपुल कन्सट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी
५) श्री.संतोष पगारे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५०% कमी
६) श्री.एच.एस.असोसिएट्स् अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री.किशोर के. सदावले यांची निविदा आहे .

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२४ येथील नागेश्वरवाडी मनपा शाळेला संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री.किशोर के. सदावले यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८१:**

वार्ड क्र.१५ शहागंज येथील भाजी मार्केटची दुरस्ती करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २६-१०-८८ ठराव क्र.४९७ नुसार रक्कम रू.५१,३६०/- चे अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

१) श्री.मोहमद खुर्शीद अली अंदापजत्रकीय दरापेक्षा १८% जास्त
२) श्री.कुलवंतसिंग अंदापजत्रकीय दरापेक्षा ०५% जास्त
३) श्री.संजय पी सरवदे अंदाजपत्रप्रमाणे

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. संजय पी सरवदे यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज भाजी मार्केटची दुरूस्ती करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. संजय पी सरवदे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८२:**

वार्ड क्र.३६ बायजीपूरा भागात श्री. अब्दुल कादर यांचे घरा जवळ खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक २६-१०-८८ ठराव क्र.४९९ र.रू. ६५,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण आठ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

१) जावीद खान अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.३% कमी
२) एस.एच.असोसिएट्स अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी
३) एस.ए.नवाब अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी
४) मो खुर्शिद अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी
५) रविंद्रसिंग अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.२% कमी

६) पॉल कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी
७) बदरबीन सालम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.९५% कमी
८) जी.एम.बालचंदानी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची श्री. एस.एच. असोसिएट्स यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बायजीपूरा भागात श्री.अब्दुल कादर यांचे घराजवळ खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची श्री. एस.एच. असोसिएट्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८३:**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.१ मधील भावसिंगपूरा (घुमटापासून) ते कत्तलखाना (पडेगांव) ही १५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामाचे र.रू. २,७८,८४५/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२०३ दिनांक ११-८-८८ अन्वये मान्यता मिळालेली आहे. दिनांक २३-८-८८ च्या सूचनेअन्वये पाईपसह सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१) श्री.अे.अे.आबेदी अंदाजपत्रकिय दरापेक्षा १९.५०% जास्त
२) सजनानी कस्ट्रक्शन अंदाजपत्रकिय दरापेक्षा २२% जास्त
३) मझरुल हक्क अंदाजपत्रकिय दरापेक्षा ३५% जास्त

यानंतर मा. आयुक्तांच्या दिनांक २२-११-८८ च्या आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी पाईप व इतर साहित्य वगळता दिनांक ५-११-८८ च्या सूचने अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता ठेकेदार श्री.अे.अे.आबेदी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची एकच निविदा प्राप्त झाली.

मा. आयुक्तांच्या दिनांक २६-१२-८८ च्या आदेशाप्रमाणे सदरील ठेकेदारास दर कमी करणेविषयी पत्र दिले असता (प्र.क्र.मनपा/पापू/८५६/८८ दिनांक २१-१२-८८ ) ठेकेदाराने पत्राचे उत्तर देवून ०.९९% दर कमी केले म्हणजे सदरील काम श्री.अबेदी हे ४% जास्त दराने करणेस तयार आहेत.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ मधील भावसिंगपूरा (घुमटापासून) ते कत्तलखाना (पडेगांव) ही १५० मी मी व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी श्री.अे.अे.अबेदी गुत्तेदार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८४ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वार्ड क्र.९ मधील चिकलठाणा गावास पाणी पुरवठा व्यवस्था करणेसाठी ८० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे र.रू.५०,९१०/-चे अंदाजपत्रकास ठराव क्र. २०४ दि. ११-८-८८ अन्वये मान्यता

मिळाली आहे. दिनांक २३-८-८८ च्या सूचने अन्वये पाईपसह सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

१) श्री.अे.अे.अबेदी — अंदाजपत्रकिय दरापेक्षा १८% जास्त

२) श्री.सजनानी — अंदाजपत्रकिय दरापेक्षा २३% कमी

मा.आयुक्तांच्या दि. १९-११-८८ च्या आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी पाईप व इतर साहित्य वगळता फेरनिविदा दि. ५-११-८८ च्या सुचने अन्वये मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१) श्री.अे.अे.अबेदी — अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी

२) श्री.अर्शद नोमी — अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी

कार्यकारी अभिंयता यांचे आदेशाप्रमाणे दोन्ही गुत्तेदारांना दर कमी करणे विषयीचे पत्र दिले असता श्री. अर्शद नोमी यांनी १५% ने कमी करण्यास तयार असल्याचे लिहले आहे व श्री. अे.अे. अबेदी यांनी २% कमी दराने (त्यांनी दिलेल्या दरापेक्षा करणेस तयार असल्यचे लिहले आहे.)

तुलनात्मकदृष्टया कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची श्री..अर्शद नोमी यांची निविदा स्विकारणेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९ मधील चिकलठाणा गावास पाणी पुरवठा व्यवस्था करणेसाठी १० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराची व अंदाजपत्रकिय दरापेक्षा १५% कमी दराची श्री. अर्शद नोमी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८५ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.२३ मधील मो.गरमपाणी येथे पाणी पुरवठा करण्यासाठी १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.८७,३९५/- चे तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला गरमपाणी येथे पाणी पुरवठा करण्यासाठी १५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाकरिता रक्कम रू.८७,३९५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८६ :**

उप अभियंता (ग.व सु) यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५७ मो. इंदिरानगर ग. वस्ती विभागात १५० मी मी व्यासाची एस.डब्ल्यु.जी. पाईपलाईन टाकणेसाठी ठराव क्र.८०९ दिनांक ११-१-८८ अन्वये र.रू.२,००,०००/- च्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

या कामावर ३० एम.एम.व्यासाची आर.सी.सी.पाईप टाकण्याची गरज असल्यामुळे सदरील कामाचे र.रू.२,६४,२७०/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर काम सध्या काम करित असलेल्या गुत्तेदाराकडूनच करवून घेण्याबाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ मो.इंदिरानगर गलिच्छ वस्ती विभागात १५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यु.जी.पाईपलाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रू.२,६४,२७०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदर काम सध्या करित असलेल्या गुत्तेदाराकडून करवून घेण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८७ :**

उप अभियंता (ग. व सु) यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.८ (हर्सूल येथे घडी व दगडाची व बिनघडीव दगडाची गटारीचे बांधकाम करणेसाठी निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.संजय पंडितराव सरवदे यांची अंदाजपत्रकापेक्षा २९% कमी दराची आहे. परंतू हे दर खुपच कमी असल्यामुळे उक्त ठेकेदारास दराबाबतचे पृथःकरण विचारणास आले असता संबंधिताने खुलासा न देता प्रकृती अस्वास्थाचे कारण दिले आहे. तेव्हा दुसरी कमी दराची निविदा श्री.सैय्यद शौकत अली यांची असून अंदाजपत्रकापेक्षा २१.८६% कमी दराची आहे. संबंधितास दराबाबत पृथःकरण मागण्यात आले असता उत्तर दिलेले आहे.

श्री.सय्यद इकबाल अहमद यांची २१% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. परंतु त्यांनी १% इसारा रक्कम न भरल्यामुळे ती निविदा विचारात घेतलेली नाही.

श्री.एस.बी.इंगळे यांची १६.७७% कमी दराची निविदा भरलेली आहे. त्यांचेकडूनही दराबाबत पृथःकरण मागण्यात आले असता त्यांनी पृथःकरणाचा खुलासा दिलेला आहे. जो योग्य वाटतो.

तरी अंदाजपत्रकापेक्षा १६.७७% कमी दराची श्री.एस.बी.इंगळे यांची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८ हर्सुल येथे घडीव दगडाची व बिनघडीव दगडाची गटारीचे बांधकाम करणेसाठी श्री.एस.बी.इंगळे यांची १६.७७% (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुंमते मंजुरी देण्यात येते

**विषय क्र.८८८ :**

वार्ड क्र.४१ मो. सब्जीमंडी खोकडपूरा येथील सुलभ शौचालय दुरूस्ती करणेसाठी अंदाजपत्रक र.रू.४३,७२२/- ला ठराव क्र.२५ दिनांक २१-९-८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा वसुल झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अंबादास इंगळे | अंदाजपत्रिकिय दरापेक्षा २०.५०% कमी |
| २) | श्री.पॉल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रिकिय दरापेक्षा ७.८६% कमी |
| ३) | श्री.काजी रफिकद्यीन | अंदाजपत्रिकिय दरापेक्षा १२.५०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रिकिय दरापेक्षा २०.५०% कमी दराचे श्री. अंबादास इंगळे यांचे दरपत्रक आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४१ मो. सब्जीमंडी खोकडपूरा येथील सुलभ शौचालय दुरूस्ती करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रिकिय दरापेक्षा

२०.५०% कमी दराचे श्री. अंबादास इंगळे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८८९ :**

अध्यक्ष नंदनवन सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी अर्ज देवून विनंती केली आहे की, नंदनवन कॉलनीस्थित मनपा प्राथमिक शाळेचे प्रतीमहा रू.१४०/- प्रमाणे जून १९८३ ते डिसेंबर १९८८ या कालावधीचे भाडे र.रू.९,२००/- मात्र देय आहेत. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी स्थित मनपा प्राथमिक शाळेचे प्रतिमहा रू.१४०/- प्रमाणे जुन १९८३ ते डिसेंबर १९८८ या कालावधीचे देय भाडे रक्कम रू.९,२००/- अध्यक्ष, नंदनवन सहकारी गृहनिर्माण संस्था यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९० :**

वार्ड क्र.२१ ज्युबली पार्क येथील मनपा मालकीच्या कर्मचारी निवासस्थानामध्ये वाढ करण्याच्या कामासाठी सा.बां. विभागाकडील सन ८८-८९ च्या डी.एस.आर.दराने अंदाजपत्रक र.रू. ३,६०,२००/- चे तयार करण्यात आले आहे. कामाचा खर्च भांडवली इमारती हया सदरातुन करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्युबली पार्क येथील मनपा मलाकीच्या कर्मचारी निवासस्थानामध्ये वाढ करण्याच्या कामासाठी र.रू.३,६०,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९१ :**

वार्ड क्र.४८ येथे स्टेट बँक कॉलनी उस्मानपूरा ते डॉ.जैन यांचे घरापर्यंतच्या ८० फुट डी.पी.रोडचे खडीकरणासह डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रू.२,३७,७५०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.४३० दिनांक १२-१०-८८ आणि सदर कामासाठी श्री.डी.एस.जागी यांचे अंदाजपत्रकिय दराच्या दरपत्रकास ठराव क्र.६१२ दिनांक ३.११.८८ अन्वये मान्यता मळाली आहे.

दिनांक १४-१२-८८ रोजी तुळीराम घोरपडे ले आऊट मधील भूखंडाधारकांनी अर्जाद्वारे विनंती केली कि, के आऊटमधील भूखंड धारकांना सदरचा रस्ता फारच जवळ असल्यामुळे या रस्त्याला जोडणारा घोरपडे ले आऊटमध्ये रस्ता करून देण्यात यावा. मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये सदर १४५ मीटर लांबीच्या रस्त्याचे खडीकरणासह डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८७-८८ च्या डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक र.रू.१,४७,८६५/- चे तयार करण्यात आल्यामुळे मुळ कामाचे सुधारित अंदापजत्रक (र.रू.२,३७,७५०/-+ १,४७,८६५)=३,८५,६१५/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मंजुरी देण्यात यावी. तसेच वाढीव काम मूळ काम करणारे गुत्तेदार श्री.डी.एस.जग्गी यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४८ स्टेट बँक कॉलनी उस्मानपूरा ते डॉ.जैन यांचे घरापर्यंतच्या ८० फुट डी.रोडचे खडीकरणासह डांबरीकरण करण्याचे कामासाठी तसेच तुळीराम घोरपडे ले आएफटमधील भुखंड धारकांच्या विनंतीवरून सदर रस्त्याला जोडणारा घोरपडे ले आऊटमध्ये रस्ता करण्याच्या कामासाठी रक्कम रूपये ३,८५,६१५/- (र.रू.१,४७,८३५ + २,३७,७५०) च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मूळ काम करणारे गुत्तेदार श्री.डी.एस.जग्गी यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९२ :**

वार्ड क्र.८२ मधील सिल्लेखाना ते मोंढा या ८० फूट रूंद रस्त्यचे रूंदीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७७५ अन्वये र.रू.१२,०२,७३२/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदर रस्त्याच्या कामामध्ये खालील कामांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सिडी वर्क | २७,१२२-०० |
| २) | खडी रस्त्याचे काम | ४,१४,२९५-०० |
| ३) | रोड दुभाजक व एमएम रेलिंग | ३,३०,५१०-०० |
| ४) | डांबरीकरणाचे काम | ३,८०,८०५-०० |
| ५) | मटेरियल उचलणेचे काम | ५०,०००-०० |
| | | १२,०२,७३२-०० |

अ) अ.क्र.१ चे कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एस.के.रफिक | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी |
| २) | श्री.जावेद खान | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.०६% कमी |
| ३) | श्री.अ.सलिम | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी |
| ४) | श्री.एस.ए.नवाब | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २२.२२% कमी दराची श्री.एस.के.रफिक यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

ब.) अ.क्र.५ चे कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ११ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.संजय भायवड | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.१% कमी |
| २) | श्रीएम.ए.मोईद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% कमी |
| ३) | चेअरमन परविन म.स.स. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.१% कमी |
| ४) | श्री.जावेद खान | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.५१% कमी |
| ५) | श्री.आनंद बिल्डर्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.३% कमी |
| ६) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१५% कमी |
| ७) | पॉल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.७८६% कमी |
| ८) | श्री.एस.के.मिसाळ | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.११% कमी |
| ९) | श्री.एल.एम.पडघण | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% कमी |
| १०) | एस.एच.असोसिएटस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी |

११) श्री.अ.सलम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.१५% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.१% कमी दराचे श्री.संजय भायबड यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ मधील सिल्लेखाना ते मोंढा या ८० फुट रूंद रस्त्याचे रूंदीकरण करणेच्या कामासाठी (अ) अ.क्र.१ चे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२.२२% कमी दराची श्री.एस.के.रफीक यांची निविदा आणि (ब) अ.क्र.५ चे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.१% कमी दराची श्री. संजय भायबड यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९३ :**

वार्ड क्र.४ मो.बिसमिल्ला कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत र.रू.१,५४,६३१/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.१० दिनांक २१-९-८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी दिनांक २२-११-८८ च्या सूचनेद्वारे निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा वसूल झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पॉल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७०%कमी |
| २) | शंकर गिरमील पवार | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५%कमी |
| ३) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त |
| ४) | श्री.पी.जी.तमखाने | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.७०%कमी |
| ५) | के.बी.काल्डा | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.६%कमी |
| ६) | आनंद बिल्डर्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.६%कमी |
| ७) | मेकवेल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.८६%कमी |
| ८) | श्री.एन.जी.गुणवाणी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.११%कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे श्री. शंकर गिरमला पवार यांचे दरपत्रक आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४ मधील बिसमिल्ला कॉलनी येथील १५० मी मी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे श्री. शंकर गिरमला पवार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९४ :**

बिसमिल्ला कॉलनी वार्ड क्र.४ (घाटी) येथे पुर्वरचित ३५० मी.मी. व्यासाची गटार टाकणे बाबत र.रू.१,६७,१५६/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३९९ दिनांक ५-१०-८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी दिनांक २२-११-८८ च्या सूचनेद्वारे निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा वसूल झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१) कुलवंतसिंग अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% कमी

२) एन.जी.गुणवाणी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.१५% कमी
३) एम.व्ही.नवगिरे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५०% कमी
४) शंकर गिरमील पवार अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी
५) आनंद बिल्डर्स अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.३% कमी
६) पॉल कन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९७% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराचे श्री. शंकर गिरमील पवार यांचे दरपत्रक आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बिसमिल्ला कॉलनी (घाटी) येथे पुर्वरचित ३५० मी.मी.व्यासाची गटार टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराचे श्री. शंकर गिरमीला पवार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९५ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, विद्युत कॉलनी वॉर्ड क्र.२ मध्ये नियोजित बागेच्या जागेकरीता संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.६६,९००/- चे मा. प्रशासक यांची दिनांक १०-९-८७ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. बांधकामात वाढ झाल्यामुळे या कामाचे वाढीव अंदाजपत्रक र.रू.१,१५,९००/- व हे काम मुळ कॉन्ट्रॅक्टर श्री. अब्दुल सलाम यांचेकडून मंजुरी टेंडर (२४.२४%) कमी प्रमाणे करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२ विद्युत कॉलनी मध्ये नियोजित बागेच्या जागेकरिता संरक्षित भिंत बांधण्याच्या कामात वाढ झाल्यामुळे व कामाचे वाढीव अंदाजपत्रक र.रू.१,१५,९००/-व सदर काम मुळ कॉन्ट्रॅक्टर श्री.अब्दुल सलाम यांचेकडून मंजुरी टेंडर (२४.२४% कमी) प्रमाणे करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९६ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.१२ (किराडपूरा) हत्तीसिंगपूरा अंतर्गत मनपा जागेस संरक्षित तारकुंपण करणेस्तव (साईट नं.२०५ स.नं.१०) र.रू.५३,०३०/- चे सन ८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यांत येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१२ (किराडपूरा) हत्तीसिंगपूरा अंतर्गत मनपा जागेस संरक्षित तारकुंपण करणेच्या कामासाठी रक्कम रू.५३,०३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, खासगेट जवळील सिध्देश्वर वसाहती अंतर्गत नियोजित उद्यानास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामासाठी र.रू.७३,०५०/- चे सन ८८-८९ च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खासगेट जवळील सिध्दोश्वर वसाहती अंतर्गत उद्यानास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी रक्कम रू.७३,०५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ८९८ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३१ जाधवमंडी साईट नं.५८ येथे मनपाच्या जागेस संरक्षित भिंत तारकुंपण करणेच्या कामासाठी सन ८८-८९ च्या सां.बा. खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे रक्कम रू.१८,९२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३१ जाधवमंडी (साईट नं.५८) येथे मनपाच्या जागेस संरक्षित तारकुंपण करणेच्या कामासाठी रक्कम रू.१८,९२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.८९९ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड नं.२३ कोतवालपूरा येथे बसस्थानक ते स्विमिंगपूल व आनंद निवास ते श्री.सोनवणे हयांच्या घरापर्यंत २० मी.मी.मिक्स सिल सरफेसिंग करणे बाबतच्या कामासाठी रक्कम रू.५८,२३०/- चे सन ८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावत दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२३ कोतवालपूरा येथे बसस्थानक ते स्विमिंगपूल व आनंद निवास ते श्री.सोनवणे हयांच्या घरापर्यंत २० मी.मी.मिक्स सिल सरफेसिंग करणे बाबतच्या कामासाठी रक्कम रू.५८,२३०/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९००:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.१ त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी ते भावसिंगपूरा येथे खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी र.रू.१,३०,५००/- चे सनर ८९-९० च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी ते भावसिंगपूरा येथे खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी र.रू.१,३०,५००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०१:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला कि, वार्ड क्र.२७ सिटीचौक भागातील रहदारीच्या रस्त्यावर पडलेले इमारतीचे मटेरियल उचलण्याच्या कामासाठी र.रू.१३,८००/- चे सन ८८-८९ च्या सां.बां. खात्याच्या डि.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. काम तातडीचे असल्यामुळे मटेरियल उचलण्यासाठी श्री.एस.ए.नवाब ठेकेदार यांच्याकडून अपेक्षित मंजुरी गृहित धरून उचलून घेण्यात आले आहे. सदरील खर्च डि.पी.रोड या सदराखाली करण्यात येईल .

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२७ सिटीचौक भागातील रहदारीच्या रस्त्यावर पडलेले इमारतीचे मटेरियल उचलण्याच्या कामासाठी र.रू.१३,८००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील मटेरियल ठेकेदार श्री.एस.ए. नवाब यांचेकडून उचलून घेण्यांस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०२ :**

वार्ड क्र.२१ येथील भडकलगेट ते सिटीक्लब या १०० फुट डी.पी.रोडवर यु.सी.आर. संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी

अ) सन १९८८-८९ चे सा.बां.खात्याचे डी.एस.आर दराचे रक्कम रूपये ३८,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

ब) सदरचे काम तातडीचे असल्यामुळे व मा. आयुक्त यांचे आदेशान्वये अल्पमुदतीचे दरपत्रक मागविण्यात आले असता एकूण तीन दरनिर्दिष्ट दरपत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सलिम अहेमद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त |
| २) | श्री.रविंद्रसिंग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त |
| ३) | श्री.कुलवंतसिंग | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. (अ) व (ब) विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२१येथील भडकलगेट ते सिटीक्लब या १०० फुट डी.पी.रोडवर यु.सी.आर. संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी रक्कम रू.३८,८००/- च्या अंदाजपत्रकास आणि सदर काम तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची

निविदा असलेले ठेकेदार श्री.कुलवंतसिंग यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.९०३ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.६ मधील दिल्लीगेट जलकुंभ येथे स्लॅबवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१२,४५०/- चे तयार करण्यात आले असून सदरील काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचेमार्फत अ-१ नमुन्यावर अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आले. कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६ मधील दिल्लीगेट जलकुंभ येथे स्लॅबवर संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१२,४५०/-च्या अंदाजपत्र्ऋाकास व कामाची तातडी लक्षात घेता सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.टेकचंद ठाकूर यांचेमार्फत करून घेतलेल्या कामास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

मा. सभापती यांनी यांनतर सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८ फेब्रुवारी १९८९ रोजी भरलेल्या स्थायी समितीचा वृत्तांत शनिवार दिनांक १८-२-८९ रोजी दुपारी ३.०० वा. औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयाच्या सभागृहात सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली सभेस सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्नलिखीत स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री.इकबालसिंग गिल.
२) श्री.गंगाधर गाडे
३) श्री.यादव अशोक सायन्ना
४) श्री.अजितकुमार शेळके
५) श्री.मोतीराम नारायण घडामोडे
६) श्री.स.अ.इकबालोद्दीन स.मो.कुतुबोद्दीन
७) श्री.स.हुसेन स.अहेमद

**विषय क्र.९०४ :**

दिनांक ८ फेब्रुवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**स.स.श्री.यादव अशोक सायन्ना :** यांनी सुचविले कि, मागील सभेमध्ये जाहिरात कराचे उत्पन्न खर्च आणि तरतुद या विषयांवर चर्चा झाली होती. त्यावेळी या शिर्षकाबाबत आवश्यक ती सविस्तर माहिती पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. सदर माहिती आजच्या सभेत ठेवण्यात आली नाही. याशिवाय शहरातील एकही अनधिकृत जाहिरात बोर्ड काढण्यात आलेला नाही.

तेव्हा मागील सभेत ठरल्याप्रमाणे जाहिरात कराची संपूर्ण माहिती देण्यांत यावी. यावर खुलासा करतांना मालमत्ता अधिकारी व उप आयुक्त म्हणाले कि, शहरातील होर्डींग बाबत सर्वे करण्यात आला असून त्यानुसार १५२ अनाधिकृत व १५१ अधिकृत होर्डिंग असलयाचे निर्दर्शनास आले आहे. यासर्व होर्डिंग धारकांना दिनांक २१-२-८९ रोजी सुनावणीसाठी कार्यालयात हजर राहण्यास कळविण्यात आले आहे. याबाबत सुनावणी झाल्यानंतर प्रत्येक अधिकृत व अनाधिकृत होर्डिंग धारकांकडून जाहिरात कर वसुली विचार करण्यात येईल. अस्तित्वात असलेल्या होर्डिंग पैकी जे होर्डिंग योग्य ठिकाणी लावले नसतील असे होर्डिंग नियमाप्रमाणे हलवून अन्यत्र योग्य अशा ठिकाणी स्थलांतराचे आदेश संबंधितांना देण्यात येतील. जाहिरात कर या शिर्षकामध्ये आतापर्यंत एकूण र.रू.२७,१७७/- वसुल झाले आहेत. तसेच इमारत भाडे व मोकळी जागा यामध्ये रक्कम रू.६,६६,००५/- वसुल झाले आहेत.

**स.स.श्री.यादव अशोक सायन्ना :** यांनी विचारणा केली कि, मागील सभेमध्ये विलंबित जाहिरात कराशिवाय दंड वसुल करण्यात यावा असे ठरले होते. तेव्हा

आतापर्यंत किती होर्डिंग धारकांकडून अशा प्रकारे दंड वसूल करण्यात आले याचा खुलासा अशा होर्डिंग धारकांकडून पांच वर्षाचा कर दंड म्हणून वसुल करण्यात यावा.

होर्डिंग धारकांना पांच वर्षाचे जाहीरात करा इतका दंड लावणे किंवा जाहिरात कराच्या वसुलीस विलंब करणे याविषयी काही अनुमान लावणे आवश्यक आहे. त्यासाठी शहरातील आतापर्यंतच्या अस्तित्वात असलेल्या अधिकृत व अनाधिकृत होर्डिंग धारकांच्या प्रकरणांची सुनावणी घेणे आवश्यक आहे. त्यातून जो निष्कर्ष निघेल तो सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि त्यानुसारच आवश्यक ती कार्यवाही करता येईल, असा खुलासा उप आयुक्त यांनी केला.

चर्चेनंतर सर्वानुमते असे ठरले कि, शहरातील अधिकृत आणि अनाधिकृत होर्डिंगच्या जाहिरात कराचे वसुलीबाबत विचार विनिमयार्थ स. सभासद श्री. गंगाधर गाडे,श्री.यादव अशोक सायन्ना, श्री.इकबालसिंग गिल, श्री.स.अ.एकबालोद्यीन, श्री.मोतीराम घडामोडे आणि श्री.अजितकुमार शेळके यांचा समावेश असलेली एक उप समिती कायम करण्यांत यावी. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

मागील सभेमध्ये सिडको भागातील नागरिकांकडून एका १/२" नळ कनेक्शनसाठी प्रत्येकी दरमहाप्रमाणे पाणीपटट्री वसुल करण्यात येते. या पाणीपटट्रीचा विचार केला तर सध्या महापालिका नियमाप्रमाणे १/२" नळ कनेक्शनसाठी सिडको नागरिक शाळांना रूपये ४००/- पेक्षा जास्त पाणीपटट्री महापालिकेकडे भरतात. याच पध्दतीप्रमाणे ३/४" कनेक्शन साठी सुध्दा सिडको नागरीकांकडून वर्षाकाठी रू.७३०/- पेक्षा जास्त पाणीपटट्री वसूल केली जाते. पण प्रत्यक्षात मात्र नागरीकांना कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे. मागील सभेत चर्चा झाल्याप्रमाणे अद्यापही एकाच १/२" किंवा ३/४" व्यासाचे नळ कनेक्शनमधून देण्यात आलेल्या विविध पोट नळ कनेक्शन धारकांकडून नियमाप्रमाणे पाणीपटट्री वसूल करण्यत येत नाही. सिडको भागात १" नळ कनेक्शनस् मधून आठ आठ घरांना नळ कनेक्शन देण्यात आली आहेत. त्यांची प्रत्यक्षात वेगवेगळी देयके दिली जातात. ही चुक जर सिडको प्रशासनाची असेल तर त्या सर्व पाईप लाईन काढून त्या त्या ठिकाणी महापालिकेतर्फे नवीन ३" किंवा आवश्यकतेनुसार पाईप लाईन टाकून प्रत्येक गाळयासाठी स्वतंत्र्य १/२" नळ कनेक्शन देण्यांत यावे. अशी मागणी मा. सभासद श्री.मोतीराम घडामोडे यांनी केली व लवकरात लवकर आवश्यक तेवढया लाईन बदलण्याचे आश्वासन कार्यकारी अभिंयता (पा.पु.) यांनी दिले.

यावर खुलासा करतांना कार्यकारी अभिंयता (पाणी पुरवठा)म्हणाले कि, सिडको भागातील ज्या ब्लॉकला मुळ १/२" किंवा ३/४ " नळ कनेक्शनमधून दोन किंवा त्यापेक्षा जास्त पोट कनेक्शनन्स देण्यांत आले असतील तर अशा ब्लॉकबाबत नियमाप्रमाणे पाणीपटट्री वसूल करण्यात येईल. ही बाब फक्त ३/४" मधून जर १/२" दोन दिले असतील तरच लागू राहील. १" व त्याहून वरच्या पाईपलाईन बाबत असणार नाही.

सभागृहात संबंधित कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी केली जाते पण प्रत्यक्षात मात्र त्यावर कार्यवाही होत नाही, ही बाब योग्य

नाही. मागील सभेमध्ये वैद्यकिय अधिकरी, यांच्या चौकशीची मागणी करण्यात आली होती. पण अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसलयाचा खुलासा स. सभापद श्री. गंगाधर गाढे व श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केला. तसेच ज्या कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे काळात जाहीरात कर वसुलीबाबत महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असेल अशा सर्व संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. याशिवाय सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही बऱ्याच नागरिकांना शहरात होर्डिंग लावण्याची परवानगी अद्याप का देण्यात आली नाही. याबाबतही चौकशी करण्यात यावी.

यावर खुलासा करतांना उप आयुक्त म्हणाले कि, सर्व आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता होत असेल, अशा नविन अर्जदार संस्थांना इत:पर नियमाप्रमाणे होर्डिंग लावण्याची परवानगी देण्याबाबत विचार केला जाईल.

**ठराव :**

दिनांक ८ फेब्रुवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०५ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५० मधील मो.उस्मानपूरा (बाजार मस्जीदच्या मागे) ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१९,१५४/- चे असून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५० मो.उस्मानपूरा (बाजार मस्जीदच्या मागे) येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रकास र.रू.१९,१५४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०६ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३९ मधील जालना रोड (व्हाया कैलास मोटर्स प्रांगण) ते कैलासनगर पर्यंत ६" व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रूपये ६०,१९७/- चे असून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३९ मधील जालना रोड (व्हाया कैलास मोटर्स प्रांगण ) ते कैलासनगर पर्यंत ६" व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रूपये ६०,१९७/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०७ :**

. जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५३ मधील जालान नगर येथील १५० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाची अे.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१,७६,४४०/- चे असून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५३ मो जालाननगर येथे १०० मी.मी. व १५० मी.मी. व्यासाची ॲ.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१,७६,४४०/-/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०८ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्रमांक १२ मधील मलिकांबर सोसायटी किराडपूरा येथे अंतर्गत वितरण व्यवस्थेसाठी ८० मी.मी.व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२४,३२०/- चे असून ठराव क्र.७७ दिनांक ५-८-८८ अन्वये स्थायी समितीने सदरील अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. मनपा / पापु/६६० दिनांक १७-८-८८ अन्वये पाईपसह निविदा मागविण्यात आल्या असता एकच निविदा प्राप्त झाली असून ती संजीव खर्डीकर यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% जास्त दराची आहे.

पुन्हा सदरील कामासाठी मनपा /पापु/५३४/ दिनांक ५-११-८८ अन्वये पाईप वगळता फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकच निविदा प्राप्त झाली असून ती ठेकेदार श्री.ॲ.ॲ.अबेदी यांची असून अंदाज पत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची आहे. मनपा /पापु/८५६/८८दिनांक २१-१२-८८ अन्वये निविदेतील दर कमी करणे विषयीचे पत्र सदरील ठेकेदारास दिले असता त्यांनी २% दर कमी केले आहेत. त्यामुळे त्यांची २% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव सादर.(टिप- सदरील कामात निविदा र.रू.७,९२५/-इतकी आहे.) विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१२ येथील मलिकांबर सोसायटी किराडपूरा अंतर्गत जलवितरण व्यवस्थेसाठी ८० व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम गुत्तेदार श्री.ॲ.ॲ.आबेदी यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९०९ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५७ मधील ज्योतीनगर सी.टी.एस.नं.१६२९५/४ ते १४ व १८ ते २४ भागात १०० व ८० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.३५,९६५/- ठराव क्र.१९ दिनांक २९-६-८८ अन्वये मंजुर झालेले आहे. मनपा /पापु/६६ दिनांक १६-८-८८ अन्वये पाईपसह निविदा मागविल्या असता पुढीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.बी.पवार | १६% कमी |
| २) | श्री.एच.डी.कटारीया | ३७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया पवार यांची निविदा कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची आहे.

यानंतर इतर प्रकरणी सोबत सदरील कामासाठी पाईप वगळता फेरनिविदा (मनपा/पापु/५३४ दिनांक ५-११-८८ ) अन्वये मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | अर्शिद नोमी | ३% जास्त दराने |
| २) | के.बी.काल्डा | ४.९५%जास्त |

३)	परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस	४.५ % जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया ठेकेदार श्री. अर्शद नोमी यांची निविदा कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची आहे. मनपा /पापु/७४३/८८ दिनांक २९-१२-८८ अन्वये ठेकेदार श्री. नोमी यांना दर कमी करणे विषयीचे पत्र दिले असता त्यांनी १% दर कमी केले.

करीता ठेकेदार श्री. अर्शद नोमी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराची निविदा स्विकारणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ येथील ज्योतीनगर भागात सी.टी.एस.नं.१६२९५/४ ते १४ व १८ ते २४ येथे ८० व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम गुत्तेदार श्री. अर्शद नोमी यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुंमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.९१० :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.७ मधील दमडीमहल सी.टी.एस. नं.११३१२/२ येथील मंजुर रेखांकनामध्ये ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रकीय र.रू.२९,७००/- स ठराव क्र.५८८ दिनांक २४-११-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. निविदेतील रक्कम ६,७३५/- इतकी आहे.

मनपा /पापु/८९७/८८ दिनांक २६-१२-८८ अन्वये जाहिररित्या निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

१)	श्री.के.बी. काल्डा	१.९% जास्त
२)	श्री.बी.एम.काथार	७ % जास्त

तुलनात्मकदृष्टया के.बी.काल्डा यांची निविदा कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९ % जास्त दराची आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७ येथील दमडीमहल सी.टी.एस. नं.११३१२/२ येथील मंजुर रेखांकनामध्ये ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.९% जास्त दराच्या श्री.के.बी.काल्डा यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९११ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५० मधील उस्मानपूरा चौक ते पीरबाजार चौक अशी १५० मी.मी. व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अदांजपत्रक र.रू.९१,९७०/- चे असून ठराव क्र.५२९ दिनांक २४-११-८८ अन्वये मंजुर झालेले आहे. निविदेतील र.रू.१७,७२९/- इतकी असून सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

१)	श्री.बी.एम.काथार	२.०१% जास्त
२)	श्री.के.बी. काल्डा	६.०२% जास्त

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०१% जास्त दराची श्री.बी.एम.काथार यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५० मधील उस्मानपूरा चौक ते पीरबाजार चौक अशी १५० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.०१% जास्त दराच्या श्री.बी.एम.काथार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९१२ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५८ मधील उत्कानगरी येथे १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.२६,२००/- ठराव क्र.१९ दिनांक २९-६-८८ अन्वये मंजुर झालेले आहे. दिनांक १६-८-८८ च्या सूचनेद्वारे पाईपसह निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

१) श्री.पी.बी.पवार २% कमी दराने

२) श्री.अे.अे.आबेदी २०% जास्त

तुलनात्मकदृष्टया ठेकेदार श्री. पवार यांची निविदा कमी दराची आहे.

यानंतर पाईप वगळता फेरनिविदा दिनांक ५-११-८८ च्या सूचनेद्वारे मागविण्यात आल्या असता फक्त एकच निविदा श्री. अर्शद नोमी यांची ४.५% जास्त दराची प्राप्त झाली. दिनांक १९-१२-८८ रोजी पत्राद्वारे ठेकेदारास दर कमी करणेविषयी पत्रक दिले असता तयांनी २% दर कमी केले आहेत. ठेकेदार श्री. अर्शद नोमी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% जास्त दराची निविदा स्विकारणेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५८ येथील उल्कानगरी येथे १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम (फेरनिविदा नुसार) गुत्तेदार श्री. अर्शद नोमी यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९१३ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.२३ मधील कोहीनूर कॉलनी येथे १५० व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक दिनांक १७-८-८८ च्या सूचने र.रू.९१,०००/- चे असून ठराव क्र.७४ दिनांक ५-८-८८ अन्वये मंजुर इ ाालेले आहे.

दिनांक १७-८-८८ च्या सूचने अन्वये पाईपसह निविदा मागविण्यात आल्या असता पुढीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

१) सजनानी कन्सस्ट्रक्शन्स २१.७०% जास्त

२) अे.अे. आबेदी २३.१० % जास्त

तुलनात्मकदृष्टया सजनानी कन्सट्रक्शन यांची निविदा कमी दराची आहे. दिनांक ५-११-८८ च्या सूचनेद्वारे फेरनिविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या

१) सजनानी कन्सस्ट्रक्शन्स ४.०९% जास्त

२) अे.अे. आबेदी ६.१३ % जास्त

तुलनात्मकदृष्टया सजनानी कन्सट्रक्शन यांची निविदा कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.०९% जास्त दराची आहे. दिनांक २१-१२-८८ च्या पत्रान्वये गुत्तेदारास दर कमी करणे विपषयीचे पत्रक दिले असता त्यांनी १.०९% दर कमी केले आहेत.

करीता सजनानी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकारणेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले कि, प्रस्तावित कामासाठी प्राप्त झालेली निविदा जास्त दराची असल्यामुळे संबंधित गुत्तेदार प्रस्तावित काम अंदाजपत्रकीय दराप्रमाणे करण्यास तयार असल्यास अशी विचारणा करण्यात यावी. येणेप्रमाणे संबंधिताने संमती न दिल्यास या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत.

**विषय क्र.९१४ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वॉटर टँकर क्रमांक एम.डब्ल्यू.पी.१४३८ चे टँकरच्या खालची बाजू सडल्यामुळे सदर टँकरचा अर्धा भाग नवीन तयार करून घेण्यासाठी र रू.२१,०००/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार सदर कामासाठी दरपत्रके भागविली असता फक्त एकच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची मे. हरप्रीत इंटरप्राईजेस औरंगाबाद यांची प्राप्त झाली.

विचारार्थ सादर.

**संवाद :**

सभागृहाच्या मंजुरीनुसार विरोधी पक्ष नेता यांना जी कार देण्यात आली ती डिलक्स नाही. तेव्हा विरोधी पक्ष नेत्यांना देण्यांत आलेली आहे कार साधी आहे किंवा इतर कोणत्या प्रकारची आहे याबाबतचा खुलासा करण्यांत यावा. या प्रकरणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय आहे अशी मागणी स. सभासद यादव अशोक सायन्ना, श्री. गंगाधर गाडे यांनी केली यावर शहर अभियंता यांनी खुलासा केली कि, याबाबतची सविस्तर माहिती आगामी सभेत सभागृहाला देण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी एकच दरपत्रक प्राप्त झाल्यामुळे या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले.

**विषय ९१५ :**

अग्निशामक दलासाठी नविन फायर टेंडर १२१० टाटा मॉडेल अंदाजित किंमत ६.५० लाख खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सदरचे वाहन खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समिती समोर ठेवण्यात येतो. सदरचे वाहन घसारा निधीमधून जुनी वाहने लिलाव करून खरेदी करण्याची शिफारस लेखाधिकारी यांनी केलेली आहे. या वाहनाचे खरेदीच्या खर्चास मंजुरी मिळाल्यान्नतर खरेदी व्यववहाराबाबत शहर अभियता यांचेकडून वैधानिक कार्यवाही करण्यांत यावी.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशामक दलासाठी १२१० टाटा मॉडेलचे नवीन फायर टेंडर खरेदी करण्यासाठी र.रू.६,५०,०००/- च्या अंदाजित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदरचे वाहन, वाहन घसारा निधीतून खरेदी करण्यांत यावे.

**विषय क्र.९१६ :**

वार्ड क्र.४८ येथील न्यु श्रेयनगर येथील एस.एस.चौधरी ले आऊट अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन १९८८-८९ चे डी.एस.आर.दराने र.रू.३८,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या शिर्षावर झालेल्या बचतीमधून करण्यांत येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४८ येथील न्यु श्रेयनगर येथील एस.एस.चौधरी ले आऊट अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे सन १९८८-८९ चे डी.एस.आर.दराने र.रू. ३८,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९१७ :**

वार्ड क्र.४५ येथील पैठणगेट ते मार्गे जिजामाता कॉलनी सन्मित्र कॉलनी पर्यंतचे रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याचे ८८-८९ च्या डी.एस.आर. दराने रक्कम रू. ४,१४,४३२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च ८८-८९ च्या आर्थिक वर्षात भांडवली रस्ते या शिर्षावर झालेल्या बचतीमधून करण्यांत येईल विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४५ येथील पैठणगेट ते शारदाश्रम (जयहिंद कॉलनी,जिजामता कॉलनी ) आणि सन्मित्र कॉलनी पर्यंतचे रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रू. ४,१४,४३२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. रस्त्यावरील वाहतुक लक्षात घेता काम त्वरीत हाती घेण्यात यावे.

**विषय क्र.९१८ :**

प्रतीवर्षीप्रमाणे मनपा सांस्कृतिक विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या संगीत स्पर्धा व महिलांच्या भजन स्पर्धा घेण्यास व १९८८-८९ च्या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार या स्पर्धांसाठी रक्कम रू.१२,०००/- खर्च करण्याचा प्रस्ताव मुंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सांस्कृतिक विभागातर्फे घेणाऱ्या संगीत आणि (महिला) भजनी स्पर्धा यासाठी रक्कम रू.१२,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.९१९ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वॉर्ड क्र.७ मधील रोझाबाग येथे संरक्षित भिंत बांधणेच्या कामा अंतर्गत रक्कम रू.११,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात

आले असून सदरील काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदारामार्फत करून घेणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७ रोजेबाग येथे संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रू.११,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२० :**

औरंगाबाद महानगरपालिका क्रिडा अधिकारी यांनी प्रस्ताव दिला आहे कि, महापालिकेच्या शालेय मुला-मुलींसाठी (इयत्ता ५ वी ते ७ वी करीता) विविध मैदानी स्पर्धा आयोजित केल्या असून त्यातील प्रथम व द्वितीय विजेत्या खेळाडूंना प्रतिवर्षीं र. रू.२००/- क्रिडा शिष्यवृत्ती दिली जाते. यावर्षी २४ खेळाडूंना शिष्यवृत्ती दिली जाईल. तसेच स्पर्धेकरीता २४ बक्षीसे वितरण समारंभ व अन्य खर्चाकरिता अंदाजे र. रू.१०,०००/- खर्च अपेक्षित आहे . विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या इयत्ता ५ वी ते ७ वी शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित विविध मैदानी स्पर्धेमधून विजयी होणाऱ्या प्रथम व द्वितीय खेळाडूंना प्रथम व द्वितीय खेळाडूंना प्रथम व द्वितीय अशा चोवीस खेळाडूंना रू.२००/- प्रतयंकी शिष्यवृत्ती, चोवीस बक्षिसे, बक्षीत वितरण समारंभ आणि अन्य खर्चाकरिता रू.१०,०००/- च्या खर्चास मंजुरी देण्यात येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.९२१:**

वार्ड क्र.४९ येथील शिवाजी सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सा.बां. खात्याकडील सन १९८८-८९ चे डी.एस.आर. दराने र.रू. ५,८६,०००/- चे अंदापजत्रक तयार करण्यात आलेले आहे, सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४९ येथील श्री.शिवाजी सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रू.५,८६,०००/-० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२२ :**

वार्ड क्र.१० औद्योगित परिसरातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सा.बां. खात्यचे डी.एस.आर. दराने र.रू. ४,०३,५४४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१० औद्यगिक परिसरा अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रू.४,०३,५४४/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२३ :**

वार्ड क्र.५७ शहानुरवाडी येथील रामचंद्र नगर अतंर्गत खडी रस्त्याचे कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७५५/- अन्वये रक्कम रू.३९,२९०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. शेवटच्या तारखेपर्यंत एकूण नऊ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.खुर्शिद अली | ३०.२५% कमी दराने |
| २) | श्री.पालन कन्स्ट्रक्शन | २४.६७% कमी दराने |
| ३) | श्री.सुखबीरसिंग | २२.२२% कमी दराने |
| ४) | श्री.जावेद खान | २२.२% कमी दराने |
| ५) | चेअरमन प.म.स.स. | २२.९०% कमी दराने |
| ६) | कुलवंतसिंग | २२.७०% कमी दराने |
| ७) | श्री.अब्दुल सलाम | १६% कमी दराने |
| ८) | श्री.एच.डी.कटारिया | १% कमी दराने |
| ९) | एस.एच.असोसिएट्स | १५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३०.२५% कमी दराची श्री. खुर्शिद अली यांची निविदा आहे. निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ शहानुरवाडी येथील रामचंद्रनगर अंतर्गत खडी रस्त्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.२५ % कमी दराची श्री.खुर्शिद अली यांची निवदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२४ :**

वार्ड क्र.४२ सिल्लेखाना ते मोंढा या रस्त्यावर कोपऱ्यावर असलेल्या कब्रस्तानास रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७७१अन्वये र.रू.१,००,०३७/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तेरा निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.स.तैफिक अहेमद | २६.७८६% कमी दराने |
| २) | श्री.एस.के.रफिक | २६.१% कमी दराने |
| ३) | श्री.वसंत पाटील | २१.३% कमी दराने |
| ४) | श्री.कुलवंतसिंग | २०.७०% कमी दराने |
| ५) | श्री.अ.सलिम | १७.२०% कमी दराने |
| ६) | श्री.अ.सत्तार अ.रहिम | १७.५% कमी दराने |
| ७) | श्री.एस.ए.नवाब | १५% कमी दराने |
| ८) | श्री.के.बी.काल्डा | १४.२% कमी दराने |

९)    श्री.आनंद बिल्डर्स    १४.२% कमी दराने
१०)    श्री.एन.जी.गुणवाणी    १५.१५% कमी दराने
१२)    श्री.एस.एच.असोसिएट    १३% कमी दराने
१३)    श्री.पाल कन्स्ट्रक्शन    १२.७८६% कमी दराने
१४)    श्री.एल.एम.पडघण    १२% कमी दराने

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २६.७८६ मी दराची श्री.स.तैफिक यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ सिल्लेखाना ते मोंढा या रस्त्याचे कोपऱ्यावर असलेल्या कब्रस्तानास रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.७८६% कमी दराची श्री.तैसिफ अहेमद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२५ :**

उस्मानपूरा रंगमंदिर (बचतभवन) च्या विश्रामगृहासाठी फर्निचरचे कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १७-८-८८ ठराव क्र.२७० अन्वये रक्कम रू.१,२७,०००/- सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. पंरतू सदर कामामध्ये ॲटम नं.१५ गँग वे प्लेअर मेट र.रू.३६०००/- आणि ब्रोकिंग ॲटम नं.१६ रक्कम रू.२०,०००/- एकूण ५६,०००/- हे ॲटम वगळण्यात आलेले आहेत. सबब अंदाजपत्रक र.रू.७०,२५०/- चे होत आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नांव | निविदा रक्कम | दर भरलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १) | मेहर फर्निचर | ७०,२५० | ६०.९७० |
| २) | एम.एस.एस.आय.डी.सी. | ७०,२५० | ६१.०८५ |
| ३) | स्टार स्टिल बुडन फर्निचर | ७०,२५० | निविदा अपूर्ण भरलेली |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा कमी दराची मे.मेहर फर्निचर यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपूरा रंगमंदिर (बचतभवन) च्या विश्रामगृहाअंतर्गतचे फर्निचर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी म्हणजे र.रू.९०,९७०/- या दराची मे.मेहर फर्निचर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

**विषय क्र.९२६ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगपूरा बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय, अदालत रोड पर्यंत रस्त्याचे (८० फुट डी.पी.) रूंदीकरण करणे व विभाजक बांधणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ५-१-८९ ठराव क्र.७८० नुसार

मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा दर्शनिर्दिष्ट प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.अजितसिंग | २३.२५% कमी |
| २) | श्री.एन.जी.गुणवाणी | २२% |
| ३) | श्री.कुलवंतसिंग | १४.७०% कमी |
| ४) | एस.एच.असोसिएट्स | १३% कमी |
| ५) | एस.ए.नवाब | ६.५% कमी |
| ६) | श्री.जी.एम.बालचंदानी | ०.२५% कमी |
| ७) | श्री.एल.एम.पडघण | १६.७८६%कमी |
| ८) | श्री.ए.सी.कोठारी | २.५१% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी दराची श्री.डी.अजितसिंग यांची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपूरा, बलवंत वाचनालय ते उच्च न्यायालय, अदालत रोडपर्यंत रस्त्याचे (८० फुट डी.पी.) रूंदीकरण करणे व विभाजक बांधणेच्या कामासाठी तुलनात्मदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.२५% कमी दराची श्री. डी.अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.२१ येथील भडकलगेट ते सिटी क्लब या १०० फुट डी.पी.रोडचे खडी रस्त्याचे तसेच फुटपाथ व दुभाजक काम करणेसाठी सन १९८८-८९ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने र.रू. १०,९३,७२४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरचा खर्च डी.पी.रोड या सदरातून करण्यात येईल. अंदाजपत्रक विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२१ येथील भडकलगेट ते सिटीक्लब या १०० फुट डी.पी.रोडचे खडी रस्त्याचे तसेच फुटपाथ व व दुभाजक काम करणेसाठी र.रू.१०,९३,७२४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२८:**

उप अभिंयता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, दिनांक २४.११.८८ च्या स्थायी समिती ठराव क्र.५९७ अन्वये मो. शहाबाजार स्लम वार्ड क्र.१४ येथील फरशी बसविणेच्या र.रू.३२१२५/- च्या खर्चास मान्यता मिळाल्यानंतर सदरील काम अ-१ नमुन्यावर करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण तेथील वातावरण आरोग्यास अत्यंत धोकादायक आहे. करिता सदरचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.प्रकाश गायकवाड यांचेकडून करवून घेणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१४ येथील मो.शहाबाजार स्लम भागात फरशी बसविणेचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.प्रकाश गायकवाड यांचेकडून "अ-१" नमुन्यावर करवून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९२९ :**

उप अभियंता (ग.व.) यानी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.१ भावसिंगपूरा (भिमनगर) येथे दगडी पुल बांधण्याचे अंदाजपत्रक र.रू.८५,०००/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजूरीकरीता विचारार्थ सादर. मंजुरी मिळाल्यास उपलब्ध गुत्तेदारातर्फे काम करून घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ भावसिंगपूरा (भिमनगर) येथे दगडी पूल बांधण्यासाठी र.रू.८५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३० :**

शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी खात्यात एकूण र.रू.३,०५,८१०/- जमा आहेत. त्यापैकी र.रू.२,००,०००/- दोन लक्ष फक्त ५ १/२ वर्षाकरीता किसान विकास पत्रात गुंतविण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. यापुर्वी देखील सदर निधीची रक्कम किसान विकास पत्रात गुंतविण्यात आली आहे.

तसेच मनपा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यात एकूण रक्कम रू.१२,३२,८३५/- जमा आहेत. त्यापैकी र.रू.१०,००,०००/- (दहा लक्ष फक्त) ५१/२ वर्षाकरीता किसान विकास पत्रात गुंतवणूकीची परवानगी मिळावी. यापूर्वी ही सदर निधीची रक्कम किसान विकास पत्रात गुंतविण्यात आली आहे.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेल्या रक्कमेपैकी र.रू.२,००,०००/- (दोन लक्ष फक्त) ५१/२ वर्षाकरीता किसान विकास पत्रात गुंतविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच मनपा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असलेल्या रक्कमेपैकी र.रू.१०,००,०००/- (दहा लक्ष फक्त) ५१/२ वर्षाकरीता किसान विकास पत्रात गुंतवणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३१ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, ठराव क्र.७४९ दिनांक ५-१-८९ अन्वये सूपर मार्केट औरंगपूरा येथील पार्ट "ए" आणि "बि" पैकी पार्ट " ए " च्या कामासाठी मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराच्या दरपत्रकास मंजुरी मिळाली आहे.

दिनांक ५-१-८९ च्या ठरावानुसार गुत्तेदार लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांना पार्ट "ए" चे वरील (वायरींग) काम करण्यास सूचित केले असता संबंधिताने फक्त पार्ट "ए" चे

काम परवडण्यासारखे नसल्यामुळे दिलेल्या ९% जास्त दरावर आणखी १०% जास्त दर मंजुर केल्यास पार्ट "ए" चे काम करण्यास तयार आहे.

वरील प्रकरणी मा. आयुक्त आणि मे. लुना इलेक्ट्रीकल्स यांचेकडील दिनांक १३-२-८९ च्या संयुक्त चर्चेनुसार सुपर मार्केट येथील पार्ट "ए" पूर्ण आणि पार्ट "बी" पैकी ॲटम क्र.६सिलिंग पंखे बसविण्याचा पार्ट वगळून (म्हणजेच ॲटम नं.६ ची र.रू.९१,२००/- कमी करून) पार्ट "बी" चे काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांनी मंजुर दरात म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने करून देण्याचे मान्य केले आहे.त्यानुसार पार्ट "बी" पैकी ॲटम ६ ची बाब वगळता पार्ट "बी" च्या कामासाठी (मुळ निविदा रक्कम रू.१,८६,०००/-(ॲटम क्र.६ ची बाब वगळता) रू.९४,०००/- च्या खर्चास आणि पार्ट बी चे काम मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचेकडून मंजूर दराने म्हणजे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने करून घेण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपूरा येथील सुपर मार्केटच्या विद्युतीकरणाचे पार्ट "बी" चे कामापैकी ॲटम नं.६ प्रमाणे सिलिंग फॅन बसविण्याची बाब वगळून म्हणजेच या ॲटमची र.रू.९१,२००/- कमी करून पार्ट " बी " ॲटम क्र.६ ची बाब वगळता पार्ट "बी" च्या कामासाठी (मुळ निविदा रक्कम रू.१,८६,०००/-वजा ॲटम नं.६ ची रक्कम रू.९४,०००/- च्या खर्चास आणि पार्ट "बी" चे विद्युतीकरणाचे कामासाठी र.रू.९४,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत यते. पार्ट "बी" मधील विद्युतीकरणाचे काम मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद या (ॲटम नं.६ वगळून) पूर्वीच्या गुत्तेदाराकडून मान्य दराने म्हणजेच अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ९% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका औरंगाबाद | स्थायी समिती |
| | महानगरपालिका औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २३ फेब्रुवारी १९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या विशेष स्थायी समितीचा वृत्तांत गुरूवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयाच्या सभागृहात सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखालील सभेस सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्न लिखीत स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री. इकबालसिंग प्रितमसिंग गील
२) श्री.गाढे गंगाधर सुखदेव
३) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
४) श्री.यादव अशोक सायन्ना
५) श्री.अजितकुमार शेळके
६) श्री.मोरेश्वर दिनानाथ सावे
७) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
८) श्री.कचरू चंद्रभान नवपुते
९) श्री.अहमद एकबालुद्यीन स.मो.कुतुबुद्यीन
१०) श्री. स.हुसेन स.अहमद

**विषय क्र.९३२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५ अन्वये औरंगाबाद महानगरपालकेचे १९८८-८९ चे सुधारित व सन १९८९-९० चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीस विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. आयुक्त यांनी सादर केलेल्या सन १९८८-८९ चे सुधारित व सन १९८९-९०चे मूळ अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होवून उक्त अंदाजपत्रकास खाली दर्शविल्याप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

औरंगाबाद महानगरपालिकेचे सन १९८८-८९ चे सुधारित अंदाजपत्रकातील महत्वाच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

सन १९८८-८९ सालाचे मूळ अंदाजपत्रकात एकूण महसूली उत्पन्न १६ कोटी २८ लाख ७१ हजार हरूपयाचे अपेक्षित धरण्यात आले होते व आरंभीची शिल्लक २ कोटी ८५ लाख ८० हजार रूपये अपेक्षित धरून एकूण महसूली उत्पन्न १९ कोटी १४ लाख ५१ हजार रूपये गृहित धरण्यात आले होते.

सर्वसाधारण सभेने कर वसुलीच्या नवीन पध्दतीने कर वसुली करणेस तात्पुरती स्थगिती दर्शविल्याप्रमाणे त्याची वसुली सन १९८८-८९मध्ये होवू शकली नाही. त्यामुळे सुधारित प्राप्ती १६ कोटी २८ लाख ७१ हजार ऐवजी १५ कोटी ८१ लाख ३१ हजार अपेक्षित आहे व ती ४७ लाख ४० हजाराने कमी होईल. सुधारीत अंदाजपत्रकात सुरूवातीची प्रत्यक्ष शिल्लक ३,७४,०९,०००/- झाल्यामूळे एकूण उत्पन्न रु. १९,५५,४०,०००/- चे अपेक्षित आहे.

१९८८-८९ चे मुळ अंदाजपत्रकात कर्मचाऱ्यांचे पगार व भत्यावरील खर्च ५ कोटी ६० लाख ४१ हजार रुपये अपेक्षित धरण्यात आला होता. महाराष्ट्र शासन त्यांच्या कर्मचाऱ्यांस जेव्हा जेव्हा महागाई भत्ता व इतर भत्ते वाढतील तेव्हा तेव्हा महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ते देण्याचा प्रस्ताव आहे. त्यामूळे कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते सानुग्रह अनुदानावर खर्च वाढला असून तो आता ५ कोटी ८४ लाख ५० हजार रुपये इतका झाला आहे. म्हणजे रक्कम रु. २४,०९,००० ने वाढला आहे.

निवडणूकीनंतर पदाधिकाऱ्यांचे मानधन, बैठका, भत्तेवाहनावरील खर्च वाढला आहे. त्यामुळे महसूली खर्चात वाढ झाली आहे. एकूण अपेक्षित महसूली खर्च रूपये ११ कोटी ४० लाख २६ हजार अपेक्षित होता आता सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे तो ११ कोटी ८७ लाख १७ हजार होईल.

अक्षेपीत मूळ व सुधारित अंदाजपत्रक १९८८-८९ खालील प्रमाणे आहे.

(आकडे हजारात)

| | मुळ अंदाजपत्रक | सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | १९८८-८९ | १९८८-८९ |
| महसूली उत्पन्न | २८,५८० | ३७४०९ |
| १) जकात कर | ७५००० | ७५००० |
| २) एकत्रित मालमत्ता | २५००० | २५००० |
| ३) पाणीपटट्टी | २०००० | २०००० |
| ४ इतर कर | ११५०० | ८१७० |
| **एकूण** | **१,३१,५००** | **१,२७,१७०** |

| | | |
|---|---|---|
| विशेष कायद्यान्वये वसुली | ११५ | ११५ |
| कराव्यतिरिक्तउत्पन्न | ८१९० | ७१२२ |
| देणग्या | १७५४४ | १८८३४ |
| संकीर्ण | २३३२ | १९३२ |
| इतर उचल | ३१९० | २९५८ |
| **एकूण** | **१६२८७१** | **१५८१३१** |

| | | | |
|---|---|---|---|
| शिल्लकेसह उत्पन्न | | **१९१४५१** | **१९५५४०** |
| महसूली खर्च | | | |
| १) | सामान्य प्रशासन | १३४२६ | १३९४७ |
| २) | सार्वजनिक सुरक्षितता | ५२५९ | ५०१७ |
| ३) | सार्वजनिक आरोग्य | ५९९४५ | ६४८६२ |
| ४) | लोकशिक्षण | १९३२७ | १९२२७ |
| ५) | किरकोळ | ४०५५ | ३९५० |
| ६) | इतर उचल | १२०१४ | ११७१४ |
| ७) | महसूली मधून भांडवलीकडे वर्ग | ७७३०० | ७३००० |
| | एकूण | १९१३२६ | १९१७१७ |
| | शिल्लक | १२५ | ३८२३ |

सन १९८९-९०चे अंदाजपत्रकातील महत्वाच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.
सन १९८९-९०चे अंदाजपत्रकात प्रामुख्याने उत्पन्न ८ कोटी रूपये जकात, ५ कोटी रूपये मालमत्ता कर २ कोटी रुपये पाणीपट्टी हया बाबींचा समावेश आहे व एकूण उत्पन्न १९,४७,२२,०००/- रूपये आहे.

सन १९८९-९० सालात एकूण खर्च १९ कोटी ८५ लाख ४५ हजार रूपये अपेक्षित आहे.

यात महसूली खर्च १३ कोटी ४६ लाख ८५ हजार एवढा आहे.
सदरचा खर्च प्रामुख्याने कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते, दैनंदिन देखभाल, बैठकी खर्च, शिक्षण सार्वजनिक आरोग्य इत्यादी बाबींवरच आहे.

शासनाकडून विविध योजनांसाठी कर्ज घेण्यात आले आहे. याची परत फेड महानगरपालिकेतर्फे नियमित करण्यात येते. औरंगाबाद शहरासाठी पाणी पुरवठयाच्या दोन योजना परिसर अभियांत्रिकी विभगातर्फे राबविण्यात येत आहेत. यापैकी एक योजना शासनाची आहे. त्यावर १०% लोकवर्गणी द्यावी अशी शासनाची मागणी आहे. आणि दुसरी योजना (१८कोटी रूपयांची ) ती पूर्णपणे महानगरपालिकेचे आहे. महापालिकेस शासनातर्फे फक्त २३.५% अनुदान मिळणार आहे. व उर्वरित रक्कम महानगरपिालकेस उभी करावी लागणार आहे. त्यासाठी मागील वर्षी आयुर्विमा महामंडळाकडून शासनातर्फे कर्ज मिळाले आहे. ती रक्कम परिसर अभियांत्रिकी मंडळातर्फे परस्पर वर्ग होणार आहे. त्या कर्ज परत फेडीची तरतुदही या अंदाजपत्रकात केलेली आहे. त्यामुळे कर्ज परतफेडीचा फार मोठा बोजा महापालिकेकडे पडलेला आहे.

कर्मचाऱ्यांचे पगार व भत्त्यावरील खर्चाचे प्रमाण उत्पन्नाचे मानाने ३५% येते. तरीही खर्चात काटकसर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांचे कर्मचाऱ्यांना नविन वेतनश्रेणी लागू केली आहे. ती महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा प्रस्ताव आहे व त्यादृष्टीने कार्यवाही चालू आहे. त्यापोटी फार मोठा बोजा महानगरपालिकेवर पडणार आहे. त्यापोटी अंदाजपत्रकात अंदाजे ४६ लाख रूपयाची तरतुद केलेली आहे. त्यापेक्षाही खर्च जास्त अपेक्षित आहे. तसेच दरवर्षी कर्मचाऱ्यांना सानूग्रह अनुदान, घरबांधणी कर्ज, वाहन खरेदी कर्ज, औषधी खरेदी वरील खर्च अंदाजपत्रक तयार करताना करण्यात आला आहे.
कर्मचाऱ्यांना काम करण्यास प्रात्साहन मिळावे, त्यांच्यात चुरस निर्माण व्हावी म्हणून उत्कृष्ट काम करणाऱ्यांना बक्षिसे देण्याची योजनाही आमलात आणली जात आहे व त्यासाठी वेळगी तरतुद अंदाजपत्रकात केली आहे.

कर्मचाऱ्यांचे कामात सुसूत्रता यावी, त्यांना चांगल्या प्रकारे काम करण्याचे प्रशिक्षण योजना तयार करण्यात येत आहे व त्याद्वारे कार्यालयीन कामात सुसूत्रता येवून जनतेचे काम जलदगतीने कशी निकाली काढील जातील. हया दृष्टीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

त्यासाठी अंदाजपत्रकात २५ हजार रूपयांची तरतुद करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद | स्थायी समिती |
| | महानगरपालिका औरंगाबाद |

# ०औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ८ मार्च १९८९ रोजी भरलेल्या स्थायी समितीचा वृत्तांत बुधवार दिनांक ८ मार्च १९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयाच्या सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखालील सभेस सुरूवात झाली या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्नलिखीत स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री.एकबालसिंग प्रितमसिंग गिल
२) श्री.यादव अशोक सायन्रा
३) श्री.अजितकुमार शेळके
४) श्री.मोरेश्वर दिनानाथ सावे
५) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
६) श्री.स.अ.एकबानोद्दीन स.अ.कुतुबुद्दीन
७) श्री.स.हुसेन स.अहमद

**विषय क्र.९३३ :**

दिनांक १८ फेब्रुवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**संवाद :**

**मा.सभापती :** यांनी दिनांक १८-२-८९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत सूचना मांडली असता स.सभासद श्री.यादव अशोक सायन्न यांनी सूचविले कि, दिनांक १८-२-८९ च्या स्थायी समिती सभेत शहरातील होर्डिंग आणि जाहिराती फलकाबाबत कायम करण्यात आलेल्या उपसमितीच्या बैठकीबाबत काय निर्णय घेण्यात आला हयाचा खुलासा मा. अध्यक्षांनी करावा स.सभासद श्री.मोरेश्वर सावे यांनी विचारणा केली की, आजपर्यंत अनेक उपसमिती कायम करण्यात आल्या. परंतु अशा उपसमिती कायम करतांना या उपसमिती सभांचे आयोजन कोणी करावे याचा प्रमुख कोण हयाचा निर्णय घेतला गेला नाही. पर्यायाने अशा उपसमिती सभांचे आयोजन होवू शकले नाही.

**मा.उप आयुक्तः** यांनी सुचवले क, उप आयुक्त हे मा. आयुक्ताचे सबऑर्डिनेट होत, तेव्हा सभागृहाने घेतलेल्या निर्णयांची सविस्तर माहिती मा. आयुक्तांना देणे ठरते. त्यानुसार दिनांक १८.२.८९ च्या सभेत शहरातील होर्डिंग्ज व जाहिरात फलकाबाबत स्थायी समितीने कायम केलेल्या उपसमिती बाबत मा. आयुक्त हयांना सविस्तर माहिती दिली असता मा. आयुक्त हयांना सविस्तर माहिती दिली असता मा. आयुक्तांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४ आणि ३० अन्वये स्थायी समितीला अशी उपसमिती कायम करण्याची आवश्यकता नसल्याचा खुलासा केला आहे. असे सांगून मा. उपआयुक्तांनी सभागृहाला अधिनियमाचे कलम २४ आणि ३० वाचून दाखविले.

**स.सभासद सर्वश्री.मोरश्वर सावे, यादव अशोक सायन्ना, मोतीराम घडामोडे एकबालसिंग गील, स.अ.एकबालोद्यीन स.अ.कुतुबुद्यीन ,स.हुसेन स.अहमद** त्यांनी सूचविले कि, स्थायी समितीने घेतलेला निर्णय बदलण्याचे अधिकार मा. आयुक्तांना नाहीत. यापूर्वी ही मा. आयुक्तांनी काही प्रकरणात स्थयी समितीचे काही निर्णय बदलेले आहेत. हा समिती सदस्यांचा अपमान आहे. मा. आयुक्तांचे अनुपस्थितीत उपआयुक्त हेच आयुक्त म्हणून उपस्थित असतांत. तेव्हा समितीने कायम केलेली उपसमिती ही कायद्याप्रमाणे योग्य आहे काय हयाबाबतीत वैधानिक खुलासा करावा व तो पावेतो सभेचे कामकाज पूढे ढकलण्यात यावे. अशी मागणी करून स.सभासदांनी सभागृह सोडले.

मा. सभापती यांनी आजची सभा पूढे ढकलण्यात आल्याचे घोषित केले.

स्वाक्षरित/-
सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १६-३-८९ गुरूवार रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे वृत्तांत दिनांक ८ मार्च १९८९ रोजी अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आलेली स्थायी समिती सभा दिनांक १६ मार्च १९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयाच्या सभागृहात मा. सभापती श्री. रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखालील सुरूवात झाली या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्नलिखीत स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.इकबालसिंग प्रितमसिंग गील
२) श्री.गाढे गंगाधर सुखदेव
३) श्री. मिर्झा अन्वर बेग हमीर बेग
४) श्री.यादव अशोक सायन्ना
५) श्री.अजितकुमार शेळके
६) श्री.मोरश्वर दिनानाथ सावे.
७) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
८) श्री.कचरू चंद्रभान नवपूते
९) स.अ.एकबालोद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१०) स.हुसेन स.अहमद

**विषय ९३४ :**

दिनांक १८ फेब्रुवारी १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा.सभापती :** यांनी दिनांक १८-२-८९ च्या इतिवृत्तांबाबत स. सभासदांच्या यकाही सूचना आहेत काय ? अशी विचारणा केली असता स. सदस्य श्री.मोरश्वर सावे यांनी सूचविले कि, मागील सभेत उपसमिती स्थापन करण्याच्या वैधतेबाबत त्यावर काय निर्णय झाला याचा खुलासा व्हावा. तेव्हा अशी उपसमिती कायम करण्याचे अधिकार स्थायी समितीला असून या समिती सभा आयोजनाचे काम सचिव करतील असा खुलासा मा. सभापती यांनी केला.

मागील सभेत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २४ आणि ३० अन्वये उपसमिती कायम करण्याची तरतुद नाही असा खुलासा एका जबाबदार अधिकाऱ्याने केला होता हे योग्य नाही. तेव्हा या बाबत संबंधित अधिकाऱ्यचे काय विचार आहेत हयाचा सभागृहास खुलासा होणे आवश्यक असल्याची सूचना स.सभासद श्री.गंगाधर गाढे यांनी केली.

यावर खुलासा करतांना मा. सभापती व स.श्री.स.हुसेन स.अहमद यांनी सूचविले कि, अशा प्रकारच्या चुका यापुढे होणार नाही याची दक्षता संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी.

सुपर मार्केट विद्युतीकरणाच्या कामापैकी पार्ट "अे" मंजुर करून पार्ट "बी" रिजेक्ट केला होता तरी पण मागील सभेमध्ये या विद्युतीकरणाच्या पार्ट "बी" ला मंजुरी दिली आहे. वस्तुतः ठराव पारित झाल्यानंतर त्या ठरावात तीन महिने पर्यंत कोणालीही बदल करता येत नाही. तेव्हा सुपर मार्केटचे विद्युतीकरणाचे काम अपरिहार्य असेल तरच विद्युतीकरणाच्या पार्ट "बी" बाबत स्वतंत्र्य ठराव नियमाप्रमाणे मांडावा अशी सूचना स.सभासद श्री.मोरेश्वर

सावे व श्री. मोतीराम घडामोडे यांनी केली. स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर मा. आयुक्त यांना या प्रकरणी गुत्तेदाराशी वाटाघाटी करण्याचा कोणताही अधिकार नाही. अशी सूचना स.सभासद श्री. यादव अशोक सायन्ना व श्री.मोरश्वर सावे यांनी केली असता सदर प्रकारणाची योग्य ती शहनिशा करण्यासाठी स.सभासद सर्वश्री गंगाधर गाढे, अशोन सायन्ना , सै.हुसेन स.अहमद,मोश्वर सावे, अजितकुमार शेळके, मोतीराम घडामोडे आणि ॲड.इकबालसिंग गिल यांचा समावेश असलेली उपसमिती कायम करून या उपसमितीने आवश्यक ती चौकशी करून आपला अहवाल स्थायी समितीस सादर करण्याची सूचना मा. सभापती यांनी मांडली त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

याचवेळी मागील सभेमध्ये मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २४ व ३० चा हवाला देवून चुकीचे मार्गदर्शन केल्याबद्यल कार्यवाही करण्याचा आग्रह स.सभासद श्री.गंगाधर गाढे, मोरेश्वर सावे व श्री.यादव अशोक सायन्ना यांनी धरला असता शहरातील होर्डिंग्ज संबंधाने उपआयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४ आणि ३० चा हवाला देवून स्थायी समितीला उपसमिती कायम करण्याची आवश्यकता नसल्याचा खुलासा केला हा खुलासा सभागृहाची दिशाभूल करणारा असून मा. आयुक्त यांनी घटनेची दखल घ्यावी अशी सूचना मा.सभापती यांनी केली. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

दिनांक १८-२-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या अहवालाबाबत मा. आयुक्त यांनी खुलासा केल्यानंतर मा. आयुक्त यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे सभागृहामध्ये खुलासा करत असतांना अधिनियमाचे कलम २४ आणि ३० सभागृहास संमत केल्या प्रमाणे अधिनियमाचा अभ्यास करून योग्य ते कलम सभागृहापुढे ठेवण्यात आले आहे. यात सभागृहाची दिशाभूल करण्याचा कोणताही हेतू नव्हात असा खुलासा मा. उप आयुकत यांनी केला.

वार्ड क्र.१ येथील भावसिंगपूरा आणि पडेगांव या भागात समाज मंदिरे बांधण्याची चालू असलेली कामे बंद आहेत तसेच या वॉर्डातील एका रस्त्याचे खडी दाबण्याच्या कामावर चालू असलेला रोड रोलर एका अधिकाऱ्याने काढून आणल्यामुळे या रोडचे काम त्या दिवसापसून अद्याप बंद आहे. तेव्हा वार्ड क्र.१ मधून कोणत्या अधिकाऱ्याने चालू कामावरील रोड रोलर काढून आणला याचा खुलासा व्हावा आणि त्या अधिकाऱ्याने त्या कामावरचा रोडरोलर का काढून आणला याबाबत संबंधित अधिकऱ्यास कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी अशी मागणी स.सभासद श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केली.

वरील प्रकरणी शहर अभिंयता यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व आपला अहवाल दाखल करावा तसेच रोड रोलरच्या कामाचे नियंत्रण शहर अभिंयंता विभागामार्फत करण्यात यो अशी सूचना यमा. सभापती यांनी केली.

मा. सभासद श्री. यादव अशोक सायन्ना गंगाधर गाढे यांनी कार्यालयाकडे एकूण किती पाणी पुरवठा टँकर चालू अथवा बंद स्थितीत आहेत याविषयी खुलसा मागितला असता कार्यालयाकडे एकूण आठ टँकर असून त्यापैकी सहा चालू स्थितीत व दोन बंद असल्याचा खुलासा उपअभियंता (यांत्रिकी) यांनी केला. यावेळी महानगरपालिकेची बंद वाहने शक्य तितक्या लवकर कशी दुरूस्त होती याबाबत शहर अभिंयता यांनी विशेष लक्ष देण्याची सूचना स.सभासद श्री.गंगाधर गाढे यांनी केली आणि सर्व टँकरचे लॉगबुक व कोटला कॉलनी येथील वाटर टँकरचे नोंद रजिस्टर सभागृहात दाखल करण्याची सूचना अनुक्रमे उपअभियंता (यांत्रिकी) , उप अभिंयता (पाणीपुरवठा) यांना दिल्या.

बारूदगर नाला येथील सुराणा कॉम्प्लेक्सच्या बांधकामाबाबत लेखी माहिती मागविली असता देखील अद्यापही मिळाली नसल्याचा खुलासा स.सभासद श्री.स.अ.एकबालोद्यीन व

श्री.मिर्झा अन्वर बेग यांनी केला. तसेच बारूदगरनाला येथील नाल्यावर एका नागरीकाला ताडीचे दुकानासाठी जागा दिल्यामुळे त्या भागातील नागरीकांचे आरोग्य धोकयात आले आहे. तेव्हा त्यासाठी देण्यात आलेला आदेश रदद् करावा.

सुराणा कॉम्प्लेक्स करीता दिलेली परवानगी जुनी आहे. आता या बांधकामाचे पूर्णत्व प्रमाणपत्राबाबत संबधिताने कार्यालयात संचिका दाखल केली आहे. बांधकाम संचिका दाखल केली आहे. बांधकाम परवानगीची मुळ संचिका कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे संबंधितास अद्याप बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले नाही. या संबंधिचे मूळ नकाशाची मागणी संबंधित मालक आणि झोन क्र.२ यांच्याकडे केली परंतू त्यांच्याकडूनही मूळ नकाशाची प्रत मिळाली नाही. तसेच सुराणा कॉम्प्लेक्स यांना नाल्याची किती जागा देण्यात आली आहे याबाबतही रेकॉर्ड कार्यालयात उपलब्ध नाही. असा खुलासा सहा. संचालक , नगर रचना यांनी केला. सुराणा कॉम्प्लेक्स संबंधिच्या मुळ संचिका बाबत सहा. संचालक नगर रचना यांनी अभिलेख विभागाकडून संचिकेचा शोध घ्यावा. अभिलेख विभागाकडून संचिका उपलब्ध झाल्यानंतर आवश्यक तो खुलासा करावा असे स.सभापती स्थायी समिती यांनी सूचविले,उपअभिंयता (यां.)यांना पाणी वितरण टँकरचे लॉगबुक सभागृहात दाखल करण्याची सूचना दिली. याबाबत मा. आयुक्त यांनी जातीने लक्ष घालावे असे मा.सभापती यांनी सुचविले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ठराव क्र.९३१ तुर्त स्थगित ठेवण्यात यावा या दुरूस्तीसह दिनांक १८-२-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३५ :**

सहाय्यक आयुक्त-२, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला कि, महापालिकेचा सन १९८९ सालचा अर्थसंकल्प छपाई करून घ्यावयाचा आहे. त्या साठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असता त्यामध्ये सर्वात कमी दर रू.८१/- प्रति बुक हा मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस, औरंगाबाद यांचा आहे.

लेखाधिकारी यांच्या मागणीनुसार १५० नग बुक वरील दराने छपाई करण्यासाठी येणारा खर्च र.रू.१२,१५०/- एवढा येईल. तरी निविदातील कमी दरपत्रक धारकातर्फे छपाई करून घेण्यास व येणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचा सन १९८९ सालचा कामासाठी सर्वात कमी दराचे मे.श्रीकृष्ण प्रिंटींग प्रेस यांचे दरपत्रकास तसेच छपाई करण्यासाठी येणारा खर्च र.रू.१२,१५०/- सर्वसामान्य प्रशासनातील छपाई साठीचे तरतुदीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३६:**

सहाय्यक आयुक्त -२, औरंगाबाद महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कार्यालयास लागणारे स्टील फर्निचर खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ९ निविदा प्राप्त झाल्या. पंरतु निविदातील अटीनुसार २ निविदा धारकांनी

अनामत रक्कम न भरल्यामुळे त्या निविदा रदद् करण्यात आल्या आहेत. राहिलेल्या ७ निविदा धारकांपैकी लेखाधिकारी यांच्या अभिप्रायानुसार मे.स्टार स्टील फर्निचार वर्क्स व मे. युनायटेड स्टील फर्निचार वर्क्स यांचेतर्फे "एस" टाईप खुर्ची व लोखंडी बेंच यांचे नमुने मागविण्यात येवून त्यांची तपासणी शहर अभियंता यांनी केली असता त्यांनी मे.स्टार स्टील फर्निचर वर्क्स यांचे नमुने प्रमाणे त्यांचे तर्फे खरेदीची शिफारस केलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

मे.स्टार स्टील फर्निचर वर्क्स औरंगाबाद

अ) "एस" टाईप खुर्ची २६० प्र.नग

ब) लोखंडी बेंच ३९ प्र.नग

तसेच लोखंडी कपाट, कॅश बॉक्स, स्टील ऑफीस टेबल, रीव्हॅलव्हिंग खुर्ची, स्टील रॅक हयांचे स्थानिक दुकानदारांनी दिलेले दर हे कमी आहेत. परंतू त्या फर्निचारच्या टिकाऊपणाच्या दृष्टीकोनातून विचार करता मा.आयुक्त यांनी गोदरेज कंपनीचे फर्निचार खरेदीची शिफारस केलेली आहे. करीता मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयास लागणारे स्टील फर्निचार खरेदी करण्यासाठी गोदरेज कंपनीचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३७ :**

वार्ड क्र.५२ मो.शिल्पनगर भागात १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे र.रू.३७,०९०/- अंदाजपत्रकास स्थायी समितीचा ठराव क्र.३४ दिनांक २९-६-८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सू.क्र.६२४४/८८ दिनांक १०-८-८८ द्वारे मागविली असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या व केवळ दोन दरनिर्दिष्ट निविदा वसुल झाल्या असून खालील प्रमाणे त्यांचे दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | पॉल कन्स्ट्रक्शन | ८.८% जास्त |
| २) | एस.एम.कुलकर्णी | अंदाजपत्रकीय दराने |

आणि अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार श्री.एस.एम.कुलकर्णी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

वार्ड क्र.५२ मो.शिल्पनगर भागात १५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.एस.एम.कुलकर्णी हयांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३८ :**

वार्ड क्र.४९/५८ विष्णूनगर, भानुदासनगर येथे ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र.रू.८१,६३९/- चे तयार करण्यात आले असून सदर काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने अे-१ टेंडर तहत उपलब्ध गुत्तेदार श्री.आनंद बिल्डर्स यांच्याकडून अंदाजपत्रकाच्या दराने करून घेण्यात येईल. करीता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.४९/५८ विष्णूनगर, भानुदासनगर येथे ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचे काम तातडीचे असल्यामुळे अे-१ टेंडर तहत उपलब्ध गुत्तेदार श्री.आनंद बिल्डर्स यांच्याकडून अंदाजपत्रकाच्या दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९३९ :**

वार्ड क्र.२० मो. पारधीपूरा येथे सार्वजनिक संडासजवळ ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन - टाकणे बाबतचे र.रू. २१,२५०/- चे अदांजपत्रक तयार करण्यात आले असून सदर काम श्री.पी.बी.पवार, गुत्तेदार यांचेकडून भरून घेण्यात येईल. करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.२० मो. पारधीपूरा येथे सार्वजनिक संडासजवळ ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन - टाकणे बाबतचे र.रू. २१,२५०/- चे अदांजपत्रकास तसेच सदरील काम श्री.पी.बी.पवार, गुत्तेदार यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४० :**

वार्ड क्र.१८ जामा मस्जीद मागील ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे (अस्तीत्वात असलेली २.२५ मी.मी. व्यासाची एसडब्ल्युजी पाईप लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे) बाबतचे अंदाजपत्रक र.रू.१७,३५२/- चे तयार करण्यात आले असून सदर काम श्री. अब्दुल सलाम गुत्तेदार यांचेकडून करून घेण्यात येईल. करिता अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.१८ जामा मस्जीद मागील ड्रेनेज लाईनची दुरूस्ती करणे (अस्तीत्वात असलेली २.२५ मी.मी. व्यासाची एसडब्ल्युजी पाईप लाईन काढून २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे) बाबतचे अंदाजपत्रक र.रू.१७,३५२/- चे अंदाजपत्रकास व सदरील काम श्री. अब्दुल सलाम गुत्तेदार यांचेकडून करून घेण्यास सर्वानुंमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४१ :**

उप अभियंता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मोहल्ला सादातनगर येथे खडी रोडचे काम करीत असतांना पाईप फुटल्यामुळे नागरिकांना येण्याजाण्याकरीता त्रास होत आहे.त्यामुळे त्या ठिकाणी हयुम पाईप कल्व्हेटचे काम करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरीता रू.१५,९२०/-चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. सदरील काम हे उपलब्ध गुत्तेदार श्री.सलिम अहमद यांचेमार्फत निविदा अे-१ वर करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. सादातनगर भागात हयुम पाईप कल्व्हर्टचे काम करणेसाठीर.रू.१५,९२०/- चे अंदाजपत्रकास तसेच गुत्तेदार श्री.सलिम अहमद यांचेमार्फत निविदा अे-१ वर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४२ :**

वार्ड क्र.४९ येथील श्री.शिवाजी सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडील सन १९८८-८९ चे डी.एस.आर.दराने र.रू.५,८६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४९ येथील श्री.शिवाजी सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ५,८६,०००/- चे अंदाजपत्रकास सवानुमते मंजुरी देण्यात येते. सार्वजनिक बांधकाम खात्याकडील सन १९८८-८९ चे डी.एस.आर.दराने र.रू.५,८६,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४३:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, साईट क्र.४० कडबीमंडी येथे प्राथमिक शाळा बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.९,८९,३५०/- चे सन १९८८-८९ च्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत इमारतीच्या सदरातून करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, साईट क्र.४० कडबी मंडी येथे प्राथमिक शाळा बांधणे बाबतचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.९,८९,३५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४४ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, कबाडीपूरा येथे खांडकी दुरूस्ती करणेबाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.५६,८००/- ला स्थायी समिती बैठक दिनांक १७-११-८८ विषय क्रृ७ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११ जा.क्र.बांध वि.१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सतरा निविदा फॉर्म विकल्या गेले. त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत दर भरून सहा निविदा फॉर्म प्राप्त झाले. ते उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पॉल कन्स्ट्रक्शन | ११.६२ % कमी |
| २) | मोहमद कलिमोद्यीन | १७.११ % कमी |
| ३) | व्ही.एल.मोरे | ०६.९५ % कमी |
| ४) | मॅकवेला कन्स्ट्रक्शन . | १९.१९ % कमी |
| ५) | संजय पी सरवदे | २२.५० % कमी |
| ६) | एस.एच.असोसिएट्स | २३ % कमी |

वरील पैकी अ.क्र.६ एस.एच.असोसिएट्स यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २३% कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कबाडीपूरा येथे खांडकी दुरूस्त करणे बाबत कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व २३% कमी दराचे श्री.एस.एच.असोसिएट्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४५ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, भावसिंगपूरा वार्ड नं. येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.१,०९,३००/- ला स्थायी समिती बैठक दिनांक ५-१०-८८ विषय क्र.२२ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११/जा.क्र./बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दहा निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद युनुस | ५% कमी |
| २) | संजय पी सरवदे | १२.५०% कमी |
| ३) | वसंत नरवडे | ११.७८६ % कमी |
| ४) | अब्दुल सत्तार | ६.८०% कमी |
| ५) | एस.एच.असोसिएट्स | १० % कमी |
| ६) | व्ही.एल.मोरे | ७.८०% कमी |

वरील अ.क्र.२ श्री.संजय पी. सरवदे यांचे निविदेचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १२.५०% कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ भावसिंगपूरा येथे समाज मंदिर बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी १२.५०% कमी दराचे गुत्तेदार श्री.संजय पी.सरवदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४६ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, शहागंज वार्ड क्र.१५ पाण्याच्या टाकीभोवती असलेल्या कंपाऊंड वॉलवर वायर फेंसिंग करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २८-१२-८८ विषय क्र.१३ नुसार अंदाजपत्रक र.रू.१४,९०५/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११/जा.क्र./४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ८ निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मकसुद खान | १०% कमी |
| २) | के.के.सदावले | १६.६०% कमी |
| ३) | इनायत खान | १७% कमी |
| ४) | अब्दुल सालम | १२% कमी |
| ५) | बी.एस.गायकवाड | १.९९% कमी |
| ६) | जामीदखान | १४.५६% कमी |
| ७) | पी.डी.राठोड | अंदाजपत्रकाप्रमाणे |

८) विपुल कन्स्ट्रक्शन १३.१३% कमी

वरील पैकी अ.क्र.३ श्री.इनायतखान यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १७% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज वार्ड क्र.१५ पाण्याच्या टाकी भोवती असलेल्या कंपाऊंड वॉलवर वायर फेंन्सींग करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १७% कमी दराचे गुत्तेदार श्री.इनायत खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी समी कॉलनी, कुंभारवाडा या भागातील खांडकीची दुरूस्ती करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १७-११-८८ विषय क्र.११ प्रमाणे र.रू.५०,३३०/-ला मंजुरी प्राप्त झालेली आहे.

या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११ जा.क्र.बांधवि/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा फॉर्म विकल्या गेले व शेवटच्या तारखेपयंत एकूण पाच निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अब्दुल कदीर | १४.१४% कमी |
| २) | जावीद खान | २०.१०% कमी |
| ३) | एस.एच.असोसिएट्स | २१.८०% कमी |
| ४) | पाल कन्स्ट्रक्शन | ६.७२% कमी |
| ५) | शे.एकबाल अहेमद | १७% कमी |

वरीलपैकी अ.क्र.३ श्री.एस.एच.असोसिएट्स यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २१.८०% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी समी कॉलनी, कुंभारवाडा या भागातील खांडकीची दुरूस्ती करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २१.८०% कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.एच.असोसिएट्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४८:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३५ रोषनगेट दोन्ही बाजूंची भिंत पाडून खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २८-१२-८८ विषय क्र.११ प्रमाणे र.रू.१९,१९०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११ बांधवि/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अब्दुल सलाम | ५% जास्त |
| २) | रविंद्रसिंग | २% जास्त |
| ३) | इनायतखान | ३% जास्त |

वरीलपैकी अ.क्र.२ श्री.रविंद्रसिंग यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजे २% जास्त दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ रोषनगेटच्या दोन्ही बाजूंची भिंत पाडून खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी २% जास्त दराचे गुत्तेदार श्री.रविंद्रसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९४९ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३६ बायजीपूरा यंथील मॅकेनिकल वर्कशॉपसाठी नवीन रूम व कॅबीन तयार करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १७-११-८८ विषय क्र.१० प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.८०,८७०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११जा.क्र.बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण चार निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संजय पी.सरवदे | ११.५% कमी |
| २) | अंसारी जी एम | ९.१२% कमी |
| ३) | एस.ए.नवाब | ८.१५% कमी |
| ४) | बी.एस.गायकवाड | ५% कमी |

वरील पैकी अ.क्र.१ श्री.संजय पी.सरवदे यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ११.५% कमी दराचे निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

वार्ड क्र.३६ बायजीपूरा यंथील मॅकेनिकल वर्कशॉपसाठी नवीन रूम व कॅबीन तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ११.५% कमी दराचे गुत्तेदार श्री.संजय पी.सरवदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५० :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.४ आरेफ हौ.सोसा.येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक २९-१२-८८ विषय क्र.१६ प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.३,५६,६००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११/बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ८ निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा निविदा फार्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

१) एम.एम.बेग १९.९९% कमी
२) एस.एच.असोसिएट्स १७% कमी
३) एल.एम.चंचलानी ३% कमी
४) एस.ए.नवाब १८.१८% कमी
५) पाल कन्स्ट्रक्शन १८.९९% कमी
६) कुलवंतसिंग १५.७०% कमी

वरीलपैकी अ.क्र.१ श्री.एम.एम.बेग यांची निविदांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १९.९९ % कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४ आरेफ हौ.सोसा.येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९९% कमी दराचे श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५१ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.१७ लोटाकारंजा येथे बीफ मार्केटला वायर फेन्सींग करण्याबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २८-१२-८८ विषय क्र.१२ नुसार अंदाजपत्रक र.रू.२३,५००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालययीन निविदा क्र.११/जा.क्र.बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण तीन निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

१) बी.एस.गायकवाड १२% कमी
२) पी.डी.राठोड २.९९% कमी
३) मॅकवेल कन्स्ट्रक्शन १६.५०% कमी

वरीलपैकी अ.क्र.३ श्री.मॅकवेल कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १६.५०% कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जागेच्या मालकी हक्काबाबत वाद असल्यामुळे याप्रकरणी तुर्त निर्णय घेणे योग्य होणार नाही. अशी सूचना मा.सभासद श्री.सय्यद हुसेन स.अहेमद यांनी मांडली.

**ठराव :**

प्रस्तावित बीफ मार्केट जागेच्या मालकी हक्काबाबत वाद चालू असून प्रकरण न्यायालयात आहे असे समजते तेव्हा या प्रकरणी काय कार्यवाही चालू आहे याची शहनिशा करण्यात यावी. तोपर्यंत सदर प्रकरण स्थागित ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.९५२:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, पानदरीबा बोहरी कठडा येथे श्री. ताजमहल ते हुसेन सोनी हाऊस पर्यंत खांडकी दुरूस्ती करणे व नवीन बसविणे बाबतच्या

कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ३०-११-८८ विषय क्र.९० प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.१४,६३०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११/जा.क्र./बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०.१.८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण बारा निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण पाच निविदा फार्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | वसंत नरवडे पाटील | १८.७८६% कमी |
| २) | विपुल कन्स्ट्रक्शन | १५.१५% कमी |
| ३) | सईद रफीकोद्दीन | १६% कमी |
| ४) | जावीद खान | १८.१९% कमी |
| ५) | सय्यद खालेद | १८% कमी |

वरीलपैकी तुलनात्मकदृष्टया अ.क्र.१ श्री.वसंत नरवडे पाटील यांचे निविदाचे दर सर्वात कमी म्हणजे १८.७८६% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पानदरीबा बोहरी कठडा येथे श्री.ताजमल ते हुसेन सोनी हाऊस पर्यंत खांडकी दुरूस्त करणे व नवीन बसविणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व १८.७८६% कमी दराचे गुत्तेदार श्री.वसंत नरवडे पाटील यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५३ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३९ कैलासनगर येथे खडी रस्ते तयार करणेबाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १४-९-८८ विषय क्र.३ प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.२१,६००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११ जा.क्र./बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण चार निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी हजर असलेल्या ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | इनायत खान | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| २) | कुलवंतसिंग | ५% जास्त |

वरीलपैकी अ.क्र.१श्री.इनायत खान यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया कमी म्हणजे अंदाजपत्रकाप्रमाणे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३९ कैलासनगर येथे खडी रस्ते तयार करणेबाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाप्रमाणे श्री.इनायत खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५४:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३५ नागसेन कॉलनी या भागात समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २४-११-८८विषय क्र.३ प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.२,१९,६३०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११/जा.क्र./बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८-२-८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एस.एच.असोसिएट्स | १०%कमी |
| २) | अब्दुल कदीर | ११.११%कमी |

वरीलपैकी अ.क्र.२ अब्दुल कदीर यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ११.११%कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ नागसेन कॉलनी या भागात समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ११.११% कमी दराचे गुत्तेदार श्री.अब्दुल कदीर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.९५५:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, बिल्डर्स हौ.सोसायटी शांतीपूरा येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ३०.११.८९ विषय क्र.८ प्रमाणे र.रू.१,१३,४००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११ /जा.क्र./बांधवि-१ /४४३/८९ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण अकरा निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण सहा निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या, त्या दिनांक ८.२.८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कुलवंतसिंग | १७.१०% कमी |
| २) | पाल कन्स्ट्रक्शन | १८.९७% कमी |
| ३) | एल.एम.चचलानी | २% कमी |
| ४) | एस.एच.असोसिएट्स | २०.९% कमी |
| ५) | एस.ए.नवाब | १५% कमी |
| ६) | पी.बी.पवार | २२% कमी |

वरीलपैकी अ.क्र.६ श्री.पी.बी.पवार यांचे निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २२% कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बिल्डर्स हौ.सोसायटी शांतीपूरा येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २२% कमी दराचे गुत्तेदार श्री.पी.बी.पवार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५६ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी भागात समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २४.११.८८ विषय क्र.३ प्रमाणे र.रू.२,१८,६६०/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा जा.क्र.११/बांधवि-१/४४३/८९ दिनांक २०.१.८९रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखे पर्यंत एकूण पाच निविदा फॉर्म विकल्या गेल्या. त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या त्या दिनांक ८.२.८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अब्दुल कदीर | १२.५०% कमी |
| २) | एस.एच.असोसिएट्स | १०% कमी |

वरील अ.क्र.१ श्री.अब्दुल कदीर यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १२.५०% कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ कैसर कॉलनी भागात समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १२.५०% कमी दराचे गुत्तेदार श्री. अब्दुल कदीर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३ तळेश्वर कॉलनी येथे खडी रस्ता तयार करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ३०.११.८८ विषय क्र.९ प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.४०,६००/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.११ जा.क्र.बांध-वि-१/४४३/८९/ दिनांक २०-१-८९ रोजी निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकुण सहा निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्या दिनांक ८.२.८९ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एस.एच.असोसिएट्स | ५% कमी |
| २) | वसंत नरवडे पाटील | २३.७८६% कमी |
| ३) | विपुल कन्स्ट्रक्शन | १६% कमी |
| ४) | पी.बी.पवार | २२% कमी |
| ५) | कुलवंतसिंग | १४% कमी |
| ६) | पाल कन्स्ट्रक्शन | १७.८७% कमी |

वरीलपैकी अ.क्र.२ श्री.वसंत नरवडे पाटील यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २३.७८६% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३ तळेश्वर कॉलनी येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.७८६% कमी दराचे श्री.वसंत नरवाडे पाटील यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५८ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, बिफ वाहतुकीसाठी टाटा ४० चेसीस कॅबीनसह आणि नियमानुसार चॅसीसवर बीफ बाडी तयार करण्याकरीता र.रू.२,२७,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.२३६ दिनांक ११.८.८८ अन्वये मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार बिफ वाहतुकीसाठी केबीनसह टाटा -४०७ चेसीस खरेदीसाठी र.रू. १,७६,८९३/- चे दरपत्रक टाटा कंपनीचे अधिकृत विक्रते मे.सतिष मोटार्स ,औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झाले आहे. सदरील दर हे जकात कर सोडून आहेत.

तसेच टाटा चासीसवर बिफची वहातुक करण्यासाठी आवश्यक असलेली बॉडी तयार करण्यासाठी दरपत्रके मागविली असता एकूण चार दरपत्रके वसुल झाली. त्यापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे र.रू.५९,५००/- चे मे.एम.एस.एस.आय.डी.सी. यांचे दरपत्रक आहे. मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बीफ वहातुकीसाठी केबीनसह टाटा-४०७ चासीस खरेदीसाठी मे.सतिष मोटार्स, औरंगाबाद यांचे र.रू.१,७६,८९३/- चे दरपत्रकास तसेच टाटा चासीसवर बीफची वाहतुक करण्यासाठी आवश्यक असलेली बॉडी तयार करण्यासाठी मे.एम.एस.एस.आय.डी.सी.यांचे रक्कम रूपये ५९,५००/- च्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९५९ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड नं.१५ कडबी मंडी शहागंज साईट क्र.४० येथे वायर फेंसिंग करणे बाबतच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रू.१४,६८०/- चे बनविण्यात आले आहे. सदरील खर्च या सदराखाली करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड नं.१५ कडबी मंडी शहागंज साईट क्र.४० येथे वायर फेंसिंग करणे बाबतच्या कामासाठी र.रू.१४,६८०/- च्या अंदाजपत्रकीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६०:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३७ बायजीपूरा येथील जकात नाक्याच्या इमारतीवर पहिला मजला व गार्डरूम बांधणेबाबतच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र.रू.१,६९,८७०/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३७ बायजीपूरा येथील जकात नाक्याच्या इमारतीवर पहिला मजला व गार्डरूम बांधणेबाबतच्या कामासाठी र.रू.१,६९,८७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६१:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.२७ सिटीचौक येथे रस्त्याचे रूंदीकरण करून खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी सन १९८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रू.१९,४००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च रोड दुरूस्ती या सदराखाली करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २७ सिटीचौक येथे रस्त्याचे रूंदीकरण करून खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी रक्कम रू.१९,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६२ :**

वार्ड क्र.४८ क्रांतीचौक येथील शिवाजी महाराज पुतळयाजवळील कारंज्याचे हौदास वाटर प्रुफिंग करणेच्या कामासाठी सन १९८८-८९चे सा.बां. खात्याकडील डी.एस.आर. दराने रक्कम रू.१९,७३४/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. आणि सदरचे काम हे शहराचे सौंदर्यामध्ये भर पडावी या दृष्टीने लवकर करण्यासाठी उपलब्ध गुत्तेदार श्री.मे.एस.एच.सी.कंपनी मुंबई मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च शहराचे सौंदर्यीकरण या सदराखाली करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४८ क्रांतीचौक येथील शिवाजी महाराज पुतळयाजवळीत कारंज्याचे हौदास वॉटर प्रफिंग करणेच्या कामासाठी र.रू. १७,७३४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचे काम हे शहराचे सौंदर्यामध्ये भर पडावी यादृष्टीने लवकर करण्यासाठी उपलब्ध गुत्तेदार मे.एस.एच.सी.कंपनी मुंबई यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६३ :**

उद्यान अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला कि, दिनांक २६.११.८८ च्या स्थायी समितीच्या विषय क्र.१४ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर सिध्दार्थ उद्यान येथे मिनी ट्रेन बसविणे बाबत र.रू.४,००,०००/- च्या खर्चाच्या कामासाठी प्रकट निवेदनावर निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या.

१ एम.एस.एस.आय.डी.सी चे दरपत्रक खालीलप्रमाणे

| पुरवठा तपशिल | मुळ किंमत | टॅक्स प्रति रनिंग फुट (ड्रेनेज व डबे ) ८०.०० रू. (एकूण २००० रनिंगफुट करिता) | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| अ) मिनी ट्रेन पेट्रोलवर १.७५ एच.पी. | ५९,७५०+१,६०,०००=२,१९,७५०-०० | | |

ब)	मिनी ट्रेन डिझेलवर
१.७५ एच.पी.	६९,५००+१,६०,०००=२,२९,५००-००

अटी:- १)जकात कर मनपास भरावा लागेल
२) मार्च १५ पर्यंत दर बंधनकारक राहतील.

२)	श्री.जी.बी.जैन ॲन्ड सन्स यांचे दरपत्रक

अ)	मीनी ट्रेन विद्युत
यंत्रावर चालणारी (१४० रनिंग फुटाकरीता)४,४०,०००-००

अटी :- १) आदेशासह आगाऊ रक्कम ६०% व माल पुरवठा झाल्यावर
२) सर्व प्रकारचे बांधकाम विद्युत पुरवठा इ. कामे मनपाने करावे.
३)जकात कर मनपाने करावा.

सर्वात कमी दराची निविदा श्री.एम.एस.एस.आय.डी.सी. यांची असून ती अंदाजपत्रकापेक्षा कमी आहे. तरी निविदा मान्य करणेबाबतच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्या ान येथे मिनी ट्रेन बसविणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे मे.एम.एस.आय.डी.सी. यांचे खालील दर्शविलेल्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| पुरवठा तपशिल | मुळ किंमत | टॅक्स प्रती रनिंग फुट | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| | | रनिंग फुट<br>(ड्रेनेज व डबे ) ८०.०० रू.<br>(एकूण २००० रनिंगफुट करिता) | |

ब) मिनी ट्रेन डिझेलवर
१.७५ एच.पी.	६९,५००+१,६०,०००=२,२९,५००-००

अटी:- १)जकात कर मनपास भरावा लागेल
२) मार्च १५ पर्यंत दर बंधनकारक राहतील.

**विषय क्र.९६४ :**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, म्हाडातर्फे मिळणाऱ्या अनुदानातून शहानुरवाडी वार्ड क्र.५७ येथे ग.व. सुधारणा कार्यांतर्गत १० बैठकीचे संडास बांधण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु तेथे जागेबाबत वाद निर्माण झाल्याने संडासा ऐवजी भूमिगत जलनि:सारण लाईन टाकण्यासाठीचे र.रू.१,३६,४५१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी वार्ड क्र.५७ येथे संडासांऐवजी जलनि:सारण लाईन टाकणे बाबत तयार करण्यात आलेले र.रू.१,३६,४५१/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६५ :**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, ठराव क्र.१६८ दिनांक ५.८.८८ अन्वये वार्ड क्र.२२ प्रज्ञानगर स्लम भागात खडी रस्ता व खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी स्थायी समिती ठराव क्र.७१३ दिनांक २८-१२-८८ अन्वये एजन्सीचा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता. परंतु सदर एजन्सीने निविदा बी-१ प्रमाणे पुर्तता केलेली नाही. करीता सदरचार खर्च म्हाडा अंतर्गत मिळणाऱ्या अनुदानातुन करावयाचा असल्यामुळे निविदा अ-१ नमुन्यावर उपलब्ध गुत्तेदारांकडून करून घेणेबाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२२ प्रज्ञानगर स्लम भागात खडी रस्ता व खांडकी पेव्हींगचे काम करणेसाठी उपलब्ध गुत्तेदारांकडून "अ-१" नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६६ :**

उप अभिंयता यांनी प्रस्ताव दिला कि, वार्ड नं.२६ बलवंत वाचनालय ते बारूदगरनाला ब्रिज कुंभारवाडा जुनाबाजार येथे २० मी.मी. जाडीचे मिक्स सील सरफेस करणेच्या कामासाठी ठराव क्र.१७ दिनांक २८-१२-८८ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे. काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण दाने दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

१) गुरूनानक इंडस्ट्रीज ७% जास्त
२) पी.एम.चोरडीया ४.७०% जास्त

वरीलपैकी श्री.पी.एम.चोरडीया यांना दिनांक २४-२-८९ रोजी मा. आयुक्त यांनी वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी ४.७०% जास्त ऐवजी २% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड नं.२६ बलवंत वाचनालय ते बारूदगरनाला ब्रिज कुंभारवाडा जुनाबाजार येथे २० मी.मी. जाडीचे मिक्स सील सरफेस करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे श्री.पी.एम.चोरडीया यांचे दरपत्रकास सार्वनुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला कि, वार्ड क्र.२६ सेंट्रल बँक, गुलमंडी ते सिटीचौक तसेच कालीमस्जीद जोहरीवाडा भागातील ५० मी.मी.मॅकेडम व २० मी.मी. मिक्स सिल सरफेस करणेच्या कामासाठी ठराव क्र.१४ दिनांक २८-१२-८८ अन्वये अंदाजपत्रक र.रू.८८,१२६/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या

असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | गुरूनानक इंडस्ट्रीज | ५% जास्त |
| २) | पी.एम.चोरडीया | ४.४% जास्त |

वरीलपैकी पी.एम.चोरडीया यांना दिनांक २४-२-८९ रोजी मा. आयुक्त यांनी वाटाघाटीकरीता बोलावले असता त्यांनी ४.४% जास्त ऐवजी २% जास्त दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२६ सेंट्रल बँक, गुलमंडी ते सिटीचौक तसेच कालीमस्जीद जोहरीवाडा भागातील ५० मी.मी.मॅकेडम व २० मी.मी. मिक्स सिल सरफेस करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराची व अंदाजपत्रकापेक्षा २% जास्त दराची श्री.पी.एम.चोरडीया यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६८:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला कि, वार्ड क्र.१९ बुढीलेन येथे वसीम अहमद मे.मो.पाशा यांच्या घरापर्यंत खांडकी बसविण्याच्या कामासाठी ठराव क्र. ११ दिनांक ३०-११-८८ अन्वये र.रू.२०,८१०/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण सहा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | शे. इकबाल अहमद | १८% कमी |
| २) | मो.कलीमोद्यीन | २४.२४% कमी |
| ३) | रविद्रसिंग | २२% कमी |
| ४) | मॅकवेल कन्स्ट्रक्शन | २४.२४% कमी |
| ५) | सलीम हहमद | २२.११% कमी |
| ६) | सय्यद युनुस | |

वरील अ.क्र.२ व ४ यांची निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २४.२४% कमी आहे. परंतु या दोन्हीपैकी श्री.मो कलीमोद्यीन हे काम करण्यास तयार आहे व मॅकवेल कन्स्ट्रक्शन यांची काहीही तक्रार नाही.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१९ बुढीलेन येथे वसीम अहमद मे.मो.पाशा यांच्या घरापर्यंत खांडकी बसविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व २४.२४% कमी दराचे गुत्तेदार श्री.मो.कलीमोद्यीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९६९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.२१ काझीवाडा भडकलगेट येथे २० मी.मी.मिक्स सिल सरफेस करण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.४ दिनांक २४.११.८८ अन्वये र.रू.७३,७२२/-च्या अंदाजपनत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | पी.एम.चोरडीया | ४.४% जास्त |
| २) | गुरूनानक इंडस्ट्रिज | ७% जास्त |

वरीलपैकी श्री.पी.एम.चोरडीया यांना दिनांक २४.२.८९ रोजी मा. आयुक्त यांनी वाटाघाटीकरीता बोलावले असता त्यांनी ४.४% जास्त ऐवजी २% जास्त दराने काम करण्यास तयार दर्शविली आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२१ काझीवाडा भडकलगेट येथे २० मी.मी.मिक्स सिल सरफेस करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे श्री.पी.एम.चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७० :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वॉर्ड ट्रेंचिंग ग्राऊंड येथे स्टाफ क्वार्टर येथे २० मी.मी.जाडीचे "अ" टाईप मिक्स सिल सरफेस करणेच्या कामासाठी दिनांक २१.१.८९ च्या स्थायी समितीमध्ये अंदाजपत्रक र.रू.२७,५३५/- ला मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | गुरुनानक इंडस्ट्रीज | ७% जास्त |
| २) | पी.एम.चोरडीया | ४.९४% जास्त |

वरीलपैकी पी.एम.चोरडीया यांना दिनांक २४.२.८९ रोजी मा. आयुक्त यांनी वाटाघाटी करीता बोलावले असता त्यांनी ४.९४% जास्त ऐवजी २% जास्त दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ट्रेंचिंग ग्राऊंड येथे स्टाफ क्वार्टर येथे २० मी.मी.जाडीचे "अ" टाईप मिक्स सिल सरफेस करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे श्री.पी.एम.चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमे मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७१ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला कि, वार्ड क्र.२४ नागेश्वरवाडी येथे श्री.शिंदे यांचे घरापासून ते शर्मा यांच्या घरापर्यंत खांडकी पेव्हींगच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक २०.१०.८८ ठराव क्र.२८प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.२२,१३६/- ला मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सात निविदा (दरनिर्दिष्ट ) प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | पाल कन्स्ट्रक्शन | १२.९९% कमी |
| २) | एच.डी.कटारिया | अंदाजपत्रकीय दराने |
| ३) | आनंद बिल्डर्स | १६.३% कमी |

४)	अ.के.थोरात	१५% कमी
५)	अंबादास इंगळे	२१.१०% कमी
६)	बी.एम.काथार	१०.५०% कमी
७)	चव्हाण आर.बी.	२४% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी दराची श्री.चव्हाण आर.बी. यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२४ नागेश्वरसाठी येथे श्री. शिंदे यांचे घरापासून ते शर्मा यांचे घरापर्यंत खांडकी पेव्हींगच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% कमी दराचे श्री.चव्हाण आर.बी.यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७२ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.४६ वरद गणेश मंदिर (कार्तीक हॉटेल ते चौराहा सिग्नलपर्यंत) २५ मी.मी. जाडीचे असफाल्ट कॉंक्रीट करणे बाबतच्या कामासाठी स्थायी समिती दिनांक ७ व १४ ठराव क्र.१४ प्रमाणे अंदाजपत्रक र.रू.१,८३,७५४/- ला मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा निविदा दर भरून प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

१)	पी.एम.चोरडीया	६% जास्त
२)	गुरूनानक इंडस्ट्रीज	४.९५% जास्त

वरील पैकी अ.क्र.२ गुरूनानक इंडस्ट्रीज यांना दिनांक २४.२.८९ रोजी मा.आयुक्त यांनी वाटाघाटीकरीता बोलावले असता त्यांनी ४.९५% जास्त ऐवजी २% जास्त दराने काम करण्यास तयारी दर्शविली आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४६ वरद गणेश मंदिर (कार्तीक हॉटेल ते चौराहा सिग्नलपर्यंत) २५ मी.मी. जाडीचे असफाल्ट कॉंक्रीट करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराचे श्री.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७३ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.१९ मधील बुढीलेन व अजीम कॉलनी जुनाबाजार येथे १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाच्या रू.५१,९५९/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.२५० दिनांक १७.८.८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. पत्रक क्र.७०० अन्वये निविदा मागविल्या असता (पाईपसह) एकच निविदा श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% जास्त दराची प्राप्त झाली होती. तद्नंतर प.क्र.५३४ अन्वये फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही.

यानंतर स्थायी समिती ठराव क्र.७४३ दिनांक २८.१२.८८ च्या आदेशाप्रमाणे सदर काम "अ-१" अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यासाठी तीन गुत्तेदारांकडून कोटेशन मागविले असता खालीलप्रमाणे कोटशन्स प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) | एम.एम.बेग | ३% जास्त दराने |
| २) | मॅकबेल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| ३) | जावेद खान | ४.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर मॅकवेल कॉन्ट्रक्टर यांचे असून त्यांचे कोटेशन अंदाजपत्रकीय दराचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१९ मधील बुढीलेन व अजीम कॉलनी, जुनाबाजार येथे १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने गुत्तेदार श्री.मॅकवेल कॉन्ट्रक्टर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७४:**

जलगृह अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.२८ मधील शहागंज पाण्याची टाकी ते राजाबाजार पर्यंत २५० मी.मी. व्यासाची अे.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१,६०,९५६/- चे रक्कमेस ठराव क्र.६२८ दिनांक ३०.११.८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. दिनांक २६.१२.८८ रोजी निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | बी.एम.काथार | ३.५०%जास्त |
| २) | के.बी.काल्डा | ८.६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी दराची निविदा काथार यांची आहे. मा. आयुक्तांच्या दिनांक २८.१.१९८९ च्या आदेशाप्रमाणे ठेकेदारास दर कमी करणे विषयी विनंती केली असता त्यांनी ०.५०% कमी म्हणजे त्यांची निविदा ३% जास्त दराची होते.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ मधील शहागंज पाण्याची टाकी ते राजाबाजार पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ए.सी.जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मक्दृष्टया कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची गुत्तेदार श्री.बी.एम.काथार यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७५ :**

जलगृह अभियता यांनी वार्ड क्र.५९ मधील नारेगांव येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.९३,०००/- चे असून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५९ मधील नारेगांव येथे ८० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रू.९३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७६ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३९ मधील रोकडीया हनुमान कॉलनी येथे १०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.३०,०६०/- चे असून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३९ मधील रोकडीया हनुमान कॉलनी येथे १०० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी रक्कम रू.३०,०६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, कार्यालयातील सिमेंट साठा संपूष्टात आला आहे. आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असल्यामुळे व कामाची वाढती गती लक्षात घेता निकडीप्रमाणे ५०० मे.टन सिमेंट खरेदी करणे आवश्यक आहे . त्यासाठी दरपत्रके मागविण्यात आली असता तीन दरपत्रके वसूल झाली असून खालीलप्रमाणे दर दर्शविले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | रू.१,११०/- प्रति मे.टन सर्व करांसह मनपा गोडाऊन पर्यंत पोहचते करणे व थप्पी लावणे. |
| २ | मेसर्स पांडे ॲन्ड सन्स | रू.१,२६०/- प्रति मे.टन (वरीलप्रमाणे) |
| ३ | माणिकगड सिमेंट कंपनी | रू.१,२६०/- प्रति मे.टन (वरीलप्रमाणे) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व र.रू.१,११०/- प्रति मेट्रीक टन प्रमाणे सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचे दरपत्रक असून सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून एकूण ५०० मे.टन रू.१,११०/- प्रमाणे रक्कम रू.५,५५,०००/- च्या रक्कमेस कार्योत्तर मंजुरी मिळणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयातील सिमेंट साठा संपुष्टात आल्यामुळे निकडीप्रमाणे ५०० मे.टन सिमेंट र.रू.१,११०/- प्रति मेट्रीक टन या दराने सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेंकडून खरेदी करण्यास व एकूण रक्कम रू.५,५५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९७८:**

विकास योजना औरंगाबादच्या प्रस्तावानुसार आरक्षण क्र.२६७ "धोबीघाट" हे मौजे शहानुरवाडी येथील स.नं.१२ पैकी जमीनीवर दर्शविले आहे. सदर आरक्षणाखाली असलेल्या १५८८१ चौ.मी. जमीनीचा ताबा दिनांक १-८-८५ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये खाजगी वाटाघाटीने घेण्यात आला आहे. ताबा हा

पंचनामा करून घेण्यात आला असून सदर जमीनीचा मोबदला र.रू.२,८५,१००/- ठरविण्यात आलेला आहे. या जमिनीच्या मालकी हक्काच्या वाटणीबाबत सन्माननीय न्यायालयात वाद चालू असल्याने व कृषी नगर सह.गृह निर्माण संस्था यांनी क्षेत्र ८९६चौ.मी.वर मालकी सांगतात तेव्हा वरील नुकसान भरपाई रकमेच्या हितसंबंधीतांना त्यांच्या वाटयाच्या अनुषंगाने योग्य ते वाटप होण्यासाठी सदर आरक्षणाखालील जमीन नोंदणीकृत दस्तऐवजाने ताब्यात घेतल्यानंतर वरीलप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम हितसंबंधितांना वाटप करण्यासाठी सन्माननीय न्यायालयात जमा करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादरा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये दिनांक १.८.८५ रोजी औरंगाबाद विकास योजने अंतर्गत मौजे शहानुरवाडी येथील स.नं.१२ पैकी १५८८१चौ.मी. जमीनीचा आरक्षण क्र.२६७ "धोबीघाट" या कामासाठी खाजगी वाटाघाटीने ताबा घेण्यात आला असला तरी सदर जमीनीचे मालक हक्काबाबत सन्माननीय न्यायालयात वाद चालू असल्याने या जमीनीच्या मोबदल्यापोटी अदा करावयाची रक्कम रू.२,८५,१००/- ची रक्कम सदर आरक्षणाखालील जमीन नोंदणीकृत दस्तऐवजाने ताब्यात घेतल्यानंतर वरील रक्कम सन्माननीय न्यायालयात जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.९७९ :**

वार्ड क्र.४१ पैठणगेट येथील वाहतूक बेटाजवळील २ रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी र.रू.४६,२८०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती बैठक दिनांक २८.१२.८८ ठराव क्र. ८७५ नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.गुरूनानक इंडस्ट्रीज | ४.५% जास्त |
| २ | श्री.एम.एस.जग्गी | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.५% जास्त दराचे मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची निविदा आहे. सदरचे दर आणखी कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र. मनपा/बांध-२/११३८/ दिनांक १.३.८९ अन्वये पत्र दिले असता त्यांनी दिनांक ४.३.८९ अन्वये लेखी पत्र दिले कि, सदरचे काम ४.५% जास्त ऐवजी ४% जास्त दराने (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) करण्यास तयार आहे. सध्या वाढलेली मजुरांची मजुरी, डिझेल, पेट्रोल, व मटेरीयलचे वाढलेले भाव लक्षात घेता मे. गुरूनानक इंडस्ट्रीज यांची ४% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्डक्र.४१ पैठणगेट येथील वाहतूक बेटाजवळील २ रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराचे मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८०:**

वार्ड क्र.४५ येथील पैठणगेट ते जीजामाता कॉलनी व सन्मती कॉलनी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १८-२-८९ ठराव क्र.९१७ नुसार र.रू.४,१४,४३२/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.गुरूनानक इंडस्ट्रीज | ४.५% जास्त |
| २ | श्री.एम.एस.जग्गी | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्या कमी दराची व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.५% जास्त दराची मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची निविदा आहे. सदरची निविदा ही जास्त दराची असल्याने आणखी दर कमी करण्याकरीता कार्यालयात प.क्र.मनपा/बांध-२/११३५/८९ दिनांक १.३.८९ अन्वये पत्र दिले असता त्यांनी दिनांक ४.३.८९ ला लेखी कळविले कि, हे सदरचे काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.५% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास तयार आहे. सबब मजुरांची वाढती मजुरीचे दर पेट्रोल डिझेल व मटेरियलचे वाढलेले दर लक्षात घेता मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची ४% जास्त दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४५ येथील पैठणगेट ते जिजामाता कॉलनी येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराचे मे.गुरूनानक इंडस्ट्रिज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८१:**

वार्ड क्र.४८ येथील न्यु श्रेयनगर येथील एस.एस.चौधरी ले आऊट अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १८.२.८९ ठराव क्र.९१६ अन्वये र.रू.३८,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण फक्त एकच निविदा दर भरलेली प्राप्त झाली . सदरची निविदा मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७% जास्त दराची आहे. सदरचे दर हे अंदाजपत्रका पेक्षा जास्त असल्यामुळे दर आणखी कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र.मनपा/बांध-२/११३६/८९ दिनांक १.३.८९ नुसार पत्र दिले असता त्यांनी दिनांक ४.३.८९ ला लेखी कळविले कि, सदरचे काम हे ७% जास्त जास्त ऐवजी ४% जास्त दराने करण्यास तयार आहे. सबब मजुरांचे वाढलेली मजुरीचे दर डिझेल, पेट्रोल चे वाढलेले दर आणि मटेरियलचे वाढलेले दर लक्षात घेता मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड मक्र.४८ येथील न्यु . श्रेयनगर येथील एस.एस.चौधरी लेआऊट अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त जास्त दराचे मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८२ :**

वार्ड क्र.१० चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १८.२.८९ ठराव क्र.९२२ अन्वये र.रू.४,०३,५४४/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झालया त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | मे.गुरूनानक इंडस्ट्रीज | ७% जास्त |
| २ | श्री.एम.एस.जग्गी | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७% जास्त दराची मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे आहे. सदरचे दर अंदाजपत्रका पेक्षा जास्त असल्यामुळे आणखी दर कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र.मनपा/बांध-१/११३७/८९ दिनांक १.३.८९ अन्वये पत्र दिले असता त्यांनी ४.३.८९ ला लेखी कळविले कि, सदरचे काम हे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ७% जास्त ऐवजी ४% जास्त दराने करण्यास तयार आहे. सबब वाढती मजुरांची मजुरी मटेरीयलचे वाढीव दर लक्षात घेता सदरची मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांची ४% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव व विचारर्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१० चिकलठाणा एम.आय.डी.सी.येथील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराचे मे.गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८३ :**

वार्ड क्र.४९ येथील श्री.शिवाजी सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक १८.२.८९ ठराव क्र.९२१ नुसार र.रू.५,८६,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळाली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.गुरूनानक इंडस्ट्रीज | ७% जास्त |
| २ | श्री.एम.एस.जग्गी | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५%जास्त दराची श्री.एम.एस.जग्गी यांची निविदा आहे. सदरचे दर आणखी कमी करण्यासाठी कार्यालयीन प.क्र.मनपा/बांध-२/११३४/८९ दिनांक १.३.८९ अन्वये दिले असता गुत्तेदाराने दिनांक ३.३.८९ अन्वये लेखी कळविले कि, ते अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% जास्त ऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास तयार आहे. सबब मजुरांची वाढलेली मजुरी मटेरीयलचे वाढलेले भाव लक्षात घेता श्री.एम.एस.जग्गी यांची ४% जास्त दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४९ येथील श्री.शिवाजी सिंधी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराचे गुत्तेदार श्री.एम.एस.जग्गी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८४ :**

मनपा अग्निशमन विभागाने कार्यालयीन इमारत मोटार गॅरेज व कंट्रोल रूम बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २८.७.८८ ठराव क्र. २८१ अन्वये र.रू.७,४४,७२०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. पैकी

| | | |
|---|---|---|
| १ | सिव्हील वर्कचे काम | र.रू.५,९४,७२२/- |
| २ | खडी रस्त्याचे काम | र.रू. ४०,०००/- |
| | एकूण | र.रू.६,३४,७२२/- |

बचत र.रू.१,०९,९९८/- या बचतीमधून सदर इमारतीस, मोटार गॅरेज इ.विद्युतीकरण करणेच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या एकूण तीन दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | मे.इगल इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | मे.मुजाहेद इलेक्ट्रीकल्स | ०.०१ % जास्त दराने |
| ३) | मे.लुना इलेक्ट्रीकल्स | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने मे. इगल इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अग्निशमन विभागाचे कार्यालयीन इमारत , मोटार गॅरेज व कंट्रोल रूम बांधणेच्या कामामधून झालेल्या बचतीमधून सदर इमारतीस, मोटार गॅरेज इ. च्या विद्युतीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे मे. इगल इलेक्ट्रीकल्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८५ :**

जलनिःसारण वाहिनी जोडण्याकरीता ६ इंच व्यासाची चिनी मातीचे (एस.डब्ल्यु.जी.) आय.एस.आय. मार्कस "अे" ग्रेड पाईप खरेदीचे अंदाजपत्रक र.रू.२,२१,२२०/- ला स्थायी समितीचा ठराव क्र.८२६ दिनांक १८.१.८९ अन्वये मंजुरी मिळाली आहे. सदर कामासाठी कोटेशन नोटीस मनपा युजिडी/१२०९/ दिनांक २८.२.८९ द्वारे निविदा मागविलया असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.पी.जे तमखाने | २६.६६ प्रती पाईप नग |
| २) | एम.एस.एस.आय.डी.सी. | २९.५१ प्रती पाईप नग |

तुलनात्मकदृष्टया कमी दराची म्हणजे रू.२६.६६ प्रति नग दराचे श्री.पी.जे.तमखाने यांचे दरपत्रक आहे. या दराप्रमाणे एकूण १३,०००/- पाईपची किंमत र.रू.३,४६,५८०/- येते. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जलनिःसारण वाहिनी जोडण्याकरीता ६" व्यासाची चीनी मातीचे (एस.डब्ल्यु. जी.) आय.एस.आय. मार्क्सचे "अ" ग्रेड पाईप खरेदीचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे रू.२६.६६ प्रति नग या दराचे श्री.पी.जे.तमखाने यांचे दरपत्रकास सर्वानुंमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८६ :**

वार्ड क्र.५८ मो. सुराणानगर येथे १५० मी.मी.व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.१,१४,७५५/- ला स्थायी समिती ठराव क्र.८१३ दिनांक १८.१.८९ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता फक्त एकच निविदा श्री.महमद मुस्ताक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची प्राप्त झाली.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५८ मो. सुराणानगर येथे १५० मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता श्री. अहमद मुस्ताक अहमद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८७ :**

उप अभियंता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मिलिंदनगर व कबीरनगर येथे असलेल्या रोड व रोडमधून वाहणाऱ्या नालीस पाईप क्रॉसिंग टाकण्याचे अंदाजपत्रक र.रू.१५,१७५/- ला स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. या भागात औद्योगिक वसाहती मुळे रहदारी वाढलेली आहे. व रस्त्यावर नाल्यामुळे मोठमोठे खडड्े निर्माण झालेले आहेत. तेव्हा गैरसोय दूर होण्याकरीता पाईप क्रॉसिंगचे काम त्वरीत उपलब्ध गुत्तेदार यांचेमार्फत "अ-१" नमुन्यावर करून घेणे्स्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंदनगर व कबीरनगर येथे असलेल्या रोड व रोडमधून वाहणाऱ्या नालीस पाईप क्रॉसिंग टाकण्याचे काम उपलब्ध गुत्तेदाराकडून "अ-१" नमुन्यावर त्वरीत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८८ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि वार्ड क्र.५९/११ मधील रामनगर मुकुंदवाडी एन-२, एन-११ (९ वी योजना) सिडको येथील पाणी पुरवठयाचे व्यवस्थेत सुधारणा करणेच्या कामाकरीता मा. आयुक्तांच्या दिनांक १.२.८९ रोजीच्या आदेशान्वये मनपा/पापु/२७६/८९/ दिनांक २.२.८९ अन्वये निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे चार निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | एन.एस.मालपाणी | ०.५० % कमी दराने |
| २) | परदेशी वासुदेव इंटरप्राईजेस | ७% जास्त |
| ३) | मझरुल हक | ५% जास्त |
| ४) | जी.एम.बालचंदानी | ४.७८६%जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा ठेकेदार श्री.एन.एस.मालपाणी यांची असून ०.५० % (अंदाजपत्रकीय दरापेक्षा) दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५९/११ मधील रामनगर मुंकुंदवाडी एन-२ ,एन-११ (९ वी योजना) सिडको पाणी पुरवठयाचे व्यवस्थेत सुधारणा करणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.एन.एस.मालपाणी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९८९ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३६ मधील किराडपूरा येथे कैकाडीवाडा ते रोशन मस्जीदपर्यंत १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामाअंतर्गत अंदाजपत्रक र.रू.६८,१८५/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर. सदरील कामात साहित्याची किंमत वजा जाता निव्वळ मजुरीची र.रू.१६,६१२/- इतकी आहे. सदरील काम तातडीचे स्वरूपाचे असलयाने शॉर्ट टेंडर नोटीसद्वारे ज्यांचे दर कमी असतील अशा रजिस्टर्ड कंत्राटदारामार्फत करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३६ मधील किराडपूरा येथे कैकाडीवाडा ते रोशन मस्जीदपर्यंत १५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी र.रू.६८,१८५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम शॉर्ट टेंडर नोटीसद्वारे कमी दराचे रजिस्टर्ड गुत्तेदारामार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९० :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३६ मधील वाहेद कॉलनी येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाच्या र.रू. २५,८६५/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.१९ दिनांक २९.६.८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. सदर कामासाठी पाईपसह निविदा मागविल्या असता श्री.अबेदी गुत्तेदार यांची २०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली. सदरील कामामध्ये निव्वळ मजुरीची रक्कम रू.६,३१४/- इतकी आहे. सदरील काम तातडीचे असल्या कारणाने फेरनिविदा न मागविता उलपब्ध गुत्तेदारामार्फत करून घेण्यास्तव प्रस्तावित करण्यात आले होते. मा. सभापतींनी दिनांक २७.३.८९ अन्वये निविदा प्रमाणे काम करून घेण्यास परवानगी दिली आहे.

परंतु सदरील काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे मा. आयुक्तांच्या दिनांक ७.३.८९ च्या आदेशाप्रमाणे उपलब्ध गुत्तेदारामार्फत करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३६ मधील वाहेद कॉलनी येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणेचे काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदारामार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९१:**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३ जयसिंगपूरा येथे शेख उमर शेख उस्मान यांच्या मालकीची विहीर आहे. सदरील विहिरीचे पाणी सार्वजनिक

वापरास मालकाने परवानगी दिली आहे. व सदरील विहीरीचे गाळ काढणे व बांधकाम महापालिकेने करावे असे लिहीले आहे.

सदरील विहिरीचे बांधकाम केल्यास पाणी पिण्यायोग्य होईल. करीता सदरील विहिरीचा गाळ काढणे व बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक र.रू.१९,५५०/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

तसेच सदरील काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे श्री.सलूजा यांचेकून अंदाजपत्रकीय दराने "अ-१" नमुन्यावर करून घेणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३ जयसिंगपूरा येथे शेख उमर शेख उस्मान यांच्या विहिरीचे पाणी सार्वजनिक वापरात आणण्यासाठी विहिरीचा गाळ काढणे व बांधकाम करणेच्या कामासाठी र.रू.१९,५५०/- च्या अंदाजपत्रकास व सदरील काम श्री. सलूजा यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने "अ-१" नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९२:**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव केले आहे कि, शहरातून रोगांचा प्रादुर्भाव त्वरीत कमी करणेसाठी रोग प्रतिबधक उपाय म्हणून खालील औषधी विक्रेत्याकडून कंपनी दरात औषधी व पाणी शुध्दीकरणाच्या गोळया खरेदी करण्यासाठी मंजुरी द्यावी.

१ टी.व्ही.एम.फारमॅकुटीकल

२ प्रिमिअर असोसिएट नागपूर- यांचेकडून टी.व्ही. मेंझील व डिलीप्रीम व क्लोरीन गोळया मागवण्यास मंजुरी द्यावी.

अंदाजपत्रकातील रक्कमेतून रूपये २.५ लाखाच्या खर्चास मंजुरी देवून वरील औषध निर्मात्याकडून कंपनी दरात खरेदी करण्यास मंजुरी द्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातून रोगांचा प्रार्दुभाव त्वरीत कमी करणेसाठी औषध विक्रेत्याकडून कंपनी दरात औषधी व पाणी शुध्दीकरणाच्या गोळया

१ टिव्हीएम फारमॅकुटीकल व

२ मे.प्रिमिअर असोसिएट नागपूरा यांचेकडून मागविण्यास तसच अंदाजपत्रकातील रक्कमेतून रूपये २.५ लाखाच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

स्वाक्षरित/-
सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २१.३.८९ रोजी समिती सभागृह येथे भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत मंगळवार दिनांक २१.३.८९ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता मा. सभापती, श्री.रतनकुमार पंडागळे यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृह येथे स्थायी समितीच्या सभेस सुरूवात झाली. सदरील सभेस खालील स.सभासद व अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री.गिल इकबालसिंग प्रितमसिंग | सभासद |
| २) | मा.श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | सभासद |
| ३) | मा.श्री.यादव अशोक सायन्ना | सभासद |
| ४) | मा.श्री.अजितकुमार शेळके | सभासद |
| ५) | मा.श्री.मोरेश्वर दिनानाथ सावे | सभासद |
| ६) | मा.श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे | सभासद |
| ७) | मा.श्री.स.अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन | सभासद |
| ८) | मा.श्री.स.हुसेन स. अहमद | सभासद |

**विषय क्र.९९३ :**

जलगृह अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वॉर्ड क्र.२० मधील कोतवालपूरा (भडकलगेट) येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.२१,६४५/- चे असून सदरील काम तातडीचे असलयामुळे उपलब्ध गुत्तेदारामार्फत "अ-१" नमुन्यावर करून घेण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२० मधील कोतवालपूरा (भडकलगेट) येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रू.२१,६४५/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदारामार्फत "अ-१" नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९४ :**

जलगृह अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४० मधील बहादुरपूरा येथे ८० व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.३०,१७०/- चे तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४० मधील बहादुरपूरा येथे ८० व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.३०,१७०/- चे तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**विषय क्र.९९५ :**

जलगृह अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.११ मधील सिडको शिवज्योती कॉलनी एन-६ येथे १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी

र.रू.१,११,६००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.७४५ दिनांक २८.१२.८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | काथार बी.एम. | ७% जास्त दराने |
| २) | सजनानी कन्स्ट्रक्शन्स | ४.२३ % जास्त दराने |
| ३) | एस.के.मिसाळ | ८.०४% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांची आहे. कार्यालयीन पत्रक क्र.६२५ दिनांक २८.२.८९ नुसार विचारणा केल्यावरून त्यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्याचे लिहीले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११ मधील सिडको शिवज्योती कॉलनी एन-६ येथे १५० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९६ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.१८ मधील किलेअर्क दरवाजा ते सिटीचौक पोलिस स्टेशन चौक पर्यंत १५० मी.मी.व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.७१,०००/- ला ठराव क्र. ८३७ दिनांक २५.१.८९ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामात निविदेतील रक्कम रू.१६,४३८/- इतकी आहे. सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | सजनानी कन्स्ट्रक्शन | २.२७ % जास्त दराने |
| २ | एन.जी.गुणवाणी | ४.९९ % जास्त दराने |

कार्यालयीन पत्रक क्र.७०८ दिनांक ४.३.८९ अन्वये ठेकेदारास दर कमी करणे विषयी विचाराणा केली असता अंदाजपत्रकीय दराने काम करणेस तयार असलयाचे ठेकेदार श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांनी लिहीले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१८ मधील किलेअर्क दरवाजा ते सिटी चौक पोलिस स्टेशन चौक पर्यंत १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी गुत्तेदार श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांचे अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९७ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.११ मधील सिडको गुलमोहर कॉलनीसाठी १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.७१,८००/- ला ठराव क्र.८३६/दिनांक २५.१.८९ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे.

निविदेची र.रू. ७,६५६/- आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | काथार बी.एम. | २% जास्त दराने |
| २) | सजनानी कन्स्ट्रक्शन | ४.२७% जास्त दराने |
| ३) | एन.जी.गुणवाणी | ५% जास्त दराने |

कार्यालयीन प.क्र.७०९ दिनांक ४.३.८९ अन्वये ठेकेदारास दर कमी करणे विषयी विचारणा केली असता ठेकेदार श्री.काथार यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असलयाचे लिहीले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११ मधील सिडको गुलमोहर कॉलनी साठी १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.बी.एम.काथार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९८ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४४ मधील समतानगर येथे विविध ठिकाणी ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू. ७७,९५३/- ला ठराव क्र.७४६ दिनांक २८.१२.८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. निविदेतील र.रू.२१,७३२/- इतकी आहे. सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | काथार बी.एम. | २.५०% जास्त |
| २ | सजनानी कन्स्ट्रक्शन्स | ६.५०% जास्त |

कार्यालयीन प.क्र.निरंक दिनांक ७.३.८९ अन्वये दर कमी करणे विषयी पत्रक दिले असता ठेकेदार श्री.काथार यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार असल्याचे लिहीले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४४ मधील समतानगर येथे विविध ठिकाणी ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.बी.एम.काथार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.९९९ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.५३ मधील जालननगर येथे १५० मी.मी. व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१,७६,४४०/- ला ठराव क्र.९०४ दिनांक १८.२.८९ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. निविदेतील र.रू.३१,५८३/- इतकी आहे. सदर कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | सजनानी कन्स्ट्रक्शन | ३.१५% जास्त दराने |
| २ | गुणवानी एन.जी. | ४.९ % जास्त दराने |

कार्यालयीन प.क्र.७०२ दिनांक ४.३.८९ अन्वये ठेकेदारास दर कमी करणे बाबत विचारणा केली असता श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांनी अंदाजपत्रकीय दराने काम करणेस तयार असल्याचे लिहीले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५३ मधील जालाननगर येथे १५० मी.मी.व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००० :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४६ मधील लिटलफ्लॉवर स्कुल पासून ते हॉटेल विसावा पर्यंत १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.४१,४००/- ला ठराव क्र.७४४ दिनांक २८.१२.८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. निविदेची र.रू.१२,५४३/- इतकी आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या पैकी काथार यांनी स्पष्ट ५.२०% जास्त दराने दोन ठिकाणी लिहीले आहे व एका ठिकाणी ५.२०% कमी लिहीले आहे. तेथे स्वाक्षरी नाही . करीता दुसरी निविदा सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४२% जास्त दराची आहे.

विचारार्थ सादर.

म्हणजेच दर बरोबर लिहीलेले नाही. त्यामुळे त्यांचे निविदेचा विचार करणे योग्य होणार नाही. करीता दुसरी निविदा श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४२% जास्त दराची आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४६ मधील लिटल फलॉवर स्कुल पासून ते हॉटेल विसावा पर्यंत १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४२% जास्त दराचे गुत्तेदार श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००१ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वॉर्ड क्र.५० मधील मो. उस्मानपुरा (बाजार मस्जिदच्या) मागे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.१९,१५४/- ला ठराव क्र.९०५ दिनांक १८-२-८९ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. निविदेतील र.रू.७,७५८/- इतकी आहे. सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झाल्या.

१) के.बी. काल्डा — अंदाजपत्रकीय दराने

२) एन.जी गुणवाणी — ९% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया कमी दराची श्री.के.बी. काल्डा यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ५० मधील मो. उस्मानपूरा (बाजार मस्जीद) च्या मागे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेबाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार, श्री. के.बी. काल्डा यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १००२ :**

उपअभियंता, (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र. १२ मो.किराडपूरा येथील जलनिःसारण वाहिनीची बऱ्याच ठिकाणी तुटफुट झाल्यामुळे नविन जलनिःसारण वाहिनी टाकणेकरीता रक्कम रु. ४,७६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१२ मो.किराडपूरा येथील नविन जलनिःस्सारण वाहिनी टाकणे बाबत रक्कम रू.४,७६,०००/- चे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००३ :**

उप अभियंता (ग.व.सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मोगलपूरा गलिच्छ वस्ती येथे म्हाडा अंतर्गत मिळणाऱ्या निधीतून ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी (र.रू.७,७५०/-च्या खर्चासाठी ) निविदा मागविल्या नंतर एकही निविदा विक्री झाली नाही. करता आदेशाप्रमाणे सदरील काम "अ-१" नमुन्यावर उपलब्ध ठेकेदार श्री.अे.अे.अबेदी यांचेकडून करवून घेणेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोगलपूरा गलिच्छ वस्ती येथे म्हाडा अंतर्गत मिळणाऱ्या निधितून ८० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.७,७५०/- चे अदांजपत्रकास तसेच सदरील काम "अ-१" नमुन्यावर श्री.अे.अे.अबेदी यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००४ :**

उप अभियंता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, ठराव क्र.८२२अन्वये मान्यता मिळाल्यानंतर वार्ड क्र.१६ मोहल्ला फाजीलपूरा येथील श्री. चांदणे यांच्या घराच्या पाठीमागून सी.आर.एस. गटार टाकणेच्या कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सलिम अहमद | ०.५० % कमी |
| २) | श्री. रविंद्रसिंग | ५ % जास्त |
| ३) | श्री.मॅकवेल कन्स्ट्रक्शन | ६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.सलिम अहमद यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. वार्ड क्र.१६ मोहल्ला फाजीलपूरा येथील श्री. चांदणे यांच्या घराच्या पाठीमागून सी.आर.एस. गटार टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराचे गुत्तेदार श्री.सलिम अहमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००५ :**

उप अभियंता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.किराडपूरा येथे नविन खांडकी बसविणे व जुनी अस्तित्वात असलेल्या खांडकीची दुरूस्ती करणेच्या कामासाठी र.रू.१,४६,४२०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.६७८ दिनांक १४.१२.८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यान्नतर सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एम.कलिमुद्दीन | ३% जास्त दराने |
| २) | श्री.अन्सारी जी.एम.मुजताबा | ४% जास्त दराने |
| ३) | श्री.एम.एम.बेग | ०.५०% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराची श्री.एम.एम.बेग यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.किराडपूरा येथे नविन खांडकी बसविणे व जुनी खांडकी दुरूस्त करणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५०% कमी दराचे गुत्तेदार श्री.एम.एम.बेग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००६:**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला की, रोझाबाग येथे प्रार्थना स्थळाकडे जाण्याकरीता नागरिकांना रस्ता नसल्यामुळे त्यांना त्रास होत आहे. त्याकरीता तेथे खडी रस्त्याचे काम करणे आवश्यक आहे. काम अत्यंत तातडीचे असल्यामुळे हे काम उपलब्ध गुत्तेदार श्री.पॉल कन्स्ट्रक्शन्स यांचे मार्फत "अ-१" नमुन्यावर करून घेण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोझाबाग येथे प्रार्थना स्थळाकडे जाण्याकरीता खडी रस्ता तयार करण्याचे कामासाठी रक्कम रू.५०,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्यामुळे उपलब्ध गुत्तेदार श्री.पॉल गन्स्ट्रक्शन्स यांचे मार्फत "अ-१" नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००७ :**

वार्ड क्र.१३ मो. करीम कॉलनी येथे गटार दुरूस्त करून त्यावर आ.सी.सी. स्लॅब टाकणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.१,१३,१२०/- ला ठराव क्र.११ दिनांक २१.९.८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी निविदा मागविल्या असता एकूण नऊ निविदा दरनिर्दिष्ट प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

१) सईद खान ११.९% कमी
२) फारूकी ए.एम. १६.१% कमी
३) कुलवंतसिंग ५% कमी
४) हाबीब खान २१.५०% कमी
५) अंबादास इंगळे २१.१०% कमी
६) चेअरमन, प्रविण म.संघ १४% कमी
७) आनंद बिल्डर्स १३.६% कमी
८) एन.जी.गुणवाणी १२.०२% कमी
९) मॅकवेल कन्स्ट्रक्शन्स ११.११% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५०% कमी दराचे श्री. हाबीब खान यांचे दरपत्रक आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१३ मो. करीम कॉलनी येथे गटार दुरूस्त करून त्यावर आ.सी.सी. स्लॅब टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.५०% कमी दराचे श्री.हाबीब खान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००८ :**

वार्ड क्र.३ मो. जयसिंगपूरा जी.वाय. हस्त यांच्या घरापासून आनंद रेस्टॉरंट पर्यंत १५० मी.मी. व्यासाची ड्रनेज लाईन टाकणेकरीता रक्कम रूपये ११,७२०/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. ४७८ दिनांक २१.१०.८८ नुसार मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

१) संतोष पगारे ६.५०% कमी
२) आर.बी.चव्हाण २५.५% कमी
३) के.बी.काल्डा १३.९९% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे श्री. आर.बी.चव्हाण यांचे दरपत्रक आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३ मो.जयसिंगपूरा जी.वाय.हस्त यांच्या घरापासून आनंद रेस्टॉरंट पर्यंत १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५.५% कमी दराचे गुत्तेदार श्री.आर.बी.चव्हाण यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१००९ :**

महानगरपालिका कार्यालयाबाहेर सार्वजनिक मुताऱ्या बांधणेबाबत अंदाजपत्रक र.रू.९,२९०/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका कार्यालयाबाहेर सार्वजनिक मुताऱ्या बांधणेबाबत तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.९,२९०/- चे अदांजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१० :**

वार्ड क्र.२८ मो.शहागंज मार्केट येथे सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक र.रू.९,४८०/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ मो.शहागंज मार्केट येथे सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रू.९,४८०/- चे अदांजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०११:**

वार्ड क्र.३८ मो. ढोरपूरा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक र.रू.९,५००/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ मो. ढोरपूरा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेल र.रू.९,५००/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१२ :**

वार्ड क्र.३६ तेलंगवाडा येथील सार्वजनिक संडासची दुरूस्ती करणेबाबत अे-१ अंदाजपत्रक र.रू.९,८८७/- चे तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३६ तेलंगवाडा येथील सार्वजनिक संडासची दुरूस्ती करणे बाबत तयार करण्यात आलेले अे-१ अंदाजपत्रक रक्कम रूपये ९,८८७/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०१३ :**

वार्ड क्र.२५ मो. औरंगपूरा भाजीमंडई येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक र.रू.१४,९००/- चे तयार करण्यात आले आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२५ मो. औरंगपूरा भाजीमंडई येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये १४,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१४ :**

वार्ड क्र.१५ मो.काचीवाडा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक र.रू.९,२००/- चे तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१५ मो.काचीवाडा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रू.९,२००/-चे अदांजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१५ :**

वॉर्ड क्र.२३ मो. पारधीपूरा मिलकॉर्नर येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक र.रू.१८,३५०/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २३ मो. पारधीपूरा मिलकॉर्नर येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रूपये १८,३५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१६ :**

वार्ड क्र.१४ मो.मुर्गीनाला येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अदांजपत्रक र.रू.७,०६३/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**संवाद :**

वार्ड क्र.१ भिमनगर भागात काही रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे. पण त्या रस्त्याला लागून असलेल्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम मात्र हाती घेण्यात आले नाही तसेच या वार्डातील नाल्याचे कामाबातही हीच परिस्थिती आहे. तेव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा अशी मागणी स.सदस्य श्री.यादव अशोक सायन्ना यांनी केली असता भिमनगर भागातील उर्वरित रस्त्याच्या खडीकरणाचे अदांजपत्रक प्रथम तयार करण्याची सूचना उप अभिंयता (स्लम) यांना मा. सभापती यांनी दिली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१४ मुर्गीनाला येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रू.७,०६३/- चे अदांजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१७ :**

वार्ड क्र.१७ मो. लोटाकारंजा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक र.रू.६,७२५/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१७ मो. लोटाकारंजा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेले र.रू ६,७२५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१८ :**

वार्ड क्र.१८ मो.कबाडीपूरा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रू.२२,२१०/- चे तयार करण्यात आले आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१८ मो.कबाडीपूरा येथील सार्वजनिक संडास दुरूस्त करणे बाबत तयार करण्यात आलेले र.रू.२२,२१०/ चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०१९ :**

वार्ड क्र.४ बुऱ्हाणी कॉलनी (न्यु.इरा हौ.सो.) येथे ६ इंच व्यासाची ड्रनेज लाईन टाकणेसाठी र.रू.१,१२,१००/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.२७३ दिनांक १७.८.८८ द्वारे मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण अकरा दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या . त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १) | काझी रफीकउद्यीन | १५.५०% कमी |
| २) | पी.जे.तमखाने | ९.७७% कमी |
| ३) | जावेद खान | १९.१०% कमी |
| ४) | कुलवंत सिंग | १०% जास्त |
| ५) | पॉल कन्स्ट्रक्शन | १३.८५% कमी |
| ६) | आनंद बिल्डर्स | १७.३% कमी |
| ७) | एन.जी.गुणवाणी | १५.९% कमी |
| ८) | शंकर भैरव | २४.७०% कमी |
| ९) | के.बी.काल्डा | ११.२% कमी |
| १०) | शे. इकबाल अहेमद | १५% कमी |
| ११) | एस.बी.साळवे | २६% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी दराची श्री.एस.बी.साळवे यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४ बुऱ्हाणी कॉलनी (न्यु इरा हौ.सोसायटी) येथे ६ इंच व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.बी.साळवे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२० :**

वॉर्ड क्र. ३६ मो. बायजीपुरा ते रोषणगेट व्हाया औरंगाबाद तालुका जिनींग व प्रेसिंग फॅक्टरी येथे १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अतिरिक्त अंदाजपत्रक रक्कम रु. ६६,७६०/- चे तयार करण्यात आले असून सदर काम संबंधित गुत्तेदार, श्री. के.बी. काल्डा यांचेकडून त्यांचे पुर्वीचे मंजुरी दराने परंतु सन ८७-८८ चे डी.एस.आर.प्रमाणे करुन घेण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ३६ मो.बायजीपूरा ते रोषनगेट व्हाया औरंगाबाद तालुका जिनींग प्रेसिंग फॅक्टरी येथे १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेबाबत तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६६,७६०/- चे अतिरिक्त अंदाजपत्रकास तसेच सदरील काम गुत्तेदार श्री. के.बी. काल्डा यांचेकडून त्यांचे पुर्वीचे मंजुर दराने परंतु सन १९८७-८८ चे डि.एस.आर. प्रमाणे करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२१:**

वार्ड क्र.५२ मो.उमाजी कॉलनी साधना लॉजजवळ १५० मी.मी.व्यासाची (एस.डब्ल्यु.जी.) ड्रनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.१७,६००/- ला ठराव क्र. २७२ दिनांक १७-८-८८ अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण नऊ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | संतोष पगारे | १३.५% कमी |
| २) | एस.डल्ब्यू रोकडे | १८.२३% कमी |
| ३) | आर.बी.चव्हाण | २२% कमी |
| ४) | आर.एस.अडणे | ११.११% कमी |
| ५) | काझी रफीउद्दीन | ५.५% कमी |
| ६) | एस.जी.गुणवाणी | १७.९९% कमी |
| ७) | ए.एन.काल्डा | १७.९०% कमी |
| ८) | बी.एम.काथार | १७% कमी |
| ९) | अ.सत्तार खान हाजी सरदार खा | १६% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराची श्री.आर.बी.चव्हाण यांची निविदा आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५२ मो.उमाजी कॉलनी, साधना लॉज जवळ १५० मी.मी.व्यासाची (एस.डब्ल्यु.जी.) ड्रनेज लाईन टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराचे गुत्तेदार श्री. आर.बी.चव्हाण यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२२:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, मनपाच्या पाचवी वर्ग असलेल्या शाळांसाठी एन.सी.ई.आर.टी.च्या पेटया पुरविण्यासाठी रक्कम रू.३२,४००/- खर्च येईल. सदर खरेदी ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई यांच्या मार्फत करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या पाचवी वर्ग असलेल्या शाळांसाठी एन.सी.ई.आर.टी. च्या पेटया पुरविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३२,४००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खरेदी ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई यांच्या मार्फत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२३ :**

शहर अभिंयता यांनी अभिंप्राय दिला आहे कि, शहरातील स्ट्रीट लाईट दुरूस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य मागविणे आहे. यापुर्वी निविदा क्र.१३७४ दिनांक १७.८.८८ नुसार मागविण्यात आलेल्या निविदा प्रमाणे मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांचे दर खालील साहित्यात कमी होते.

१) १२५ वॅट मक्युरी फिटींग (बजाज मेक)
२) १२५ वॅट मर्क्युरी बल्ब (बजाज मेक)
३) ४० वॅट कॉपर चोक (बजाज मेक)

आदेश क्र.११५८ दिनांक २२-९-८९ नुसार मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांना आदेश देण्यानुसार त्यांनी सर्व साहित्य पुरवठा केलेला आहे व आणखी वरील साहित्य मागविणे आवश्यक आहे. तरी खालील मंजुर दरात खालील साहित्य मागविणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | | मंजुर दर | एकूण नग | एकूण र.रू. |
|---|---|---|---|---|
| १ | १२५ वॅट मक्युरी फिटींग | ९२४.०० | २०० नग | १,८४,०००-०० |
| २ | १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १२७.०० | २०० नग | २५,४००-०० |
| ३ | ४० वॅट कॉपर चोक | ७८.५० | ५०० नग | ३९,२५०-०० |
| | एकूण रक्कम रूपये | | | २,४९,४५०-०० |

तरी वरील सहित्य मंजुर दरात मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी,औरंगाबाद तर्फे मागविणेस्तव व रक्कम रू.२,४९,४५०/- ला मुंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे, शहरातील स्ट्रीट लाईट दुरूस्तीसाठी लागणारे विद्युत साहित्य खरेदीसाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.२,४९,४५०/- ला तसेच सदरील विद्युत साहित्य मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी, औरंगाबाद यांचे तर्फे खालील दराने मागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | मंजुर दर | एकूण नग | एकूण र.रू. |
|---|---|---|---|---|
| १ | १२५ वॅट मक्युरी फिटींग | ९२४.०० | २०० नग | १,८४,०००-०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १२७.०० | २०० नग | २५,४००-०० |
| ३ | ४० वॅट कॉपर चोक | ७८.५० | ५०० नग | ३९,२५०-०० |

**विषय क्र.१०२४ :**

शहर अभिंयता यांनी अभिप्राय दिला शहरातील नविन रिकाम्या विद्युत पोलवर स्ट्रीट लाईट ४ X ४० वॅट फिच्चर लावणेसाठी दिनांक १७.८.८८ रोजी क्र.१३७४ नुसार निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात मे.पगारिया एन्टरप्राईजेस, सराफा औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असल्यामुळे त्यांना आदेश क्र.११५९ दिनांक २२-९-८८ ओदश देण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी सर्व साहित्य पुरवठा केलेला आहे. परंतु सध्या रिकाम्या विद्युत पोलवर नविन फिच्चर लावणेसाठी सदरील एजन्सी मे.पगारिया एन्टरपाईजेस हे जुन्याच दरामध्ये देण्यास तयार असल्यामुळे त्यांच्यातर्फे एकूण ५०० नग रू.४१८.९० मंजुर दराने एकूण र.रू.२,०९,४५०/- ला घेण्यास एकूण रक्कमेस मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील नविन रिकाम्या विद्युत पोलवर स्ट्रीट लाईट ४X४० वॅट फिच्चर लावणेसाठी रू.४१८-९० या दराने ५०० नगाकरीता एकूण रक्कम रू.२,०९,४५०/- च्या खर्चास तसेच सदरील नविन फिच्चर मे.पगारिया इन्टरप्राईजेस हयांचेकडून जुन्या दराने खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२५ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला कि, सध्या अस्तित्वात असलेली महानगरपालिकेच्या इमारतीच्या आवारात नविन प्रशासकीय इमारत (जी-३) च्या बांधकामाचे अंदाजपत्रक (पाम) मराठवाडा व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञ संघटना यांनी र.रू.२८,१५,५३३/- (रूपये अठठ्विस लक्ष पंधरा हजार पाचशे तहतीस फक्त) चे सादर केले आहे. त्यात पाणीपुरवठा व जलनिस्सारण तसेच विद्युतीकरणाची तरतुद केली आहे.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

तसेच सदरील कामाचे व्यावसायिक शुल्क १% प्रमाणे २४,४३७/- मराठवाडा व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञ संघटना यांनी आकारला आहे. सदरील खर्चास मान्यता मिळणेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद:**

कार्यालयीन इमारतीचे बांधकामात भविष्याचा विचार करता लिफ्टच्या व्यवस्थेसाठी आवश्यक त्या गाळयाची तरतुद करण्यांत यावी. तसेच या बांधकाम नकाशामध्ये अभिलेख विभागाच्या शेजारी उपहारगृहाच्या पाकगृहाची जागा दाखविली आहे ती योग्य नाही. तेव्हा योग्य ती दुरूस्ती करण्यात यावी अशी सूचना स.सभासद श्री.मोरश्वर सावे यांनी केली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सध्या अस्तित्वात असलेली महानगरपालिकेच्या इमारतीच्या आवारात नविन प्रशासकीय इमारत (जी-३) च्या बांधकामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.२८,१५,५३३/- चे अंदाजपत्रक (पाम) तसेच सदरील कामाचे मराठवाडा

व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञ संघटना यांनी आकारलेले व्यावसायिक शुल्क १% प्रमाणे २४,४३७/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. ठरावामध्ये सर्व समंतीने खालीलप्रमाणे वाढ करण्यात येते.

कार्यालयीन इमारतीचे बांधकामात भविष्याचा विचार करता सोपान (Lift) च्या व्यवस्थेसाठी आवश्यक त्या गाळयाची तरतुद आणि या बांधकाम नकाशामध्ये अभिलेख विभागाशेजारी दर्शविलेल्या उपहारगृह पाकगृहाची जागा बदलण्याची व्यवस्था करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०२६ :**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन १९८८-८९ हया वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणारे पशु चिकत्सालय, प्राणी संग्रहालय वगैरे करीता लागणारे औषधे व अवजारेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१ औषधी खरेदी करीता तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

अ बी.पी औषधे - याकरिता १०६ ॲटमपैकी फक्त तीन ॲटमचे दर दोन विक्रत्यांनी दिले आहेत.

१ मे.त्रिमुर्ती यांनी ॲटम नं.८७ व ९१ चे दर कमी दिलेले आहेत.

२ मे.गायत्री यांनी ॲटम क्र.९२ चे दर कमी दिलेले आहेत. इतर आयटम करीता एकाचेच दर प्राप्त झाल्यामुळे (बीपी) औषधाचे फेर निविदा मागविण्यात यावे.

ब जिवनरक्षक (प्रोप्रायटरी औषधी) याकरीता ॲटम १३५ पैकी खालील निविदा धारकांनी ज्या कंपन्याचे अधिकृत विक्रते आहेत त्यांचे पत्र नेवून दर दिले आहेत.

१ मे.नितीन एजन्सी हे मेरोंड गलीडाआ मे.ॲड बेकर हेस्ट, अलमेबीक, साराभाई, आय.डी.पी.एल.हया सात कंपन्याचे अधिकृत विक्रेते म्हणून पत्र जोडले आहेत.

२ मे.त्रिमुर्ती यांनी एच.ज्युलर्स,युनिव्हर्सल मेडीलमेंटस व युनिव्हर्सल आर्युवेद या तीन कंपन्याचे अधिकृत विक्रते म्हणून पत्र जोडले आहे.

३ मे.गायत्री यांनी कोणत्याही प्रकारच्या कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याचा पुरावा न देता ॲटम क्र.३, ४ व १०५ चे दर दिले आहेत. तरी जिवनरक्षक औषधेवरील दर्शविलेले विक्रेते व इतर विक्रेत्या (ज्यांच्याकडे ज्या कंपनीचे अधिकृत विक्रेते म्हणून पत्र राहील त्यांना) कडून औषधी खरेदी करण्यास्तव मंजुरी देण्यात यावी.

३ साहित्य व अवजारे खरेदी करीता तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

अ मे.साईन्टीफिक सर्जिकल ट्रेडर्स यांना ॲटम क्र.१,२,३,५,६ ७,१४,१९,२५,२८ व २९ चे दर इतरपेक्षा कमी दिलेले आहेत.

ब मे.मॅरिन सर्जिकल यांनी ॲटम क्र.४,९,८,१०,१२,१३,१५,१६,१७,१८,२०,२१,२२,२३,२४,२६,२७,३० व ३१ चे दर इतरापेक्षा कमी दिलेले आहेत. तरी अवजारे व साहित्य खरेदी करण्यास मंजुरी मिळावी.

तरी औषधी ,साहित्य व अवजारे खरेदी करण्याकरीता वरीलप्रमाणे मंजुरी देण्यात यावी. सदरील खर्च हे पशु चिकित्सालय व प्राणी संग्रहालय या शिर्षामधून करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

पशुधन विकास अधिकारी यांनी दाखल केलेल्या प्रस्तावाप्रमाणे

१ जिवनरक्षक औषधी करीता मे.नितीन एजन्सी , मे.त्रिमुर्ती हे ज्या ज्या कयपंनीचे अधिक्रृत विक्रते असतील ती ती औषधी व मे.गायत्री यांचेकडून ॲटम क्र.४,५व १०५चे औषधी  खरेदी करणे.

२ साहित्य व अवजारे खरेदी

अ मे.साइन्टीफिक सार्जिकल ट्रेडर्स ॲटम रू.१,२,३,५,६,७,१४,१९,२५,२८ व २९

ब मे.मॅदिन सर्जिकल्स ॲटम क्र.४,८,९,१०,१२,१३,१५,१६,१७,१८,२०,२१,२२,२३,२४,२६,२७,३०व ३१

वरील प्रमाणे खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२७ :**

सहाय्यक आयुक्त -२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, महानगरपालिकेतील वाहन चालक व तसेच चतुर्थश्रेणी महिला व पुरूष कर्मचाऱ्यांना चामडी बुट व चप्पल सन १९८८-८९ सालाचे वाटप करावयाचे आहेत. त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे तयार करण्यात आलेला असेन कमी दर खालील निविदाधारकांचे आहेत.

| | | | दर |
|---|---|---|---|
| १ | चामडी बुट | मे.मॉर्डन स्टेशनरी ॲन्ड जनरल सप्लायर्स, औरंगाबाद | १८०-०० प्र.पेअर |
| २ | चामडी चप्पल नंबर ४ ते ९ | मे.मनोज एन्टरप्रायझेस औरंगाबाद | ७५-५० प्र.पेअर |

वरील प्रमाणेच्या चामडी बुट व चप्पल खरेदी करण्यास उपविधीमध्ये र.रू.२००/- व ५०/- याप्रमाणे खर्च मर्यादा देण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात प्राप्त झालेल्या निविदातील दरानुसार चामडी चप्पलसाठी रूपये २५.५० जास्त खर्च येतो. प्रस्तावात दर्शविल्या दरानूसार साहित्य खरेदी करण्यासाठी रक्कम रू.१,५५,३५०/- एवढा खर्च येईल.  उपविधीमध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विधी विभागास विनंती करण्यात यते. उपविधीमध्ये दुरूस्ती होईल या अटी अधीन राहून प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका वाहन चालक तसेच चतुर्थश्रेणी महिला व पुरूष कर्मचाऱ्यांना चामडी बुट व चप्पल खरेदीस्तव रक्कम रू.१,५५,३५०/- चे खर्चास तसेच बुट व चप्पल मे.मॉर्डन स्टेशनरी ॲन्ड जनरल सप्लायर्स, औरंगाबाद व मे.मनोज एन्टरप्राईजेस, औरंगाबाद यांचेकडून अनुक्रमे १८०-०० प्र.पेअर व ७५.५० प्र.पेअर या दराप्रमाणे खरेदी करणेस तसेच चामडी बुट व चप्पल खरेदी करण्याचे उप विधीमध्ये आवश्यक ती दुरूस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२८ :**

हायड्रोलिक लॅडरसाठी द्यावयाचा १२१० टाटा चासिसवर स्टील कबिन तयार करण्यासाठी दरपत्रके मागविली असता फक्त एकच दरपत्रक आलेले असून ते मे.आसीम वेल्डींग वर्क्स, औरंगाबाद हयांचे असून रू.२२,०००/- चे आहे .

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हायड्रोलिक लॅडरसाठी घ्यावयाचा १२१० टाटा चासिसवर स्टील कॅबिन तयार करण्यासाठी मे.असिम वेल्डींग वर्क्स औरंगाबाद यांनी सादर केलेल रक्कम रू.२२,०००/- चे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०२९ :**

विविध प्रकारचे एकूण टायर्स /टयुब/ फलॉप खरेदी करण्यासाठी वर्तमान पत्रात टेंडर नोटीस देवून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा पत्रके वसुल झालीत. त्यातील एकूण २३ टायर/टयुब/फलॉप करिता मे.मुनीत एंटरप्राईजेस, औरंगाबाद यांचे दर कमी आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

| अ) टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| १. ७.०० x १५/१० पीआर टा.टयु (मोदी स्टोन) | ११ | २१७५/- | २३,९२५-०० |
| २. ९.००x२०/१ १६ पी.आर टा.टयु.प्ला. (मोदी स्टोन) | १२ | ५५४८/- | ६६,५७६-०० |
| | | एकूण: | ९०,५०१-०० |

उर्वरित ४६ टायर/टयुब/प्लॉप करिता मे. विजय एजन्सीज औरंगाबाद यांचे दर कमी आहत ते खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १.५.९० x १५/६ पीआर टा.टयु (एम.आर.एफ) | ०६ | १०५०/- | ६,३००-०० |
| २.६.००x१६/६ पी.आर टा.टयु.प्ला. (मोदी स्टोन) | १२ | १३२०/- | १५,८४०-०० |
| ३. ६.०० x १६/८ पीआर टा.टयु (मोदी स्टोन टी.एफ) | ०८ | ९८५/- | ७,८८०-०० |
| ४. ७.५०x१६/१० पी.आर टा.टयु (एम.आर.एफ) | ०६ | १६७५/- | १०,०५०-०० |
| ५. ७.५० x २०/१२ पी.आर.टा.टयु. (मोदी स्टोन) | ०७ | ३५००/- | २४,५००-०० |
| ६. ९.०० x २०/१४ पी.आर.टा.टयु. (मोदी स्टोन) | ०७ | ४९५०/- | ३४,६५०-०० |
| | | एकूण: | ९९,२२०-०० |

एकूण ६९ टायर / टयुब/फलॉप करीता अ,ब, प्रमाणे एकूण रू.१,८५,७२१-०० खर्च येतो. अ प्रमाणे एकूण २३ टायर / टयुब/फलॉप करीता मे.मुनित एन्टरप्राईजेस औरंगाबाद यांचे कडून ब प्रमाणे एकूण ४६ टायर / टयुब/फलॉप करीता मे.विजय एजन्सीज औरंगाबाद यांचे खरेदी करण्यास्त विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टायर खरेदी करीता मे.मुनोत एंटरप्राईज, औरंगाबाद यांचे खालील प्रमाणे दर्शविलेल्या दरास

| अ) टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| १. ७.०० x १५/१० पीआर टा.टयु (मोदी स्टोन) | ११ | २१७५/- | २३,९२५-०० |
| २. ९.००x२०/१ १६ पी.आर टा.टयु.प्ला. (मोदी स्टोन) | १२ | ५५४८/- | ६६,५७६-०० |

तसेच मे.विजय एजन्सी ,औरंगाबाद यांचे मार्फत

| टायर साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| १. ५.९० x १५/६ पीआर टा.टयु (एम.आर.एफ) | ०६ | १०५०/- | ६,३००-०० |
| २. ६.००x१६/६ पी.आर टा.टयु.प्ला. (मोदी स्टोन) | १२ | १३२०/- | १५,८४०-०० |
| ३. ६.०० x १६/८ पीआर टा.टयु (मोदी स्टोन टी.एफ) | ०८ | ९८५/- | ७,८८०-०० |
| ४. ७.५०x१६/१० पी.आर टा.टयु (एम.आर.एफ) | ०६ | १६७५/- | १०,०५०-०० |
| ५. ७.५० x २०/१२ पी.आर.टा.टयु. (मोदी स्टोन) | ०७ | ३५००/- | २४,५००-०० |
| ६. ९.०० x २०/१४ पी.आर.टा.टयु. (मोदी स्टोन) | ०७ | ४९५०/- | ३४,६५०-०० |
| | | एकूण: | ९९,२२०-०० |

या दराने टायर खरेदीस व रक्कम रू.१,८५,७२१-०० च्या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३० :**

महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी दिर्घ मुदती मध्ये विविध बँकेत गुंतविल्या आहेत. त्यापैकी खालील दर्शविलेल्या ठेवी माहे, फेब्रुवारी १९८९ मध्ये परिपक्व झाल्या आहेत आणि त्याची फेरगुंतवणू करणे आहे.

| ठेवी | देय तारीख | रक्कम रूपये | ठेवीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| वेतन निधी ८२५९४८ २८.४.१९८४ | २८.२.८९ | १,४७,२५०-०० | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद |
| भविष्य निर्वाह निधी १७८५३५ २.१.१९८४ | २९.२.१९८९ | २,००,०००-०० | स्टेट बँक ऑफ इंडिया |

दिर्घ मुदतीची ठेव आहे. तेव्हा व्याज जास्त मिळण्याचे दृष्टीने बँकेतील ठेव काढून ती किमान विकास पत्रात जमा करणेची परवानगी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे माहे फेब्रुवारी १९८९ मध्ये परिपक्व झालेल्या खालील ठेवी जास्त

| ठेवी | देय तारीख | रक्कम रूपये | ठेवीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| वेतन निधी<br>८२५९४८<br>२८.४.१९८४ | २८.२.८९ | १,४७,२५०-०० | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद |
| भविष्य निर्वाह निधी<br>१७८५३५<br>२.१.१९८४ | २९.२.१९८९ | २,००,०००-०० | स्टेट बँक ऑफ इंडिया |

व्याज मिळण्याचे दृष्टीने बँकेतून काढून किसान विकास पत्रात जमा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०३१:**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन १९८९-९० सालासाठी शहरातील मोकाट डुकरांचा बंदोबस्त करणेसाठी त्यांना पकडून मॅफको लि.मुंबई या ठिकाणी पोहोचविण्यासाठी व इतर प्राण्यांचे वाहतुक करण्याकरीता स्थानिक वाहतुकदारांकडून दरपत्रके मागविण्यात आली. त्यांचे दर खालील प्रमाणे.

| वर्णन | मे.गितांजली ट्रान्सपोर्ट | आर.के. रोडवेज | हिंद रोडलाईन्स | न्यु.औरंगाबाद ट्रान्सपोर्ट |
|---|---|---|---|---|
| अ वाहतुक दर प्रति कि.मी. | | | | |
| १.ट्रक मोठी | ६.०५ | ७.१० | ७.२० | ७.०० |
| २.मिनी ट्रक | ४.९५ | ६.१५ | ६.२० | ६.०० |
| ३.टाटा ४ टनी | ४.४० | ७.७५ | ५.४० | ५.५० |
| ४. मेटाडोर | ३.३० | ४.१५ | ४.१० | ३.८० |
| ब. हॉल्टींग चार्जेस (प्रतीतास) | | | | |
| १.ट्रक मोठी | ३१.९० | ३७.०० | ३८.१० | ३८.०० |
| २.मिनी ट्रक | २०.९० | २६.०० | २४.९० | २५.०० |
| ३.टाटा ४ टनी | २०.९० | २५.०० | २६.१० | २६.०० |
| ४. मेटाडोर | ११.०० | १४.०० | १६.०० | १५.०० |
| क.लोडिंग/अनलोडिंग प्रत्येकी | | | | |
| १.ट्रक मोठी | २२०.०० | २८०.०० | ३०५.०० | ३००.०० |
| २.मिनी ट्रक | १३२.०० | १७०.०० | १४५.०० | १५०.०० |
| ३.टाटा ४ टनी | ९९.०० | १३०.०० | १२७.०० | १२५.०० |
| ४. मेटाडोर | ९९.०० | १३०.०० | १२१.०० | १२०.०० |
| | | | | |

वरील प्रमाणे एकूण चार दरपत्रकांपैकी मे.गितांजली यांचे दर सर्वात कमी आहेत. विचारार्थ सादर.

**ठराव :**

पशुधन विकास अधिकारी यांनी दाखल केलेल्या प्रस्तावा प्रमाणे शहरातील मोकाट डुकरांना पकडून मॅफको लि.मुंबई या ठिकाणी पोहचविण्यासाठी व इतर प्राण्यांचे वाहतुकीसाठी मे.गितांजली ट्रान्सपोर्ट यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३२:**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन १९८९-९० करीता शहरात वेगवेगळया ठिकाणी जनावरांचे गोठे आहेत. त्यामुळे जनावरांचे शेण व इतर कचरा एकाच ठिकाणी साठवून शेण/कचरा महानगरपालिकेतर्फे जप्त करून ती घाण १० ते १५ कि.मी.चे अंतरावर आणून टाकणेसाठी स्थानिक वाहतुकदाराकडून (एक ट्रक लोडसाठी) खालीलप्रमाणे दरपत्रके मागविण्यांत आली. त्यांचे नावांसमोर दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.जागीरदार एंटरप्राईजेस | रू.३५०.०० प्रती खेप |
| २) | मे.न्यु.औरंगाबाद ट्रान्सपोर्ट | रू.३२०.०० प्रती खेप |
| ३) | मे.हबीब खान | रू.३२५.०० प्रती खेप |
| ४) | मे.गितांजली ट्रान्सपोर्ट | रू.३०५.०० प्रती खेप |

वरील प्रमाणे एकूण चार दरपत्रके प्राप्त झाली. पैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.गितांजली ट्रान्सपोर्ट कं. यांचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९८९-९० करीता शहरातील शेण/कचरा महानगरपालिकेतर्फे जप्त करून ती घाण १० ते १५ कि.मी.चे अंतरावर आणून टाकणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रक (एक ट्रक लोडसाठी) रक्कम रूपये ३०५/- प्रती खेप या दराने मे.गितांजली ट्रान्सपोर्ट यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३३ :**

पशुधन विकास अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालिके अंतर्गत चालविणेत येणारे प्राणी संग्रहालय व श्वानदंश प्रतिबंधक योजना करीता सन १९८९-९० या वर्षाकरीता खालील प्रकारच्या वस्तुंच्या खाद्याच्या निविदा मागविण्यात आल्या. त्याचां तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.) | बीफ (दर प्रती किलो) | हडड्ी सह रू. | बिना हडड्ी रू. |
|---|---|---|---|
| १) | श्री.शे.रहेमान | ९.२५ | ११.०० |
| २) | श्री.अ.मजीद कुरेशी | १०.५० | १२.५० |
| ३) | श्री.शे. खलील | १०.२५ | १२.२५ |
| ४) | श्री.शे.रूस्तुम | १०.७५ | १२.५० |

वरील प्रमाणे एकूण चार निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री. शे.अ.रहेमान यांचे दर सर्वात कमी आहेत.

| ब) | मटन (दर प्रती किलो) | हडड्ी सह रू. | बिना हडड्ी रू |
|---|---|---|---|
| १) | श्री.मो.खालीद | ३३.०० | ३६.०० |
| २) | श्री.मो.सलीम | ३३.५० | ३७.०० |
| ३) | श्री.म.लतीफ | ३२.०० | ३५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | श्री.मोईन खाजामियॉं | ३४.५० | ३६.९५ |
| ५) | श्री.खाजामियॉ अ.हमीद | ३४.७५ | ३७.९० |

एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. पैकी श्री.अ.लतीफ यांचे दर सर्वात कमी आहेत.

क) मासोळ (दर प्रती किलो) मासोळीचे प्रकार

| | | कतला | रहू | मिरगल |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.मुमताज अहमद | २७.७५ | २७.७५ | २७.७५ |
| २) | श्री.हरेंद्रसिंह सुकुमार | ३५.०० | ३४.०० | ३३.०० |
| ३) | श्री.इंद्रिस खॉ नियाजखॉ | ३२.०० | ३१.०० | ३१.०० |

वरीलप्रमाणे एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री.मुमताज अहमद यांचे दर सर्वात कमी आहेत.

ड) शाळू ज्वारी (बाटुक) कडबा (दर प्रती टन)

१) श्री.अ.रऊफ रू.३,०४०/-
२) श्री.पंडीत म्हस्के रू.३,०५०/-
३) श्री.जनार्दन शेळके रू.२,९१०/-
४) श्री.अ.मतीन रू.३,१००/-

वरील पैकी एकूण चार निविदा प्राप्त झाल्या पैकी श्री.जनार्दन शेळके यांचे दर सर्वात कमी आहेत.

इ) ल्युर्सन घास (प्रती किलो)

१) श्री. अ.मतीन रू.२.१५
२) श्री.पंडित म्हस्के रू.२.२०
३) श्री.जर्नादन शेळके रू.२.१०

वरीलपैकी तीन निविदा प्राप्त झालया पैकी श्री.जर्नादन शेळके यांचे दर सर्वात कमी आहेत.

ई) ब्रेड (दर प्रती पुडा -२५० ग्रॅम प्रमाणे)

१) मे.एलोरा बेकरी रू.२.२५
२) मे.लकी बेकरी रू.२.१५
३) मे.सवेरा बेकरी रू.२.००

वरीलप्रमाणे एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. पैकी मे.सवेरा बेकरी यांचे दर

उ) इतर पदार्थ

| वर्णन (प्रति किलो) | मे.एस.एस.खंडेलवाल | मे.लक्ष्मी ट्रेडिंग कं. | मे.लाहोटी प्रो.कं. |
|---|---|---|---|
| १.हरभरे, | ९.५० | १०.०० | ९.०० |
| २. मका | ३.२५ | ३.५० | ३.०० |
| ३. गहू | ४.०० | ४.२५ | ४.०० |
| ४. तांदूळ | ४.६० | ४.७५ | ४.५० |
| ५. फुटाणे | १४.५० | १५.०० | १४.२५ |
| ६. शेंगदाणे | ११.५० | १२.०० | ११.२५ |
| ७. गुळ | ६.०० | ६.०० | ६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. निरमा साबण प्रतीनग | २.०० | २.०० | २.०० |
| ९. लाईफ बॉय प्रतीनग | ४.२५ | ४.२५ | ४.०० |
| १०.रिनसोप प्रतीनग | ३.७५ | ३.७५ | ३.५० |
| ११. शेंगदाणा पेंड प्रति किलो | ४.२५ | ४.२५ | ४.०० |

वरील प्रमाणे एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या, पैकी ॲटम नं.३ चे दर मे.एस.एस.खंडेलवाल व मे.लाहोटी प्रोव्हीजन्स तर आयटम यनं.७ व ८ याचें दर प्राप्त झालेल्या तीन्ही निविदा धारकांचे दर समान आहेत. इतर पदार्थासाठी मे.लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे दर सर्वात कमी आहेत. करीता वरील तीन्ही पदार्थात समान दर असले तरीही इतर पदार्थासाठी मे.लाहोटी प्रोव्हीजन्स यांचे दर सर्वात कमी आहेत. करीता वरील तीन्ही पदार्थात समान दर असले तरीही इतर पदार्थात मे.लाहोटी प्रो. यांचे दर कमी असलेले त्यांचेकडून वरील सर्व पदार्थ घेणेबाबत विचार व्हावा. तसेच हे पदार्थ दररोज कमी प्रमाणात लागत असलेने सदरील कमी असलेले दरात संबंधिताकडून नगदीने खरेदी करण्यास मान्यता असावी.

याशिवाय अमृत खाद्याचे मे.अरिहंत अन्ड कंपनी हे अधिकृत विक्रेते असलेले असलेले अमृत खाद्य त्यांचेकडून खरेदी करण्यात येते. तसेच दुध शासकीय दुध योजनेकडून (शासकीय दराने) व केरोसीन (शासकीय दराने) खरेदी करण्यात येते. याशिवाय दररोज लागणारे फळे व भाजीपाला खुल्या बाजारातून नगदीने खरेदी करण्यात येतो. कारण सदरील पदार्थाच्या भावात नेहमी चढ उतार होत असतो. (प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना दररोज लागणारे खाद्यपदार्थाची सविस्तर माहिती खालील प्रमाणे )

प्रस्ताव विचारार्थ सादर.

प्राणी संग्रहालयात दररोज लागणाऱ्या खाद्यांचे प्रमाण

| अ.क्र. | खाद्याचे नांव | प्रति दिन |
|---|---|---|
| १) | बीफ | ८४ किलो |
| २) | मटन | साडेदहा किलो |
| ३) | मासोळी | १.५ किलो |
| ४) | ब्रेड | १६पुडे (प्र.पुडा २५० ग्रॅम) |
| ५) | दूध | ७ लिटर |
| ६) | पशुखाद्य | १८ किलो |
| ७) | पोल्ट्री फिड | ९०० ग्रॅम |
| ८) | शेंगदाणे | ३०० ग्रॅम |
| ९) | फुटाणे | २०० ग्रॅम |
| १०) | तांदूळ | २ किलो |
| ११) | कडबा | ४० किलो |
| १२) | ल्यूर्सन | १३५ किलो |
| १३) | केळी | ४ नग |
| १४) | चिकू | १८ नग |
| १५) | मोसंबी | २ नग |

| | | |
|---|---|---|
| १६) | हरभरे | २ किलो |
| १७) | टमाटर | १.२५० ग्रॅम |
| १८) | गुळ | २ किलो |
| १९) | बटाटे | २५० ग्रॅम्स |

नोट: १) दर मंगळवारी फक्त मांसाहारी पिलांना ६ किलो मटन देण्यांत येते. इतर मासांहरी प्राण्यांना हया दिवशी मांस वगैरे देण्यांत येत नाही.
२) जनावरांची संख्या व वाढ नुसार खाद्याचे प्रमाण बदलत राहील.

**संवाद :**

पशुधन अधिकरी यांनी प्रस्तावातील साहित्यासाठी एकूण किती खर्च येईल याचा खुलासा करावा अशी सूचना स.सभासद श्री.मोरेश्वर सावे यांनी केला.

**ठराव :**

पशुधन अधिकारी यांनी दाखल केलेल्या प्रस्तावा प्रमाणे प्राणी संग्रहालय व श्वानदंश प्रतिबंधक योजनेकरीता सन १९८९-९० या वर्षाकरीता खालील प्रमाणे खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | प्रकार | दर | | |
|---|---|---|---|---|
| | | हडड्ी | बिनाहडड्ी | एजन्सी |
| १ | बिफ (प्रती कि.) | ९.२५ | ११.०० | शेख रहेमान |
| २ | मटन (प्रती कि.) | ३३.०० | ३५.०० | श्री. म.लतीफ |
| ३ | मासोळी (प्रती कि.) | कतला राहु मिरगल करीता | २७.७५ | श्री.मुमताज अहमद |
| ४ | शाळु ज्वारी (वाटुक/कडबा)(प्रती टन) | २९१० | | श्री.जनार्धन शेळके |
| ५ | ल्युर्सन घास (प्रती किलो) | २.१० | | श्री.जनार्धन शेळके |
| ६ | ब्रेड प्रतीपुडा २५० ग्रॅम | २.०० | | मे.सवेरा बेकरी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | इतर पदार्थ | किंमत | एजन्सी |
|---|---|---|---|
| १ | हरभरे प्रती किलो | रू.९.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| २ | मका प्रती किलो | रू.३.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ३ | गहू प्रती किलो | रू.४.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ४ | तांदुळ प्रती किला | रू.४.५० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ५ | फुटाणे प्रती किला | रू.१४.२५ | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ६ | शेंगदाणे प्रती किला | रू.११.२५ | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ७ | गूळ प्रती किला | रू.६.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ८ | निरमा साबण प्र.नग | रू.२.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | लाईफ बॉय प्र.नग साबण | रू.४.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| १० | रिनसोप प्र.नग | रू.३.५० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |
| ११ | शेंगदाणा पेंड प्र.किलो | रू.४.०० | मे.लाहोटी प्रोव्हीजन |

याशिवाय अमृत खाद्यासाठी अधिकृत विक्रेते मे.अरिहंत अन्ड कंपनी ,करोसिन व दुध शासकीय दराने आणि भाजीपाला खुल्या बाजारातून खरेदी करण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०३४ :**

भटके जनावरे पकडून वाहतुक करावयाच्या कामासाठी ६ टनी ४ व्हिल ट्रेलर उत्पादन करून पुरवठा करणे.

ही स्पेशल ट्रॉली असल्यामूळे त्यास लागणारी ट्रान्सपोर्ट कमिशनर यांची परवानगी घेवून त्यांनी दिलेल्या परवानगीतील कनिशनर यांची परवानगी घेवून त्यांनी दिलेल्या परवानगीतील डिझाईनप्रमाणे ट्रॉली उत्पादन करून पुरवठा करणे तसेच बिलाची अदागी आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन नंतर केले जाईल. हया अटीवर मागविले असून दोन दरपत्रके वसूल झालीत. पैकी कमी दराचे दरपत्रक मे.नाथ ॲग्रो इक्वीपमेंटर्स प्रा.लिमिटेड, औरंगाबाद हया कंपनीचे असून ते रू.७६,०००-०० चे आहे. त्यास मंजुरी मिळावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भटके जनावरे पकडून वाहतुक करावयाच्या कामासाठी ६टनी ४ व्हील ट्रेलर उत्पादन करून पुरवठा करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे मे.नाथ ॲग्रो इक्वीपमेंटस् प्रा.लिमिटेड हयांचे रक्कम रू.७६,०००-०० चे दरपत्रकास, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून रजिस्ट्रेशन आणि ट्रान्सपोर्ट कमिशनर हयांच्याकडून मिळालेल्या परवानगीतील डिझाईन प्रमाणे ट्रॉली उत्पादन करून पुरवठा करणे या अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## *"ऐनवेळचे विषय "*

**विषय क्र.१०३५:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, शहरातील स्ट्रीट लाईटसाठी लागणाऱ्या बल्लीसाठी मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांना आदेश क्र.११५८ दिनांक २२.१.८८ नुसार ऑर्डर दिलेली होती व त्यांनी सर्व साहित्य पुरवठा केलेला होता. परंतु सध्या विद्युत साहित्य संपलेले आहे व नविन निविदा मागविणेस कालावधी लागेल तसेच सदरील विद्युत साहित्याचे दर महागले आहेत. तसेच मे.बजाज कंपनीचे पत्रक दिनांक १५ मार्च १९८९ दिलेले आहे. मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांचे मंजुर झालेले दरावरच खालील विद्युत साहित्य मागविणेस प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | मंजुर दर नग | नग | एकूण रूपये |
|---|---|---|---|
| १. ४०० वॅट सोडियम बल्ब | ११२५.०० | २५ | २८१२५.०० |
| २. ४०० वॅट सोडियम कंडेन्सर | ३५५.०० | १०० | ३५५००.०० |
| ३. ४०० वॅट इग्नायटर | ३७१.०० | १०० | १७१००.०० |
| ४. १०० वॅट हॅलोजन रॉड | २६९.०० | २०० | ५३८००.०० |
| ५. ४० वॅट कॉपर चोक | ७८.५० | ३००० | २३५५००.०० |
| ६. १२५ वॅट मर्क्युरी बल्ब | १२७.०० | ३०० | ३८१०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. २५० वॅट मर्क्युरी बल्ब(सर्व बजाज मेड) | २७६.०० | १०० | २७६००.०० |
| | | **एकूण रु.** | **४,३५,७२५=००** |

तरी वरील साहित्य मंजुर दरात मे. चिंतामणी ट्रेडींग कंपनी यांचे तर्फे घेण्यास तसेच एकूण रू.४,३५.७२५/- मंजुरी देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील स्ट्रीट लाईट साठी लागणाऱ्या साहित्य मंजुर दरात मे.चिंतामणी ट्रेडिंग कंपनी यांचे तर्फे घेण्यास तसेच रक्कम रू.४,३५,७२५/- या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३६ :**

उप अभिंयता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, म्हाडा अंतर्गत मिळणाऱ्या निधीतून मो.श्हानुरवाडी वार्ड क्र.५७ येथे भुमिगत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाबाबत रक्कम रू.१,३६,४५१/- स्थायी समिती प्रस्ताव क्र.३१ अन्वये मंजुरी मिळाली असता लघू निविदा मागविल्या एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. निविदा उघडल्या नंतर सर्वात कमी दराची निविदा मॅकवेल कन्स्ट्रक्शन्स यांची असून ती अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराची आहे. तरी निविदा मान्य करणे बाबतच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ मो.शहानुरवाडी येथे म्हाडा अंतर्गत मिळणाऱ्या निधीतून भुमिगत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाबाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे मे.मॅकवेल कन्स्ट्रक्शन्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३७:**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्यांना ब्रिफकेस पुरवठा करावयाच्या आहेत. त्यासाठी व्ही.आय.पी.व ॲरीस्टोक्रॅट हया कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांतर्फे ब्रिफकेस मागविण्यात येवून मा.महापौर यांना दाखविण्यात आल्या असता त्यांनी ॲरिस्टोक्रॅट कंपनीची ब्रिफकेस पसंत केली. त्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील ॲरिस्ट्रोक्रॅट कंपनीचे अधिकृत विक्रते मे.विल्को इंटरप्रायझेस यांचे तर्फे ६० नग ब्रिफकेस खरेदी करण्यात येवून मा. सदस्यांना वाटप करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी रू.२८०/- प्रती बॅग असा त्यांनी दर देवून त्यावर १०% सूट दिलेली आहे.

६० नग ब्रिफकेस खरेदीसाठी आलेला खर्च रक्कम रू.१५,१२०/- एवढा आहे सदर खर्च हा आकस्मिक खर्च या सदरातून करण्यांत येईल.

करीता मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका निर्वाचित सदस्यांना ब्रिफकेस पुरवठा करणेस्तव शहरातील ॲरिस्ट्रोक्रॅट कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.विल्को इंटरप्रायझेस यांचे प्रती

बॅग रू.२८०/- असे एकूण रू.१५,१२०/- एवढा खर्च आकस्मिक खर्च, या सदरातून करण्यास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०३८:**

सहाय्यक आयुक्त -२ यांनी प्रस्ताव सादर केला कि, विभागीय अधिकाऱ्यांच्या मागणी नुसार आर.सी.सी.कचरा कुंडया ६० नग खरेदी करावयाच्या आहेत.

स्थायी समिती ठराव क्र.९२ दिनांक ५.८.१९८८ द्वारे इन्सा हार्डवेअर औरंगाबाद हयांचे दर रू.७९५/- प्रती नग असा मंजुर दरानुसार आर.सी.सी.कचरा कुंडया खरेदीसाठी येणारा खर्च रक्कम रू.४७,७००/- एवढा येईल .

करीता मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागीय अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार आर.सी.सी. कचरा कूंडया ६० नग खरेदी करणेसाठी मे.इन्शा हार्डवेअर ,औरंगाबाद यांचे प्रती नग रू.७९५/-या दराप्रमाणे र.रू.४७,७००/- च्या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते .

**विषय क्र.१०३९:**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वित्तीय वर्षाचा अंतिम महिना असल्यामुळे व कामाची वाढती गती तसे डी.पी.डी.सी.चे विकास योजना अंतर्गत घेण्यात येत असलेल्या कामाचा वाढता वेग यामुळे यापुर्वी ५०० मे.टन सिमेंट खरेदी करण्याची मंजुरी मिळाली होती.

सध्या सिमेंटची मागणी वाढत आहे. आणखी ५०० मे.टन सिमेंटची आवश्यकता आहे. पुर्वी सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीकडून प्रती मे.टन ११९०-०० सर्व करासह महानगरपालिकेचे सिमेंट गोडवून पर्यंत पोहचते करण्याची मंजुरी आणखी ५०० मे.टन सिमेंट देण्यास तयार असल्याची लेखी संमती दिली आहे. तरी ५०० मे.टन कंपनीकडून खरेदी करण्यास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कामाचा वाढता वेग यामुळे व सिमेंटची वाढती मागणी असल्यामुळे पुर्वी खरेदी केल्याप्रमाणे मे.सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीकडून प्रती मे. टन ११९०-०० सर्व करासह मिळालेल्या मंजुरीप्रमाणे असून ५०० मे.टन सिमेंट खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४०:**

वॉर्ड क्र.४१ येथील पैठणगेट ट्राफीक आयलँडच्या मोकळया जागेला सी.आर.एस. मेसनरी ड्रेन बांधणेच्या कामासाठी सन १९८८-८९ चे सा.बां.खात्याचे डि.एस.आर.दराने रक्कम रू.२२,१८२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर जागेवर १९८० ला अतिक्रमण काढून टाकलेले आहे. सबब सदर जागेवर परत अतिक्रमण न होण्याचे दृष्टीने व काम तातडीचे असल्यामुळे सदरचे काम उपलब्ध गुत्तेदार श्री.अ.सलाम यांचेकडून "ए-१" निविदाद्वारे अंदाजपत्रकीय रू.२२,१८२/- चा प्रस्ताव विचारार्थ व मुंजुरीस्तव सादर.
सदरचा खर्च विकास योजना रस्ते १९८९-९० या वर्षीच्या खर्चामधून करण्यात येईल.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४१ येथील पैठणगेट ट्राफीक आयलँडच्या मोकळया जागेला सी.आर.एस. मेसनरी ड्रेन बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.२२,१८२/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्यामुळे व अतिक्रमण न होण्योच दृष्टीने उपलब्ध गुत्तेदार श्री.अ.सलाम यांचेमार्फत अे-१ नमुन्यात करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, सुराणा नगर अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम दिनांक ११.१.८९ ठराव क्र.७८५/३ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. या कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१३ जा.क्र.मनपा/१९९२/८९ दिनांक २८.२.८९ रोजी निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ८ निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत ४ निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मकतक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कुलवंतसिंग | २०.१०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) | पाल कन्स्ट्रक्शन्स | २३.१८% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) | एस.ए.नवाब | १०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | एस.एच.असोसिएटस् | अंदाजपत्रकीय दराप्रमाणे |

वरील अ.क्र.२ श्री. पाल कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २३.१८% कमी दराची आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुराणानगर अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबत तुलनात्मकदृष्टया कमी  म्हणजे २३.१८% कमी दराची आहे. विचारार्थ सादर.

**विषय क्र.१०४२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, मुजिब कॉलनी येथील समाज मंदिरास संरक्षित भिंत व वॉचमन क्वॉर्टर बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१,३०,०००/- ला स्थायी समिती बैठक दिनांक १८.१.८९ विषय क्र.२ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा क्र.१३ जा.क्र.मनपा/बांधवि-१/११९२/८९ दिनांक २८.२.८९ रोजी मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ११ निविदा फॉर्म विकल्या गेल्या त्यापैकी शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ३ निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. ठेकेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शेख इकबाल अहेमद | ०.०१% | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) | एम.एम.बेग | १.००% | अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| ३) | एस.ए.नवाब | ३% | अंदाजपत्रकापेक्षा जास्त |

वरील पैकी अ.क्र.१ श्री.शेख इकबाल अहेमद यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा ०.०१% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुजिब कॉलनी येथील समाज मंदिराम संरक्षित भिंत व वॉचमन क्वॉर्टर बांधणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे गुत्तेदार श्री.शेख इकबाल अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४३ :**

शहर अभियता यांनी प्रस्ताव दिला कि, वार्ड क्र.१ त्रिमुर्ती हौऊसिंग सोसायटी, भावसिंगपूरा येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.१,३०,५००/- ला स्थायी समिती बैठक दि. ८-२-८९ रोजी विषय क्र. ३७ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी दिनांक २८.२.८९ रोजी निविदा मागविल्या असता ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | पी.बी.पवार | ११.५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) | एस.एच.असोसिएटस | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ३) | पाल कन्स्ट्रक्शन्स | १८.७०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | एस.ए.नवाब | १७.१७% अंदाजपत्रकापेक्षा कमी. |

वरील पैकी अ.क्र.३ श्री.पाल कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकापेक्षा १८.७०% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ त्रिमुर्ती हौऊसिंग सोसायटी, भावसिंगपूरा येथे खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.७०% कमी दराचे मे.पाल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, वॉर्ड क्र. १२ किराडपुरा (हत्तेसिंगपुरा) येथील मनपा जागेस वायर फेन्सींग करणे बाबत (साईट नं. २०५ सर्व्हे नं.१०) च्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ५३,०३०/- ला स्थायी समिती बैठक दि. ८-२-८९ विषय क्र. ३३ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण ४ निविदा फॉर्म भरुन प्राप्त झाल्या.

त्याचा तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) एन.जी. गुणवानी | २% | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) विक्रम पाटील | १२% | --//-- |
| ३) एस.ए.नवाब | ८% | --//-- |
| ४) सुनिल एम.राका | ६% | --//-- |
| ५) दुराणी क्यु. डब्ल्यू. खान | १०% | --//-- |

वरीलपैकी अ.क्र. २ श्री. विक्रम पाटील यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे १२% कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. १२ किराडपुरा (हत्तेसिंगपुरा) येथील मनपा जागेस वायर फेन्सींग करणे बाबत (साईट नं. २०५ सर्वे नं. १०) च्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% कमी दराचे गुत्तेदार श्री. विक्रम पाटील यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३७ बायजीपूरा येथील महेशनगर अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.८२,४५०/- ला स्थायी समिती बैठक दिनांक ८.२.८९ विषय क्र.१ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाइी निविदा मागविल्या असता एकूण ५ निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अब्दुल सलाम | १५.१०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) | सईद तोफिक अहेमद | २९% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) | कुलवंतसिंग | १८.१०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | एस.एच.असोसिएट | २१.९९% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५) | बी.एस.गायकवाड | १६% अंदाजपत्रकापेक्षा कमी |

वरील पैकी अ.क्र.२ श्री.सईद, तोफिक अहेमद यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २९% अंदाजपत्रकापेक्षा कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३७ मो.बायजीपूरा येथील महेशनगर अंतर्गत खडी रस्ते तयार करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरोपक्षा २९% कमी दराचे गुत्तेदार श्री.सईद तोफिक अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४६ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३१ जाधवमंडी साईट क्र.५८ येथे वायर फेसिंग करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.१८,९२०/- ला स्थायी समिती बैठक दिनांक ८.२.८९ रोजी निविदा मागविलया असता शेवटच्या तारखेपर्यंत एकूण ६ निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | दुरानी क्यु.डब्ल्यु. खान | १०% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| २) | जी.एस.मोर | १०% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| ३) | के.के.मोरे | १२.२८% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | एन.जी.गुणवाणी | २% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५) | कुलवंतसिंग | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ६) | सुनिल एम.राका | २०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |

वरील पैकी अ.क्र.६ श्री.सुनिल एम.राका यांचे निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे २०% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३१ जाधवमंडी साईट क्र.५८ येथील वायरफेन्सींग करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अदांजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराचे गुत्तेदार श्री.सुनिल एम.राका यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३५ खासगेट येथील सिध्देश्वर सोसायटी अंतर्गत नियोजित उद्यानास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.७३,०५०/- ला स्थायी समिती बैठक दिनांक ८.२.८९ विषय क्र.३४ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण १२ निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | पाल कन्स्ट्रक्शन | ११.८०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| २) | एस.बी.सदवणी | ११.२०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) | दुराणी क्यु.डब्लयु खान | २०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ४) | एस.ए.नवाब | १५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ५) | अन्सारी जी.एम. | १०.८६% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ६) | अब्दुल सालम | १५% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ७) | प्रकाश एस.केदार | २०.१% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ८) | एस.एच.असोसिएटस् | ६% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| ९) | थोरात एस.के. | १९.९९% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| १०) | बी.ए.काल्डा | ७.७% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ११) | बी.एस.गायकवाड | १३.१०% अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| १२) | कुलवंतसिंग | ५.७७% अंदाजपत्रकापेक्षा कमी |

वरील पैकी अ.क्र.७ श्री.प्रकाश एस.केदार यांचे निविदोचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे २०.१% अंदाजपत्रकापेक्षा कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३५ खासगेट येथील सिध्देश्वर सोसायटी अंतर्गत नियोजित उद्यानास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.१% अंदाजपत्रकापेक्षा कमी दराचे गुत्तेदार श्री.प्रकाश एस.केदार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०४८ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.३५ खासगेट येथील सिध्देश्वर कॉलनी अंतर्गत खडी रस्ता तयार करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.५५,०००/- ला स्थायी समिती बैठक दिनांक २८.१२.८८ विषय क्र.१८ प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा फॉर्म दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मॅकवेल कन्स्ट्रक्शन | १७.८९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २) | एस.एच.असोसिएट्स | ६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ३) | अब्दुल सलाम | १२% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ४) | पाल कन्स्ट्रक्शन | २१.३५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

| | | |
|---|---|---|
| ५) | कुलवंतसिंग | १८.७७% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ६) | एस.ए.नवाब | १६.५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ७) | बी.एस.गायकवाड | १४.९०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ खासगेट येथील सिध्देश्वर कॉलनी अंतर्गत खडी रस्ता तयार करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.३५% कमी दराचे मे.पॉल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

**विषय क्र.१०४९:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.२१ भडकलगेट ते सिटी क्लब येथे १००फुट डी.पी.खडी रस्ता आणि कर बीन करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.१०,९३,७२४/- ला स्थायी समिती बैठक दिनांक १८.२.८९ विषय क्र.ऐनवेळी प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा मागविल्या असता एकूण ५ निविदा फार्म दर भरून प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एन.डी.गुणवाणी | ४% अंदाजपेक्षा जास्त |
| २) | एस.एच.असोसिएट्स | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ३) | एस.ए.नवाब | अंदाजपत्रकाप्रमाणे |
| ४) | कुलवंतसिंग | ४% अंदाजपेक्षा जास्त |
| ५) | फराज असोसिएटस् | ११.७% अंदाजपेक्षा कमी |

वरील पैकी अ.क्र.५ श्री. फराज असोसिएट्स यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ११.७% कमी दराचे आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२१, भडकलगेट ते सिटी क्लब येथे १०० फुट डी.पी.खडी रस्ता आणि करबीन भरणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.७% कमी दराचे गुत्तेदार श्री. फराज असोसिएट्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यता येते.

**विषय क्र.१०५०:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.२१ ज्युब्ल्यु पार्क येथील निवासस्थानाचे जादा बांधकाम करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये ३,६०,२००/- ला स्थायी समिती बैठक दिनांक ८.२.८९ विषय क्र.२० प्रमाणे मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर कामासाठी निविदा मागविल्या असता एकूण ४ निविदा फार्म दर भरून प्राप्त झाले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एन.जी.गुणवाणी | ४% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| २) | एस.ए.नवाब | ०.०१ % अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| ३) | कुलवंतसिंग | १% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| ४) | पाल कन्स्ट्रक्शन | ८.८० % अंदाजपत्रकापेक्षा जास्त |

वरील पैकी अ.क्र.२ श्री.एस.ए.नवाब यांचे निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजे ०.०१% अंदाजपत्रकापेक्षा कमी दराचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२१ ज्युबली पार्क येथील निवासस्थानाचे जादा बांधकाम करणे बाबतच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५१:**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४६ मधील कोटला कॉलनी जलकुंभ ते पुष्पनगरी येथील डॉ.पारगांवकर हॉस्पीटल पर्यंत १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रूपये १,९१,५००/- स.ठराव क्र.७४२ /६१ दिनांक २८.१२.८८ अन्वये मंजुर झालेले आहे. मनपा /पापु/७०३/८९ दिनांक ४.३.८९ अन्वये जाहिररित्या निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

१) फारूकी अे.एम. ११%कमी दराने
२) सजनानी कन्स्ट्रक्शन्स १०.१५% कमी दराने
३) अे.अे.अबेदी १०% कमी दराने

तुलनात्मकदृष्टया कमी दराची निविदा फारूकी अे.एम. यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराची आहे. करीता ११% कमी दराची श्री.फारूकी अे.एम. यांची निविदा स्विकारणेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४६ मधील कोटला कॉलनी जलकुंभ ते पुष्पनगरी येथील डॉ.पारगांवकर हॉस्पीटल पर्यंत १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत तुलनात्मकदृष्या सर्वात कमी व अदांजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दराचे गुत्तेदार श्री.फारूकी अे.एम. यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५२:**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.११ मधील सिडको एन-७ सेक्टर मधील अस्तित्वात असलेल्या विहीरींची किरकोळ दुरूस्ती व बांधकाम करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.१८,८७०/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

सदरील काम तातडीच्या स्वरूपाचे असल्याने व या विहिरीचे पाणी पिण्या योग्य होत असल्याने उपलब्ध गुत्तेदारांकडून अंदाजपत्रकीय दरावर अ-१ नमुन्यावर करून घेणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११ मधील सिडको एन-७ सेक्टर मधील अस्तित्वात असलेल्या विहीरींची किरकोळ दुरूस्ती व बांधकाम करणे बाबत तयार करण्यात आलेले रक्कम रूपये १८,८७०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीच्या स्वरूपाचे असल्यामुळे व या विहीरीचे पाणी पिण्यास योग्य असल्याने उपलब्ध गुत्तेदारामार्फत "अ-१" नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका,औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०.३८९ गुरूवार रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा वृत्तांत**

**दिनांक ३० मार्च, १९८९रोजी दुपारी १२.०० वाजता स्थायी समिती सभेस औरंगाबाद महानगरपालिका कार्यालयाच्या सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि निम्नलिखीत स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेन खॉन
२) श्री.इकबालसिंग प्रितमसिंग गिल
३) श्री.गाढे गंगाधर सुखदेव
४) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
५) श्री.यादव अशोक सायन्ना
६) श्री.अजितकुमार शेळके
७) श्री.मोरेश्वर दिनानाथ सावे
८) श्री.कचरू चंद्रभान नवपुते
९) श्री.स.अ.एकबालुद्यीन स.मो. कुतुबुद्यीन

**विषय क्र.१०५३ :**

दिनांक १६ मार्च आणि २१ मार्च १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे

**संवाद :**

सुराणा कॉम्प्लेक्सच्या बांधकाम परवानगीचे संदर्भाने या बांधकामाचे पूर्णत्वाबाबतचे कार्यवाही निमित्त बांधकामाचे मूळ मालक, कार्यालय वा अन्य कोठेही बांधकाम परवानगीचा मूळ नकाशा उपलब्ध होत नसल्याने आणि सुराणा कॉम्प्लेक्सचे बांधकाम चालू असल्यामुळे नियमाप्रमाणे चालू बांधकाम बंद करण्याची नोटीस संबंधित मालकास देण्यात यावी आणि रितसर कार्यवाहीसाठी न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात यावे. तसेच सुराणा कॉम्प्लेक्स बांधकाम बाबतची संचिका आणि इतर संबंधित कार्यवाहीबाबत मा. उप आयुक्त यांनी चौकशी करावी अशी मागणी स.सभासद श्री.गंगाधर गाढे श्री.अलफ खॉ हुसेन खॉ श्री.यादव अशोक सायन्ना व श्री.इकबालसिंग गिल यांनी केली.

महापालिका कार्यालयात यांत्रिकी विभाग कार्यरत असूनही कार्यालयीन वाहने दुरूस्ती व अन्य कामासाठी खाजगी गॅरेजमध्ये पाठविली जातात. एका विशिष्ट महिन्यात पाणी पुरवठा टॅंकर दुरूस्तीसाठी रू.९६,०००/- खर्च करावा लागला. याचा अर्थ या विभागात बऱ्याच मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप स.सभासद श्री.गंगाधर गाढे यांनी केला. नियंत्रण अधिकारी शहर अभियता यांचे नियंत्रण कमी असल्याचाही आरोप स.सभासद श्री.अशोक सायन्ना व श्री.स.अ.एकबालोद्यीन यांनी केला.

पाणी पुरवठा टॅंकर दुरूस्तीसाठी एक वर्षापासून ते आतापर्यंत प्रत्येक टॅंकरवर किती खर्च झाला याचा अहवाल येत्या बैठकीमध्ये संबंधित अधिकऱ्याने रितशीर सादर करावा. असे

स. सभासद श्री.गंगाधर गाढे , श्री.मिर्झा अन्वर बेग, श्री.एकबालसिंग गिल व श्री. अशोक सायन्ना यांनी मागणी केली असून "हेड मेकॅनिक" ची नेमणूक करावी असेही सुचविले.

**ठराव :**

दिनांक १६ मार्च आणि २१ मार्च, १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र१०५४ :**

वार्ड क्र.२ मो.लालमंडी कुंभारवाडा ते खामनदी पर्यंत १५०व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रू.२,४४,०३५/- ला स्थायी समिती ठराव क्र.२९ दिनांक २९.६.८८ नुसार मंजुरी मिळालेली आहे. सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र६२०४४/८८ दिनांक १.७.८८ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तेरा निविदा विकण्यात आल्या असून केवळ सात निविदा वसुल झाल्या आहेत व खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | एम.ए.नवाब | ९% कमी |
| २) | मौला अलियार खॉ | ७% कमी |
| ३) | सी.बी.आनंद | २४.९०% कमी |
| ४) | एम.एम.बेग | १९.१०% कमी |
| ५) | पासो इंजिनियरिंग | ५% कमी |
| ६) | उदय इंजिनियरिंग | अंदाजपत्रकीय दराने |
| ७) | कुलवंतसिंग | १५% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९०% कमी दराचे श्री.सी.बी.आनंद यांचे दरपत्रक आहे.

करिता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३ मो. लालमंडी कुंभारवाडा ते खामनदी पर्यंत १५० मी.मी.व्यासाची व ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.९०% कमी दराचे श्री.सी.बी.आनंद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५५ :**

उप अभियंता (ग व सु) यांनी प्रस्ताव सादर केला कि, दिनांक २८-१२-८८ च्या स्थायी समिती कार्यक्रम पत्रिका १८ मधील विषय क्र.३४ अन्वये सर्वात कमी दराची निविदा श्री.सिध्दीकी जफर अहसन यांची असून ती अंदाजपत्रकापेक्षा ०.०२% कमी दराची आहे. परंतु नजरचुकीने सदर प्रस्तावात सै.इर्शाद सैय्यद गणी यांचे नांव लिहिले गेले व ठराव क्र.७१५ दिनांक २८.१२.८८ ला सदर नजरचुकीच्या एजन्सीच्या नावाला मान्यता देण्यात आली.

तरी नजरचुकीने पडलेले श्री.सय्यद इर्शाद सैय्यद गणी यांचे नांव कमी करून त्याऐवजी दुरूस्त नांव श्री.सिद्यीकी जफर अहसन अशी दुरूस्ती ठरावात करणे बाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २८-१२-८८ च्या ठराव क्र.७१५ मध्ये नजरचुकीने पडलेले श्री.सय्यद इर्शाद गणी यांचे नांव कमी करून त्याऐवजी श्री.सिद्यीकी जफर अहसन अशी दुरूस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५६ :**

उप अभियंता (ग व सु) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मो.मिलिंदनगर वार्ड क्र.५६ मधील दोन्ही समाज मंदिराच्या तारेचे कुंपण बांधणेच्या कामास व एजन्सीला मान्यता मिळाल्यानंतर रक्कम रू.२१,४५०/- खर्चास सुरूवात करण्यात आली. त्यानंतर असे निदर्शनास आले कि, सदर ठिकाणी आर.सी.सी. पिल्लरमध्ये लोखंडी गेट बसविणे अत्यंत व नितांत गरजेचे आहे. करिता सुधारित अंदाजपत्रकास र.रू.२७,७५४/- चे तयार करण्यात आले आहे. तरी सुधारित अंदाजपत्रकास मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

(सदरील काम सध्या करित असलेल्या ठेकेदाराकडून करून घेण्यात येईल. )

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५६ मधील दोन्ही समाज मंदिराच्या तारेचे कुंपण बांधणेच्या कामासाठी आर.सी.सी.पिल्लर मध्ये लोखंडी गेट बसविणेच्या वाढीव कामापुढे सुधारित अंदाजपत्रक र.रू.२५,७५४/- च्या रक्कमेस तसेच सदरील काम सध्या करित असलेल्या ठेकेदाराकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५७ :**

शिक्षणाधिकरी यांनी प्रस्ताव सादर केला कि, साकेत प्रकाशन, औरंगाबाद यांचेकडून शालेय वाचनालयासाठी गोष्टीची पुस्ते मा. आयुक्त यार्चे सूचनेनुसार खरेदी करण्यात आली आहेत. तरी र.रू.६,०१६/- किंमतीच्या पुस्तके खरेदीस कार्योत्तर मान्यता द्यावी.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

शिक्षणाधिकारी यांनी मांडलेल्या प्रस्तावाप्रमाणे साकेत प्रकाशन, औरंगाबाद यांचेकडून शालेय वाचनालयासाठी रक्कम रू.६,०१६/- च्या पुस्तके खरेदीस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका,औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ५ एप्रिल १९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस "नगरभुवन" (Town Hall) येथे मा. सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी आणि खालील स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफ खान हुसेन खान
२) श्री.गाढे गंगाधर सुखदेव
३) श्री.यादव अशोक सायन्ना
४) श्री.अजितकुमार शेळके
५) श्री.मोरश्वर दिनानाथ सावे
६) श्री.मोतीराम नारायणराव घडामोड
७) श्री.कचरू चंद्रभान नवपुते
८) श्री.स.अहमद एकबालुद्यीन स.मो.कुतुबोद्यीन
९) श्री.स.हुसेन स.अहेमद

समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते श्री.एस.एम.जोशी यांचे दुखद निधनानिमित्त सभागृहातर्फे ००.०२ मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र.१०५८ :**

दिनांक ३०.३.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत कायम करणे.

**संवाद :**

सुराणा कॉम्प्लेक्सचे कामाबाबत कार्यालयीन कार्यवाही केली याचा खुलासा होण्याची मागणी स.सभासद श्री.मोरेश्वर सावे, श्री.अशोक सायन्ना, श्री.गंगाधर गाढे यांनी केली असता सदर प्रकरची अभिलेख विभागाकडून या कामाची संचिका सहाय्यक संचालक, नगररचना या विभागाकडे आली नसल्याचा खुलासा मिळाला आहे. याशिवाय सुराणा कॉम्प्लेक्सचे मालक यांना आठ दिवसाचे आत आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करणे विषयीची नोटीस देण्यात आलेची माहिति सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी केली.

दिनांक ३०-३-८९ च्या चर्चेनुसार उप अभियंता, यांत्रिकी यांनी कार्यालयीन वाहनाचा इंधन खर्च इ.बाबतचा सविस्तर अहवाल सभागृहात दाखल केला असता महानगरपालिकेची वाहने विशेषत: शहरातच व वापरली जात असल्यामुळे शहरात रिमोल्डींगची व्यवस्था उपलब्ध असल्याने वाहनांचे टायर रिमोल्ड करून घेतल्यास अल्प खर्चात काम भागू शकते अशा प्रकारचे रिमोल्डिंग (पुर्नबांधणी) तीन वेळपर्यंत सुकर असते तेव्हा या बाबीचा पुढील काळाकरिता विचार करण्यात यावा. मागील ४ वर्षात किती टायर खरेदी करण्यात आले व किती जुन्या टायरचे रिमोल्ड करून घेतले या विषयीची माहिती देण्यात यावी अशी मागणी स.सभासद श्री.मोरश्वर सावे व श्री.गंगाधर गाढे, श्री. यादव अशोक सायन्ना यांनी केली.

मा.उप आयुक्त व शहर अभियता यांनी यांत्रिकी विभागाचे कामकाजाकडे विशेष लक्ष द्यावे म्हणजे या विभागाचे कामावर नियंत्रण राहील असे मा. सभापती यांनी सुचविले.

बारूदगरनाला येथील सिंधी दुकान व ज्योती लॉजचे कामासाठी परवानगी देण्यात आली आहे काय ? त्याची मुदत किती कोठ पर्यंत आहे तसेच बॉम्बे मर्कन्टाईल बँक व

सुराणा कॉम्प्लेक्स या ठिकाणी नाल्याचे पाणी जाण्यास रस्ता राहीला नाही याबाबत खुलासा व्हावा अशी मागणी स. सभासद, श्री.स.अ.एकबालोद्दीन यांनी केला असता कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनिस्सारण) यांना शहरातील नाल्याचे पाणी योग्य प्रकारे वाहून जाईल अशी व्यवस्था करण्याची सूचना मा. सभापती यांनी दिली.

कार्तिकी हॉटेलजवळ मुख्य रस्त्यावर चालू असलेल्या बांधकामास परवानगी आहे काय? अशी विचारणा स.सभासद श्री.मोरश्वर सावे यांनी केली असता या बांधकामाची परवानगी रद्द केली पण संबंधित मालकाने त्यावर न्यायालयाकडून मनाई हुकूम मिळविला आहे. कॅन्टेट दाखल करण्याची कार्यवाही या विभागाकडून होत नाही असा खुलासा सहाय्यक संचालक नगररचना यांनी केला.

क्रांतीचौक पोलिस स्टेशन ते टिळक रोड, भाजी मंडी ते जुनाबाजार आणि क्रांतीचौक ते पैठणगेट, गुलमंडी या रस्त्यावर ठिकठिकाणी खडड्े, बांधकाम साहित्य पडलेले असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या बाबत संबंधित विभागाने लक्ष द्यावे अशी सूचना स.सभासद, श्री.मोरश्वर सावे, श्री.स.अ.इकबालोद्दीन व श्री.अलफखॉ हुसेन खॉ यांनी केली.

**ठराव :**

वरील चर्चेअंती दिनांक ३०.३.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०५९ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३६ मधील जसवंतपूरा येथे मंजुर रेखांकन स.नं.३६/ पी मधील सिटीएस नं.१२०४० येथे ३" व्यासाची व ४" व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी ठराव क्र.१० दिनांक १४.९.८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा /पापु/५३८/८८ दिनांक ५.११.८८ अन्वये जाहिररित्या निविदा मागविल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. यानंतर मनपा/पापु/७०३/८९दिनांक ४.३.८९ अन्वये लघू निविदाद्वारे दरपत्रके मागविली असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली असून तो ठेकेदार श्री.के.बी.काल्डा यांची असून अंदाजपत्रकीय दराची आहे. करिता ठेकेदार श्री.के.बी.काल्डा यांची निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३६ मधील जसवंतपूरा येथे मंजुर रेखांकन स.न.३६ पी येथील सी.टी.एस. नं.१२०४० येथे ३" व ४" व्यासाची जलवाहिनी टाकणेबाबत लघु निविदा द्वारे प्राप्त झालेल्या ठेकेदार, श्री.के.बी.काल्डा यांचे अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६० :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३५ मधील कटकट दरवाजा जवळ सिटीएस क्र.११२५३ मधील मंजुर लेआऊट मध्ये ८० मी.मी. व १०० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणेचे कामास ठराव क्र.२५२/ दिनांक १७.८.८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा/ पापु/७००/८८ दिनांक २३-८-८८ अन्वये जाहिररित्या निविदा मागविलया असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली होती व सजनानी कॉन्ट्रक्टर यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% जास्त दराची आहे. मनपा/पापु/५३४/८८ दिनांक

५.११.८८ अन्वये फेर निविदा मागविल्या असता एकही निविदा विक्री झाली नाही. यानंतर मनपा/पापु/७०३/८९/ दिनांक ४-३-८९ अन्वये लघु निविदा द्वारे दरपत्रके मागविली असता खालीलप्रमाणे दोन निविदा पत्रके प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) | फारूकी अे.एम. | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | के.बी.काल्डा | ३.९९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी दराची निविदा फारूकी अे.एम. यांची असून अंदाजपत्रकीय दराची आहे. करिता विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ मधील कटकट दरवाजाजवळ सिटी.एस.नं. ११२५३ मधील मंजुर लेआऊट मध्ये ८० मी.मी. व १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री. फारूकी अे.एम. यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६१:**

जलगृह अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.२४ मधील नागेश्वरवाडी येथे प्लॉट नं.५६ समोरील गल्लीत तसेच उदय कॉलनी येथे ज्ञानदिप बालक मंदिरासमोर ८० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणेच्या कामाचे रक्कम रू.२८,०१०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२४८ दिनांक १७-८-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा/पापु/जा.क्र.८८/दिनांक २३-८-८८ अन्वये जाहिररित्या निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा विक्री झाली नाही.

मनपा/पापु/७०३/८९ दिनांक ४.३.८९ अन्वये लघु निविदाद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालया.

| | | |
|---|---|---|
| १) | सबनानी कन्सट्रक्शन | ०.१५% कमी दराने |
| २) | रविंद्रसिंग | ५% जास्त दराने |
| ३) | अर्शन नोमी | ४% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा सजनानी कन्स्ट्रक्शन यांची असून ती ०.१५% कमी दराची आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२४ नागेश्वरवाडी येथे प्लॉट क्र.५६ समोरील गल्लीत तसेच उदय कॉलनी येथे ज्ञानदिप बालक मंदिरासमोर ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत लघु निविदाद्वारे प्राप्त झालेल्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे म्हणजे ०.१५% कमी दराचे श्री. सजनानी कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६२ :**

जलगृह अभियता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.३६ मधील मो.किराडपूरा रोशन मस्जीदची गल्ली येथील ४" व ३ " व्यासाच्या जलवाहिन्या बदलून ६" व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रू.२२,१४०/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२०७ दिनांक ११.८.८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा/पापु/७००/८८ दिनांक २३.८.८८ रोजी जाहिररित्या निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही.

मनपा / पापु/७०३/८९/ दिनांक ४.३.८९ अन्वये (लघु निविदा द्वारे) निविदा मागविल्या असता खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १ | फारूकी अे.एम. | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | एस.के.मिसाळ | ५% जास्त दाराने |
| ३ | अर्शद नोमी | १०% जास्त दाराने |

तुलनात्मकदृष्टया फारूकी ए.एम. यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजे अंदाजपत्रकीय दराची आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.३६ मधील मो.किराडपूरा रोशन मस्जीदची गल्ली येथील ४" व ३ " व्यासाच्या जलवाहिनी बदलून ६" व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्रअे.एम.फारूकी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६३ :**

जलगृह अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र. ४२ मधील खोकडपूरा येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रू.२०,५४५\- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२४९/ दिनांक १७-८-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे. मनपा/पापु/७००/८८ दिनाकं २३-८-८८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही. मनपा/पापु/५३४/८८/ दिनांक ५-११-८८ अन्वये फेर निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा मागविण्यात आल्या असता एक ही निविदा विक्री झाली नाही. यानंतर रजिष्टर्ड कंत्राटदाराकडून दरपत्रके मागविली असता खालील प्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | अर्शद नोमी | अंदाजपत्रकीय दराने |
| २) | अबेदी | १% जास्त दराने |
| ३) | संजीव खर्डीकर | २% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक श्री. अर्शद नोमी यांचे असून विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ मधील खोकडपूरा येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे गुत्तेदार श्री.अर्शद नोमी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६४:**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४६ मधील मो. पैठणगेट रोड येथे १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे रक्कम रू.४०,२४८/- चे अंदाजपत्रकास ठराव क्र.२४७ दिनांक १७-८-८८ अन्वये मान्यता मिळाली आहे.

मनपा /पापु/७००/८८ दिनांक २३-८-८८ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा प्राप्त झाली नाही, यानंतर मनपा/पापु/५३४/८८ दिनांक १५-११-८८ अन्वये फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकही निविदा विकली गेली नाही. यानंतर मनपा/ पापु/ ७०३/८९ दि. ४-३-८९ अन्वये लघुनिविदे द्वारे सदरील कामासाठी निविदा मागविण्यात

आल्या असता फक्त एकच निविदा प्राप्त झाली असून ती सजनानी कन्स्ट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१३% कमी दराची आहे.

करीता सजनानी कन्स्ट्रक्शन्स यांची ३.१३% कमी दराची निविदा स्विकारणेच्या विचारार्थ सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४६ मधील मो. पैठणगेट रोड येथे १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत लघु निविदा द्वारे प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.१३% कमी दराचे गुत्तेदार श्री.सजनानी कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६५ :**

बेगमपूरा येथे २० मी.मी. जाडीचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६५६/५/ दिनांक १४-१२-८८ अन्वये मे.रे कन्स्ट्रक्शन याचें अंदाजपत्रकापेक्षा १३.२३% कमी दराच्या दरपत्रकास नजरचुकीने मंजुरी घेण्यात आली आहे. वस्तुत: मे.रे.कन्स्ट्रक्शन यांनी या कामासाठी दरपत्रकामध्ये १२.२३% कमी दराचे दर भरलेले आहे. सबब दिनांक १४-१२-८८ च्या स्थायी समिती मध्ये या कामासाठी मे.रे.कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२३% मिळालेली मंजुरी रद्य करून त्याऐवजी या कामासाठी दरपत्रकात नमुद केलेल्या दराप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.२३% कमी दराने मंजुरी घेण्याच्या दुरूस्त ठरावास मंजुरी घेणे आवश्कय आहे.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपूरा येथे २० मी.मी. जाडीचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र.६५६/५/दिनांक १४.१२.८८ अन्वये मे.रे. कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकापेक्षा १३.२३% कमी दराच्या दरपत्रकास नजरमुकीने मिळालेल्या मंजुरी रद्य करून त्या ऐवजी मे.रे.कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.२३% कमी दराने दुरूस्त ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.१०६६ :**

वार्ड क्र.४९ मो.नाथनगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रू.४८,०००/- चे तयार करण्यात आले असून सदर काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने अे-१ निविदेत उपलब्ध गुत्तेदार, श्री.शेख रफीक यांच्या कडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४९ मो.नाथनगर येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये ४८,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्यामुळे अे-१ निविदेतहत उपलब्ध

गुत्तेदार , श्री.शेख रफिक यांचेकडून अदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६७ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, कंपनीकडून सि.आय.डी.जॉईंटसचा पुरवठा वेळेवर होवू शकला नसल्यामुळे कार्यालयाची कामे खोळंबून पडलेली आहेत. त्यामुळे रक्कम रू.६७,२७०/-चे सि.आय.डी.जॉईन्टसचे खरेदीचे अंदाजपत्रक मंजुरी मिळणेस्तव सादर व सदरील जॉईन्टस मे.गोयल मेटल वर्क्स, जालना यांचेकडून एम.एस.आय.डी.सी. यांचे दराने खरेदी करण्याबाबतचा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कंपनीकडून सी.आय.डी.जाईटसचा पुरवठा वेळेवर न झाल्यामुळे व कार्यालयाची कामे खोळंबून पडलेली असल्यामुळे रक्कम रू.६७,२७०/- चे सी.आय.डी.जाईटंस खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास तसेच सदरील जाईन्टस मे गोयल मेटल वर्क्स, जालना यांचे कडून एम.एस.आय.डी.सी.यांचे दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६८:**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४ मधील घाटी झोपडपटट्‌ी (आसेफिया कॉलनी) येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१३,३५०/- चे असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर. सदरील कामात लेबर पेमेंट रू.३९७३/- इतके आहे. अत्यंत तातडीचे अशा स्वरूपाचे काम असल्याने सवदरील काम रजिष्टर्ड गुत्तेदाराकडून कोटेशन मागवून ज्याचे दरपत्रक कमी दराचे असतील अशा दरपत्रकास मान्यता मिळणेस्तव व काम करून घेणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४ मधील घाटी झोपडपटट्‌ी (आसेफिया कॉलनी) येथे ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यत आलेले रक्कम रू.१३,३५०/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील कामातील रक्कम रू.३९७३/- चे लेबर पेमेंटला व सदरील काम तातडीचे असल्याने रजिस्टर्ड गुत्तेदारामार्फत कोटेशन मागवून कमी दराचे दरपत्रधारकाकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०६९ :**

जलगृह अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.१७ मधील मोमीनपूरा व मंजुरपुरा भागात ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१३,१००/- चे तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

सदरील कामात लेबर पेमेंट ४६३५/- इतके आहे. तातडीचे स्वरूपाचे काम असल्याने स्थानिक रजिस्टर्ड कॉन्ट्रक्टरर्स कडून दरपत्रक मागवून ज्याचे दरपत्रक कमी दराचे असतील अशा गुत्तेदाराकडून काम करून घेण्याची मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १७ मधील मोमीनपूरा व मंजुरपुरा भागात ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३,१००/-चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीचे असल्यामुळे स्थानिक रजिस्टर्ड गुत्तेदाराकडून करून घेंण्यास तसेच सदरील कामात लेबर पेमेंट रू.४६३५/ञ- च्या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यत येते.

**विषय क्र १०७०:**

शहर अभियता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, गुलशन महल ते सिडको पर्यंत ८०" रूंद विकास योजना अंतर्गतरस्त्याचे रूंदीकरणा मध्ये पंचायत समिती निवास स्थानाची भिंत बाधित होत आहे, ती तोडून नियोजित रस्त्याचे हद्दीवर पुन्हा जागेचा मोबदला जिल्हा परिषदेला न देता त्या बदल्यामध्ये भिंत बाधित होत आहे. ती तोडून नियोजित रत्याचे हद्दीवर पुन्हा जागेचा मोबदला भिंत बांधून द्यावयाची आहे. मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार भिंत तोडण्याचे काम हाती घेतले आहे. परंतु निवासस्थानाची संरक्षिंत अबाधित राहावी म्हणून भिंत बांधण्याचे काम श्री.एस.ए.नवाब यांचेकडून स्थायी समितीची मंजुरी अपेक्षित धरून अंदाजपत्रकाचे दराने कोटेशन मागवून हाती घेण्यात आले आहे. अंदाजपत्रक रक्कम रूपये ८५,३००/- व वरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर (तरतुद विकास योजना अंतर्गत खडी रस्ते)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुलशन महल ते सिडको पर्यंत ८० " रूंद विकास योजना अंतर्गतरस्त्याचे रूंदीकरणा मध्ये पंचायत समिती निवास स्थानाचे भिंतीचा मोबदला जिल्हा परिषदेला न देता त्या मोबदल्यात भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.८५,३००/- चे अंदाजपत्रकास तसेच निवासस्थानाची संरक्षितता अबाधित राहावी म्हणजून अंदाजपत्रकाचे दराने प्राप्त झालेले गुत्तेदार श्री.एस.ए.नवाब यांचे दरपत्रकास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०७१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, वार्ड क्र.४१ पैठणगेट ते गुलमंडी तसेच दलालवाडी खोकडपूरा जोड रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.४,००,०००/- सन १९८८-८९ च्या सा.बां. खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४१ पैठणगेट ते गुलमंडी तसेच दलालवाडी खोकडपूरा जोडरस्त्याचे डांबरीकरण करणे बाबतच्या कामासाठी तयार करण्यात आलेले रक्कम रू.४,००,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका औरंगाबाद | स्थायी समिती |
| | महानगरपालिका औरंगाबाद |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १२.४.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

**दिनांक १२ एप्रिल १९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस समिती सभागृहात मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरूवात झाली. या सभेमध्ये कार्यालयीन अधिकारी व खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.इकबालिंग प्रितमसिंग गील
२) श्री.गाढे गंगाधर सुखदेव
३) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
४) श्री.यादव अशोक सायन्ना
५) श्री.अजितकुमार शेळके
६) श्री.मोरश्वर दिनानाथ सावे
७) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
८) श्री.कचरू चंद्रभान नवपुते
९) श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१०) श्री.स.हुसेन स. अहमद

दिनांक ५.४.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

दिनांक ५.४.८९ च्या सभेतील चर्चे नुसार बारूदगरनाला येथील सिंधी दुकान ,ज्योती लॉज लगतची जमीन सपाट केल्यामुळे नाल्यात पडलेली माती,बाम्बे मर्कन्टाईल बँक , सुराणा कॉम्प्लेक्स या ठिकाणच्या नाल्याचे सांडपाण्याची व्यवस्था, तसेच भाजी मार्केट येथील पुल मनपाने ताब्यात घेवूनही त्या ठिकाणी काही झोपडया उभ्या आहेत. आदी प्रकरणात कार्यालयाने काय कार्यवाही केली आहे याचा खुलासा करण्याची मागणी स.सभासद श्री.स.अ.एकबालोद्दीन व श्री. मिर्झा अन्वर बेग यांनी केली असता कार्यकारी अभियता म्हणाले कि, नाल्याचे सांडपाणी व्यवस्थीतरित्या वाहून जाण्याची व्यवस्था करण्याबाबत संबंधीत तीनही मालकांना नोटीस देण्यात येत आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेल्या झोपडया काढून टाकण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी अशी सूचना स.सभापती यांनी केली.

कार्तिकी लॉजजवळील मुख्य रस्त्यावर आजही बांधकाम चालू आहे. मागील सभेत रद्य केलेल्या परवानगी विरूध्द संबंधिताने मनाई हुकूम मिळवण्याचा खुलासा करण्यात आला होता.तेव्हा ती मनाई काय आहे व त्यावर कार्यालयाचे विधी विभागाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा अशी स.सभासद श्री.मोरश्वर सावे यांनी मागणी केली असता संबंधित मालकास नोटीस देण्यात आल्याचा तसेच सदर प्रकरणी न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आल्याचा खुलासा सहाय्यक संचालक नगर रचना यांनी केली.

अग्निशामक विभागाने वाहन क्र.एमएचबी/३८०३ गेल्या ६/७ महिन्यापासून बंद असले तरी या वाहनाचे दुरूस्तीसाठी बिल क्र.२८४२ दिनांक २४.२.८९ रक्कम रू.४९३६/- बिल क्र.२८४२ दिनांक २.३.८९ रक्कम रू.११०८/- आणि बिल क्र. ४११६ दिनांक २.३.८९ रक्कम रूपये ११५८/- प्रमाणे देयके मंजुर करण्यात आले आहेत. जर वरील वाहन ६/७ महिन्यापासून बंद आहे तर ही देयके कशी ? याबाबत चौकशी व्हावी आणि तोपर्यंत ही

देयके प्रलंबीत ठेवण्यात यावीत व हे वाहन चालू आहे काय ? याचा खुलासा व्हावा अशी मागणी स.सभासद श्री. स.अ.एकबालोद्दीन व मिर्झा अन्वर बेग यांनी केली. यावर खुलासा करताना उपअभियंता यांत्रिकी म्हणाले कि, अग्नीशामन विभागाचे वाहन क्रमांकावरून कोणते वाहन बंद आणि कोणत वाहन चालू आहे हे निश्चित सांगता येणार नाही. या प्रकरणी अधिकारी सभागृहाची दिशाभुल करत असून चुकीची माहिती देत आहेत. तेव्हा सभागृहाने या वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करावी. यांत्रिकी विभागाचे कारभारात बराच गोंधळ आहे. परवाच सुराणा इलेक्ट्रीकल्स या दुकानास लागलेल्या आगीच्या वेळी अग्निशामन विभागाचे टँकर वेळेवर न पोहोचल्यामुळे दुकान मालकाचे बरेच नुकसान झाले आहे. या शिवाय ही आग विझवतांना जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना औषधोपचार करण्यासाठी आवश्यक प्रथमोपचार बॉक्स गाडीत नव्हता. असा आरोप स.सभासद श्री.यादव अशोन सायन्ना, श्री.गंगाधर गाढे यांनी केला. आणि मागील सभेत विरोधी पक्ष नेता याचेंसाठी खरेदी करण्यात आलेली कार कोणत्या मेकची आहे. याचा खुलासा करण्याची मागणी केली विरोधी पक्षनेता यांचेसाठी खरेदी केलेल्या कारचे संदर्भाने अधिकृत विक्रेता यांना पत्र देवून खुलासा मागविला असता कंपनीने दोन प्रकारच्या गाडया तयार केल्या आहेत. त्यापैकी एक डिलक्स गाडी देण्यात आली आहे. असा खुलासा शहर अभिंयता यांनी केला.

अग्निशामक विभागाचे वाहन क्रमांक ३८०३ आणि विरोधी पक्ष नेता यांचेसाठी खरेदी केलेली कार याबाबत उद्भवलेल्या चर्चेनुसार सदर प्रकरणी मा. आयुक्त यांनी चौकशी करावी. त्यानंतर यावर विचार करण्यात येईल असे मा. सभापती यांनी सुचविले.

**ठराव :**

दिनांक ५.४.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०७३ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मोहल्ला फुलेनगर वार्ड क्र.५७ येथील ३५० मी.मी. व्यासाची पूर्व रचित अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाबाबतच्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.७११/३० दिनांक २८.१२.८८ अन्वये मंजुरी मिळाल्यान्नतर कार्यलयातर्फे लघु निविदा मागविल्या असता एकूण दाने निविदा दाखल दिनांकास दर भरलेल्या प्राप्त झाल्या.

१) श्री. आर.एम.मैत्री ०.०५% कमी

२) श्री.सैय्यद रफीकोद्दीन ६.०२% जास्त

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकापेक्षा ०.५% कमी दराची निविदा श्री.आर.एम.मैत्री यांची असून ती मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.फुलेनगर वार्ड क्र.५७ येथील ३५० मी.मी.व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री.आर. एम.मैत्री यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०७४ :**

उप अभिंयता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मोहल्ला गांधीनगर वार्ड क्र.४० येथील १५० मी.मी. व्यासाची भूमिगत जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाबाबतच्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.२६ दिनांक ५-१०-८८ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर कार्यालयातर्फे लघु निविदा मागविल्या असता एकूण दोन निविदा दाखल दिनांकास दर भरलेल्या प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सैय्यद रफीकोद्दीन | ४.९% जास्त |
| २) | श्री.रविंद्रसिंग नरींदरसिंग गुरूदत्ते | ५.० % जास्त |

सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकापेक्षा ४.९% जास्त दराची निविदा श्री.सैय्यद रफीकोद्दीन यांची असून ती मान्य करणे बाबतच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. गांधीनगर वार्ड क्र.४० येथील १५० मी.मी. व्यासाची भूमिगत जलनिस्सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९% जास्त दराचे श्री.सैय्यद रफीकोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १०७५ :**

वार्ड क्र.      किराडपूरा रोषनगेट येथे श्री.पठाण यांच्या घराजवळ ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे रक्कम रू.६६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून व सदर काम तातडीने करावयाचे असल्याने सदर काम श्री.शंकर भैरव गुत्तेदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येईल. करिता अंदाजपत्रकीय मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपूरा रोषनगेट येथे श्री.पठाण यांच्या घराजवळ ३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी.ड्रनेज लाईन टाकणेच्या कामासाठी र.रू.६६,०००/- च्या अयंदाजपत्रकास तसेच सदर कामाची तातडी लक्षात घेवून गुत्तेदार श्री. शंकर भैरव यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०७६:**

वार्ड क्र.५८ मो. न्यु.उस्मानपूरा येथील रविंद्रनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मंजुरा रेखांकनामध्ये प्लॉट नं.५८ ते ६३ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेबाबतचे अदांजपत्रक र.रू.३३,४८०/- ला स्थायी समिती ठराव क्र.२७१ दिनांक १७.८.८८ द्वारे मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.५/८३०७/८८ दिनांक २२-११-८८ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण बारा निविदा विकण्यात आल्या असून केवळ नऊ निविदा वसूल झाल्या आहेत व त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एन.जी गणवाणी | ९.९०% कमी |
| २) | श्री.आर.बी चव्हाण | २५% कमी |
| ३) | श्री.एच.डी.कटारिया | ११.१७% कमी |
| ४) | श्री.एस.के.रफिक | २१.९०% कमी |

५) श्री.बी.एम.काथार १७% कमी
६) श्री.के.बी.काल्डा १५.९% कमी
७) श्री.जावेद खान १८.१८% कमी
८) श्री.आर.एस.अडणे १३.३३% कमी
९) श्री.शंकर भैरव २७.७०% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २७.७०% कमी दराचे श्री.शंकर भैरव यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५८ मो.न्यु.उस्मानपूरा येथील रविंद्रनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मंजुरा रेखांकनामध्ये प्लॉट नं.५८ ते ६३ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.७०% कमी दराचे श्री.शंकर भैरव यांचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०७७ :**

वार्ड क्र.४९ मो.रमानगर येथील १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अदांजपत्रक र.रू.९,४३९/- ला स्थायी समिती ठराव क्र.७३० दिनांक २८-१२-८८ नुसार मान्यता मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.६/७६५/८८ दिनांक ४.२.८९ द्वारे बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता केवळ एकच निविदा विकण्यात आली असून सदर निविदा श्री. मो.मुस्ताक अहमद यांची असून दर अंदाजपत्रकीय दराप्रमाणे आहे.

१) श्री.मो. मुस्ताक अंदाजपत्रकीय दराने.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४९ मो.रमानगर येथील १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेली श्री.मो.मुश्ताक अहेमद यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## *एनवेळचे विषय*

**विषय क्र.१०७८ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, ठराव क्र.९२९ अन्वये उपलब्ध ठेकेदाराकडून काम करवून घेणेस मंजुरी मिळाल्यानंतर भावसिंगपूरा वार्ड क्र.१ स्लम भागात हयुम पाईप कल्व्हर्टचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.नरेंद्र रंगास्वामी नायडू यांचेकडून अंदाजपत्रकाच्या दरात करून घेण्यास प्रस्तावित केले आहे.

तरी उपलब्ध ठेकेदार श्री. नरेंद्र रंगास्वामी नायडू यांस मान्यता मिळणेस्तव व विचारार्थ सादर. खर्च रक्कम रू.८५,०००/-

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१ भावसिंगपूरा स्लम भागात हयुम पाईप कल्व्हर्टचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.नरेंद्र रंगास्वामी नायडू यांचेक्डून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०७९ :**

उप अभिंयता, गलिच्छ वस्ती सुधारणा यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४४ मोहल्ला संसारनगर विभागात दगडी गटार बांधणे बाबतच्या कामासाठी र.रू.६६,७४२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरचे काम अ-१ नमुन्यावर उपलब्ध ठेकेदार श्री. मुरलीधर नेमाजी डोळस यांचेकडून करवून घेणेबाबत व अंदाजपत्रकीय दरात करवून घेणेबाबत प्रस्तावित केले आहे.

मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४४ मो.संसारनगर विभागात दगडी गटार बांधणेच्या कामासाठी उप अभियंता (ग व सु) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे र.रू.६६,७४२/- च्या अयंदाजपत्रकास तसेच सदरचे काम उपलब्ध ठेकेदार श्री.मुरलीधर नेमाजी डोळस यांचेकडून "अ-१" नमुन्यावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०८० :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, मोहल्ला संसारनगर वार्ड क्र.४४ येथे भुमिगत गटार बांधणेकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२८,२७८/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम "अ-१" निविदेवर उपलब्ध गुत्तेदार श्री.मुरलीधर नेमाजी डोळस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरात करवून घेणेस प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.संसारनगर वार्ड क्र.४४ येथे भुमिगत गटार बांधणेकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२८,२७८/- चे तयार करण्यत आले आहे. सदरील काम "अ-१" निविदेवर उपलब्ध गुत्तेदार श्री.मुरलीधर नेमाजी डोळस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरात करवून घेणेस प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र.१०८१ :**

उप अभियंता (ग.व सु.) यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४४ मोहल्ला संसारनगर येथील विभागात दगडी खांडकी बसविणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.५६,१६३/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम अ-१ नमुन्यावर उपलब्ध ठेकेदार श्री.मुरलीधर नेमाजी डोळस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरात करवून घेणेबाबत प्रस्तावित केले आहे.

विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४४ मोहल्ला संसारनगर येथील विभागात दगडी खांडकी बसविणेच्या कामासाठी रू.रू.५६,१६३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम अ-१ नमुन्यावर उपलब्ध ठेकेदार श्री.मुरलीधर नेमाजी डोळस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरात करवून घेण्यास उपअभिंयता (ग व सु.) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०८२ :**

उस्मापपुरा येथील बचतभवन येथे १६० के.व्ही.ट्रान्सफार्मर डी.पी.स्ट्रक्चर उभरणेचे कामासाठी स्थायी समिती बैठक ६-८-८८ ठराव क्र.१३८ अन्वये रक्कम रू.२५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदराचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.६५५४/८८ दिनांक ३०-८-८८ नुसार निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रयमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.एस.ए.ट्रेडर्स | १०.१२ % कमी दराने |
| २) | मे. ओम शांती इलेक्ट्रीकल्स | दर भरलेले नाहीत |
| ३) | मे.युनिव्हर्सल इलेक्ट्रीकल्स | ५०.५ % जास्त दराने |
| ४) | मे.मुजाहेद इलेक्ट्रीकल्स | १.५% कमी दराने |
| ५) | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रक दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १०.१२% कमी दराची मे.एस.ए.ट्रेडर्स यांची निविदा आहे. सदर गुत्तेदारास काम करण्यासाठी दिनांक १५.१२.८८ अन्वये काम करणेचा आदेश देण्यांत आला होता. परंतु सदर कामाचे नकाशे तपासणी करीता विद्युत निरिक्षक यांचेकडे पाठविले असता त्यामध्ये मंजुर नकाशानुसार कामाची वाढ झालेली आहे. आणि सदर कार्यवाहीस कामाचा आदेश मिळालेपासून जवळ जवळ तीन महिन्याचा कालावधी लागला आहे. त्यामुळे दिनांक ९-२-८९ अन्वये सदर एजन्सी मे.एस.ए.ट्रेडर्स यांनी लेखी कळविले कि, सदरचे काम हे कमी दराचे व तृतीय कमी दराचे गुत्तेदार १) मे.मुजाहेद इलेक्ट्रकल्स २) मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांना पत्र दिले असता मे. मुजाहिद इलेक्ट्रीकल्स यांनी अद्याप पावेतो वेळेचे आत उत्तर दिले नाही. तसेच मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांनी प्रथम कमी दराचे गुत्तेदार म्हणजेच १०.१२% कमी दराने काम करण्यास लेखी संमती दर्शविली आहे. सबब १) वाढीव अंदाजपत्रक विद्युत निरिक्षक यांचे तपासणीनुसार रक्कम रू.५७,२८०/- (सन १९८८.८९ चे डी.एस.आर.दराने) आणि २) सदर काम करून घेण्याची एजन्सी मे. लूना इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १०.१२% कमी दराने काम करणेच्या प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर व सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकाखालील करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उस्मानपुरा येथील बचतभवन येथे १६० के.व्ही.ट्रान्सफार्मर डी.पी.स्ट्रक्चर उभरणेचे कामासाठी वाढील अंदाजपत्रक रक्कम रू.५७,२८०/- च्या रक्कमेस तसेच सदर काम मे.लुना इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.१२% कमी दराने करून घेण्यास उप अभियंता (बांधकाम-२) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०८३ :**

सहाय्यक आयुक्त-२, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला कि, महानगरपालकेतील गणवेशधारी कर्मचाऱ्यांना सन १९८८-८९ सालचा गणवेश वाटप करावयाचा आहे. गणवेशाची शिलाई करून घेण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पंधरा निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आला असता त्यामध्ये मे.रेणूका टेलर्स, औरंगाबाद यांनी रक्कम रू.१९-८० प्रति ड्रेस असा कमी दर दिलेला आहे. मा. आयुक्त यांनी असा अभिप्राय दिला कि, गणवेश शिलाईचे काम मध्यवर्ती करागृह औरंगाबाद यांचेतर्फे करून घ्यावे. त्यांनी देखील शिलाईसाठी निविदा

भरलेली आहे. त्यांनी ड्रेस शिलाईचा दर हा टेरीकॉट पॅन्ट रू.२४.०० प्रती नग व टेरीकॉट फुल शर्ट रू.१४.०० प्रतिनग या प्रमाणे र.रू.३८/- प्रति ड्रेस असा दर दिलेला आहे. एकूण २४६० नग ड्रेस शिलाई करून घ्यावयाचे आहेत. त्यासाठी रक्कम रू.३८/- या दराने रक्कम रू.९३,४८०/- एवढा खर्च येईल. त्यांनी त्याचे निविदामध्ये अशी अट टाकलेली आहे कि, आदेशाप्रमाणे होणारी रक्कम ही आदेशाबरोबर त्यांच्या कार्यालयात जमा करावी लागेल. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**चर्चा** :

या विषयांवर स्थायी समितीत चर्चा होत असतांना मे.रेणूका टेलर्स यांचे सर्वात कमी दराचे शिलाई दर १९.८० आहेत. परंतू सदरील टेलर्स बाबत श्री.एकबालसिंग गिल ,मिर्झा अन्वर बेग, स.अ.एकबालोद्यीन गणवेश कापड उपहाराबाबत आरोप ठेवला. आरोप कागदोपत्री कार्यालयात लिखीत नसलयामुळे आरोप सिध्द होवू शकत नाही तरी सुध्दा कमी दराचे निविदा प्रमाणे मे.रेणूका टेलर्स, मे.आर.एस.जैस्वाल व मे.सुरेश टेलर यांना समप्रमाणात काम देवून त्यांनी मनपा कार्यालयातून परिसराच्या आंत बसून शिलाईचे काम करावे असे स. सभासद श्री.मोरश्वर सावे यांनी सूचित केले व त्यास स्थायी समिती सभागृहाने मान्यता दिली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा कर्मचाऱ्यांना वाटप करावयाचे गणवेशासाठी प्रति ड्रेस र.रू.१९.८० या दराने सन १९८८-८९ या वर्षाकरीता २४६० ड्रेस मे.रेणूका टेलर्स, मे.आर.एस.जैस्वाल आणि मे.सुरेश टेलर्स यांचे मार्फत समप्रमाणात शिलाई करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०८४ :**

उद्यान अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला कि, उद्यान विभागातील बैलांना खाण्याकरीता शाळू ज्वारी कडबा खरेदी करण्यास्तव दरपत्रक मागविण्यात आली. एकूण ५ यदरपत्रके प्राप्त झाली. त्याचा तपशिलवार तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | प्रति टन दर (शाळू) ज्वार कडबा (रक्कम) |
|---|---|---|
| १ | श्री.मोहमद युसूफ दादामिया सब्जीमंडी | २,४२५/- |
| २ | श्री.शेख ईसाक शेख जैनोद्दीन | २,५००/- |
| ३ | श्री.अ.मतीन सिध्दीकी | २,५१०/- |
| ४ | श्री.मोतीलाल भुरिवाले | २,६५०/- |
| ५ | शेख इसाक शेख फकिर मोहमद | २,७००/- |

वरील दर्शविलेल्या दरपत्रकात सर्वात कमी दराचे (तुलनात्मकदृष्टया) दरपत्रक प्रतिटन रक्कम रू.२४२५/- श्री.मोहमंद युसूफ दादामिया यांचे आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उद्यान विभागातील बैलाना खाण्याकरीता शाळू ज्वार कडबा खरेदी करण्यासाठी तुलनात्मकदृष्या सर्वात कमी दराचे म्हणजेच प्रतिटन रक्कम रू.२४२५/- चे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

प्रतिटन र.रू.२४२५/- या दराने १० टन शाळू ज्वार कडबा खरेदी करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०.४.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त दिनांक २०.४.८९ रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभेस नगरभुवन (टाऊन हॉल) येथे सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखालील सुरूवात झाली. या सभेमध्ये सन्माननीय सभासद आणि कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री.अलफ खान हुसेन खान
२) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
३) श्री.यादव अशोक सायन्ना
४) श्री.अजितकुमार शेळके
५) श्री.मोरेश्वर दिनानाथ सावे
६) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
७) श्री.कचरू चंद्रभान नवपुते
८) श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबोद्दीन
९) श्री.स.हुसेन स. अहमद

दिनांक १२-४-८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा.श्री.यादव अशोक सायन्ना,मा.श्री.मिर्झा अन्वर बेग :** सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे सभागृहातील सोफयांवर कापडाचे कव्हर बसविण्यात यावे.

**मा.श्री.स.अ.एकबालोद्दीन :**बारूदगर नाला येथील सिंधी दुकानामुळे आजुबाजूच्या नागरिकांना त्रास होत आहे ही बाब लक्षात घेवून सदर दुकानांची परवानगी रद्द करावी. अशी मागणी मागिल दोन सभेत करण्यात आली. परंतू सदर दुकान अद्याप काढून टाकण्यात आले नाही. उलट या दुकानास विद्युत कनेक्शन साठी आवश्यक असलेली ना हरकत प्रमाणत्र देण्यात आले.

**मा.सभापती :** बारूदगर नाला येथे असलेली सिंधी दुकानाची परवानगी रद्द करून दुकान ताबडतोब काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**मा.श्री.स.अ.एकबालोद्दीन :** बॉम्बे मर्कन्टाईल बँक, सुराणा कॉम्प्लेक्स इ. ठिकाणी नाल्यावर बांधण्यात आलेल्या इमारतींमुळे नाल्याचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. याबाबत कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली होती. परंतू या प्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही. मागील सभेत संबंधितांना नोटीस देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. त्याबाबत खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियता :** सुराणा कॉम्प्लेक्स, बॉम्बे कर्मन्टाईल बँक आणि अशा प्रकारे नाल्यावर बांधण्यात आलेल्या इमारतीमुळे नाल्याचे पाणी वाहून जाण्यास योग्य

व्यवस्था करण्याबाबत संबंधितांना कार्यालयातर्फे नोटीसेस देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधितांनी वरील व्यवस्था न केल्यास कार्यालयातर्फे १५ दिवसाचे आत रितसर काम करून घेण्यात येईल व लेबर चार्ज संबंधितांकडून वसूल केला जाईल.

**मा.श्री.मिर्झा अन्वर बेग :** मनपा वाहन क्र. एम.एच.बी. ३८०३ च्या बिलाचे चौकशी बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.श्री.मोरश्वर सावे :** मागील सभेत कार्तिकी लॉज जवळील बांधकामा प्रकरणाची संचिका तपासली असता या प्रकरणाची न्यायालयाने "मनाई हुकूम" दिला नसून "जैसे थे" (स्टेटस्को) चा ओदश दिला असल्याचे निर्दशनास आले. त्यानुसार या प्रकरणी " न्यायालयीनल आदेशाचा अवमान (कन्टेमट ऑफ कोर्ट) याबाबत कार्यवाही करण्याचे सूचविण्यात आले. परंतू त्यावर काहीही कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. न्यायालयाने जैसे थे (स्टेअस्को) चा आदेश दिलेला असतांना मनाई हुकूम असल्याचे सांगण्यात येते. यावरून अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहे हे सिध्द होते. सभागृहातील स. सदस्यांचा संवाद पूर्ण टिपण करण्यासाठी ध्वनिमुद्रिका खरेदी करण्यात यावी.

दिनांक १२.४.८९ च्या ठराव क्र.१०७२ चे परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये "कार्तिकि लॉज जवळील मुख्य रस्त्यावर परवानगी

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २०.४.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त दिनांक २०.४.८९रोजी सकाळी ११.०० वाजता स्थायी समिती सभेस "नगरभूवन"टाऊन हॉल येथे मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखालील सुरूवात झाली. या सभेमध्ये सन्माननीय सभासद आणि कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री.अलफ खान हुसेनखान
२) श्री.मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
३) श्री.यादव अशोक सायन्ना
४) श्री.अजितकुमार शेळके
५) श्री.मोरश्वर सावे दिनानाथ
६) श्री.मोतीराम नारायणराव घडामोडे
७) श्री.कचरू चंद्रभान नवपुते
८) श्री.स.अ. एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
९) श्री.स.हुसेन स.अहमद

**विषय क्र. १०८५ :**

दिनांक १२-४-८९ रोजी सपंन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा.श्री.यादव अशोक सायन्ना, मा.श्री.मिर्झा अन्वर बेग :** सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे सभागृहातील सोफ्यावर कापडाचे कव्हर बसविण्यात यावे.

**मा.श्री.स.अ.एकबालोद्दीन :** बारूदगरनाला येथील सिंधी दुकानामुळे आजुबाजुच्या नागरीकांना त्रास होत आहे ही बाब लक्षात घेवून सदर दुकानांची परवानगी रद्य करावी. अशी मागणी मागील दोन सभेत करण्यात आली परंतू सदर दुकान अद्याप काढून टाकण्यात आले नाही. उलट या दुकानास विद्युत कनेक्शन साठी आवश्यक असलेली ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले.

**मा.सभापती :** बारूदगरनाला येथे असलेली सिंधी दुकानाची परवानगी रद्य करून ताबडतोब काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी. सहा महिन्याच्या तात्पुरत्या कालावधीसाठी ते दिले आहे तथापी मी त्यात लक्ष घालतो असा मा. आयुक्त यांनी खुलासा केला.

**मा.श्री.अ.अहमद एकबालोद्दीन :** बॉम्बे मर्कन्टाईल बँक, सुराणा कॉम्प्लेक्स इ. ठिकाणी नाल्यावर बांधण्यात आलेल्या इमारतीमुळे नाल्याचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होत आहे. याबाबत कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु या प्रकरणी कोणतीही कार्यवाही झाली नाही. मागील सभेत संबंधितांना नोटीस देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. त्याबाबत खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियता :** सुराणा कॉम्प्लेक्स, बॉम्बे मर्कन्टाईल बँक आणि अशा प्रकारे नाल्यावर बांधण्यात आलेल्या इमारतीमुळे नाल्याचे पाणी वाहून जाण्यास योग्य

व्यवस्था करण्याबाबत संबंधितांना कार्यालयातर्फे नोटीसेस देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधितांनी वरील व्यवस्था न केल्यास कार्यालयातर्फे १५ दिवसाचे आत रितसर काम करून घेण्यात येईल व लेबर चार्ज संबंधितांकडून वसूल केला जाईल.

**मा.श्री.मिर्झा अन्वर बेग :** मनपा वाहन क्र.एमएचबी ३८०३ च्या बिलाचे चौकशी बाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** मागील सभेत कार्तिकी लॉज जवळील बांधकामा प्रकरणाची संचिका तपासली असता या प्रकरणाची न्यायालयाने "मनाई हुकूम" दिला नसून "जैसे थे" (स्टेटस्को) चा आदेश दिला असल्याचे निर्दशनास आले. त्यानुसार या प्रकरणी "न्यायालयीन आदेशाचा अवमान (कन्टेमट ऑफ कोर्ट) याबाबत कार्यवाही करण्याचे सूचविण्यात आले, परंतू त्यावर काहीही कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. न्यायालयाने जैसे थे (स्टेटस्को) चा आदेश दिलेला असतांना मनाई हुकूम असल्याचे सांगण्यात येते. यावरून अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहे हे सिध्द होते. सभागृहातील स.सदस्यांचा संवाद पूर्ण टिपण करण्यासाठी टेपरेकॉर्ड खरेदी करण्यात यावी.

दिनांक १२-४-८९ च्या ठराव क्र.१०७२ चे परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये "कार्तिकी लॉज जवळील मुख्य रस्त्यांवर परवानगी रद्द केल्यानंतर देखील बांधकाम चालू असल्याचे स.सभासद श्री.मोरश्वर सावे यांनी निदर्शनास आणले. तसेच कोर्टाकडून स्टे ऑर्डर नसून (स्टेटस्को)ऑर्डर असल्याचे कार्यालयाच्या संचिकेवरून दाखवून दिले आणि कोर्टाकडून (स्टेटस्को) असतांना देखील काम चालू ठेवल्याबद्यल कन्टेन्प्टची कारवाई करण्याची विनंती केली आणि तशा प्रकारची संबंधित मालका विरूध्द कारवाई करण्याचे विधी विभागाने मान्य केले." तशी दुरूस्ती करण्यात यावी.

**उप आयुक्त :** मागील सभेत या प्रकरणी मनाई हुकुम नसून जैसे थे (स्टेटस्को) चा आदेश असल्याचे लक्षात आल्यावर या कामाचा पंचनामा केला आहे काय ? अशी विचारणा सहा. संचालक नगर रचना यांचेकडे केली असता संबंधित अध्किाऱ्यांनी (स्टेटस्को) मिळण्यापुर्वीच एक पंचनामा झाला असल्याचे खुलासा केला होता. त्यानुसार (स्टेटस्को) नंतरच्या कामाचा दुसरा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या गेल्या व उचित कार्यवाही करण्याचे आदेश संबंधितांना दिले होते, वकिलांना.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** न्यायालयाने स्टेटस्कोचा आदेश दिला असतांनाही संबंधित सुराणा कॉम्प्लेक्स मालकाने बांधकाम केले आहे ही बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली काय?

**उप आयुक्त :** न्यायालयाने दिलेल्या स्टेटस्को आदेशानंतर संबंधिताने बांधकाम चालू ठेवले आहे. ही बाब न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्यासाठी स्टेटस्को मिळण्यापूर्वीचा पंचनामा आणि स्टेटस्को मिळाल्यानंतरचा पंचनामा असे दोन पंचनामे असणे आवश्यक आहे. स्टेटस्को नंतरचा पंचनामा आला आहे. आणि या प्रकरणी कार्यवाही करण्याचे पत्र कार्यालयाचे विधीज्ञ यांना देण्यांत आले आहे.

**मा.मोरेश्वर सावे :** कार्यालयातर्फे या प्रकरणी कोणती कार्यवाही केली जाणार याचा खुलासा व्हावा. या प्रकरणाची संचिका सभागृहात मागविण्यात यावी. मागील सभेत

या प्रकरणी न्यायालयाचा स्टे नसून स्टेटस्कोचा आदेश आहे असे कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यावर आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही आणि आत पंचनामा आला आहे. असे सांगण्यात येते. हे योग्य नाही.

**मा.यादव अशोक सायन्ना :** विरोधी पक्ष नेता यांचेकरीता खरेदी करण्यात आलेली कार ही सूपर डिलक्स आहे काय ? याबाबत चर्चा झाली आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती :** विरोधी पक्ष नेता यांचेकरीता खरेदी करण्यात आलेल्या कार बाबत अधिकृत विक्रता यांच्याकडून खुलासा मिळाला आहे पण कंपनीकडून खुलासा प्राप्त झाला नाही.

**शहर अभियंता :** या प्रकरणी अधिकृत विक्रता यांचेकडून प्राप्त झालेला खुलासा सभागृहात वाचून दाखविला.

**मा.यादव अशोक सायन्ना :** विरोधी पक्ष नेता यांचेकरीता खरेदी करण्यात आलेली कार ही सूपर डिलक्स आहे काय ? याबाबत खुलासा करण्यात यावा. बाकी माहितीची आवश्यकता नाही.

**शहर अभियंता :** विरोधी पक्ष नेता यांचेकरीता खरेदी करण्यात आलेली कार कोणत्या प्रकारची आहे हे सांगता येत नाही.

**मा.आयुक्त :** विरोधी पक्ष नेता यांच्याकरीता खरेदी करण्यात आलेली कार कोणत्या प्रकारची आहे याबाबत फक्त कंपनीच खुलासा करू शकेल किंवा एखाद्या यांत्रिक तज्ञाकडून चौकशी करून घ्यावी लागेल.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** समिती सदस्याने एखाद्या बांधकामाबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली आणि त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, सभागृहास दिशाभूल करणारे उत्तर देणे हे योग्य आहे काय ? आजही कार्तिकी लॉजचे बांधकाम चालू आहे.

**मा.सहा.संचालक :** नगर रचना  संबंधित कामाचे मालक नाला ट्रेनिंग काम करत असून मुख्य इमारतीचे काम चालू नाही. नाला ट्रेनिंग काम पूर्ण झाले असल्यामुळे काढून घेतलेली बांधकाम परवानगी पुर्ववत करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

**मा.श्री.मोतीराम घडामोडे :** आणखीही काम जोरात चालू आहे. दररोज या कामात झपाटयाने वाढ होत आहे आणि या बेकायदेशीर प्रकरणी सदस्य कार्यवाहीची मागणी करत असतांना संबंधित इसम प्रशासनाच्या डोळयात धूळ फेकून काम करत आहे हे योग्य नाही.

**मा.सभापती :** मा. आयुक्त यांनी या प्रकरणी जातीने लक्ष घालून न्यायालयाचा आदेश असूनही काम होत असेल तर त्यावर योग्य कार्यवाही करावी.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** यापूर्वीच्या सभेत रसवंतीची परवानगी घेवून बेकादेशीरपणे हॉटेल सुरू करण्यात आले हॉटेल अंबर प्रकरणी लक्ष घालण्याचे सूचित केले होते. पण त्यावर अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही याचा अर्थ कार्यालय बेकायदेशीर कृत्यांना पाठीशी घालत आहे.

**मा.आयुक्त :** नारळी बाग हा भाग विकास आराखडयात खेळाचे मैदान, उद्यान यासाठी आरक्षीत करण्यांत आला आहे. हॉटेल अंबर ही देखील हयाच परिसरात समाविष्ट आहे या आरक्षणाचे विकासाचे वेळी तेथील सर्व बेकायदेशीर बांधकामे काढून टाकण्यांत येणार आहे.

**मा.श्री.यादव अशोक सायन्ना :** वाहन क्र.एम.एच.पी.३८०३ च्या बीलाची चौकशीचे काय झाले याचा खुलासा करण्यात यावा.

**मा.आयुक्त :** शहर अभियता यांनी सभासदांच्या मागणीनुसार एमएचबी ३८०३ च्या बीलाबाबत चौकशी करून अहवाल द्यावा.

**शहर अभियंता :** याबाबत सर्व फाईल्स माझ्याकडे जमा केल्या आहेत Fire stan. मेकॅनिक श्री.जाधव यांचे स्टेटमेंट घेणे बाकी आहे असा खुलासा शहर अभियंता यांनी केला.

**मा.श्री.अलफ खॉ हुसेन खॉ :** माझ्या माहितीप्रमाणे नगररचना विभागातर्फे देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीची एक प्रत संबंधित झोन कार्यालयाचे माहितीसाठी देण्यात येते. पण या विभागाकडून त्या बाबीकडे लक्ष दिले जात नाही.

**मा.श्री.स.अ.एकबालोद्दीन :** पशुधन विकास विभागातर्फे जनावरांचे गणनेबाबत शिक्षकांना आदेश देण्यात आले आहेत. तसेच वसंतभवनजवळील खिंवसरा कन्स्ट्रक्शन यांनी फक्त तीन मजल्याची बांधकाम परवानगी घेतली आहे व प्रत्यक्षात पाच मजली इमारत तयार झाली आहे. या विषयी काय कार्यवाही केली.

**मा.आयुक्त :** गणंना करणे हे शासकीय काम असून प्रशासनाचे अधिकारातील असल्यामुळे हा प्रश्न सभागृहात उपस्थित करणे योग्य नाही.

**मा.श्री.मोतीराम घडामोडे :** गोकूळवाडी औरंगपूरा येथील रहिवासी श्री.दादाराव इंगळे व सौ जीजा इंगळे यांनी मनपातर्फे घर दुरूस्तीची परवानगी घेवून दुसऱ्या मजल्याचे बांधकाम केले आहे. त्यामुळे त्यांचे बाजूला असलेल्या माझे घराचे वापरात गैरसोय निर्माण झाल्याची तक्रार श्री.आबाराव इंगळे यांनी केली आहे. तेव्हा या प्रकरणी योग्य कार्यवाही व्हावी. सर्वानुमते असे ठरले कि कार्यवाही पुढच्या मिटींगमध्ये करण्यात यावी.

**मा.श्री.अलफखॉ हुसेन खॉ :** माझ्या माहितीप्रमाणे नगररचना विभागातर्फे देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीची एक प्रत संबंधित झोन कार्यालयाचे माहितीसाठी देण्यात येते. पण या विभागाकडून त्या बाबीकडे लक्ष दिले जात नाही.

**ठराव :**

दिनांक १२.४.८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०८६:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, पडेगांव ते एम.एस.इ.बी. स्लाटर हाऊस पर्यंत २० मी.मी. जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.२,३२,३००/- चे सन १९८९-९० च्या सां.बां. खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे. तरी सदरील खर्च भांडवली रस्ते या सदरा खाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगांव ते एम.एस.इ.बी. स्लाटर हाऊस पर्यंत २० मी.मी. जाडीचे मिक्स सिल सरफेसिंग करणे कामासाठी रक्कम रू.२,३२,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०८७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, जमालबाबा दर्गा, कबाडीपूरा येथील पुलाची उंची वाढविणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.२०,४००/- यचे सन १९८९-९० च्या सां.बा. खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जमालबाबा दर्गा, कबाडीपूरा येथील पुलाची उंची वाढविणे बाबतच्या कामासाठी र.रू.२०,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच स.सभासद श्री.स.अ.एकबालोद्दीन यांचे मागणीनुसार कामाची तातडी लक्षात घेता सदरील काम "ए-१" वर करून घेण्यात यावे असे ठरले.

**विषय क्र.१०८८ :**

जलनि:सारण अभिंयता (२) यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, वार्ड क्र.५३ मो.बनेवाडी येथील जालाननगर (डेक्कन फलोअर मिलचे पाठीमागे) या मंजुर रेखांकनामध्ये २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.३,१०,९४७/- चे तयार करण्यात आलेले आहे. करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव.

**संवाद :**

**मा.श्री.अलफखॉ हुसेन खॉ :** ज्या लेआऊट धारकाने विकास खर्चाची संपूर्ण रक्कम कार्यालयात जमा केली आहे अशाच ले आऊट मध्ये विकासाची कामे हाती घेण्यात यावी.

**मा.आयुक्त :** स.सभासदांची सूचना योग्य आहे त्यासाठी विकास खर्चाची १००% रक्कम जमा केल्याशिवाय त्या भागात विकासाची कामे हाती घेण्यात येवू नये असा ठराव करावा लागेल.

**मा.श्री.अलफखॉ हुसेन खॉ :** १००% विकास खर्चाची रक्कम भरल्यानंतर विकास कामे हाती घेण्याबाबतचा ठराव घेतलयास शहराचा विकास होणार नाही. ही बाब लक्षात घेण्याबाबतचा ठराव घेतल्यास शहराचा विकास होणार नाही. ही बाब लक्षात घेता लेआऊट धारकाने विकास खर्चापोटी कार्यालयात जमा केलेल्या रक्कमेपर्यंतच त्या भागात विकास कामे (रस्ते,ड्रेनेज,पाणीपुरवठा,लाईट इ.) करण्यात यावीत. जमा असलेल्या विकास खर्चाच्या रक्कमेपेक्षा जास्त खर्च होणार नाही या बाबत सहा. संचालक नगर रचना यांनी खबरदारी घ्यावी.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जलनि:सारण अभियंता -२ यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे वार्ड क्र.५३ मो. बनेवाडी येथील जालाननगर (डेक्कन फ्लोअर मीलचे पाठीमागे) या मंजुरा रेखांकनामध्ये २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. व १५० मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रू.३,१०,९४७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०८९ :**

वार्ड क्र. ( ) मो.बुढीलेन नवी बस्तीमध्ये श्री.बनकर यांच्या घराजवळ १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रू.२९,६५०/- चे तयार करण्यात

आले असून सदर काम अत्यंत तातडीचे असल्याने सदर कामाची निविदा सुचना क्र.मनपा/युजीडी/२८०/८९ दिनांक १०.३.८९ द्वारे अ-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विकण्यात आल्या असून तिन्ही निविदा वसुल झालेल्या आहेत व दर खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | शेख इकबाल अहेमद | ०.०१% कमी |
| २) | सईद खान | ५% जास्त |
| ३) | अन्सारी जी.एम. | ४.५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री.शे.इकबाल अहमद यांचे दरापत्रक आहे. करिता मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुढीलेन लाईन नवी वस्तीमध्ये श्री.बनकर यांच्या घराजवळ १५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराचे श्री. शे.इकबाल अहमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०९० :**

वार्ड क्र.१३ मो.उमराव कॉलनी जवळ गणेश कॉलनी येथे १५० मी.मी.व्यासाची ड्रनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र.रू.१,३८,२२२/- चे तयार करण्यात आले आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.उमराव कॉलनी गणेश कॉलनी येथे १५० मी.मी. व्यासाची ड्रनेज लाईन टाकणे करिता र.रू.१,३८,२२२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०९१:**

दिनांक ११.१.१९८९ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत विषय क्र.७५९ प्रमाणे जकात विभागासाठी एम.एम.५४० फायबर ग्लास बॉडीची जीप खरेदी करण्यासाठी रू.१,६४,०००/- चे अदांजपत्रकास मंजुरी मिळाली होती. परंतु सदरील जीपच्या किंमतीत तसेच एक्साईजमध्ये वाढ झाल्यामुळे मे.भारत ऑटो स्टोअर्स, औरंगाबाद जे महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. त्यांचेकडून र.रू.१,८०,२९९/- चे दरपत्रक आहे आहे. तरी स्थायी समितीची हया वाढीव किंमतीस मान्यता मिळेल हया आशेवर व ते वाहन आवश्यक असल्यामुळे खरेदी केलेले आहे.

तरी मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जकात विभागासाठी आवश्यक असलेल्या एम.एम.५४० फायबर ग्लॉस बॉडीची जीप खरेदी करण्यासाठी वाढीव रक्कम रू.१,८०,२९९/- च्या दरपत्रकास तसेच सदर जीपच्या खरेदीस कार्योत्तर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०९२:**

समर्थनगर मंजुर रेखांकनात सर्व भुखंडाच्या मागील बाजूस १५ फुट रूंदीची गल्ली मैला व घाण वाहून नेण्यासाठी ठेवण्यात आलेली होती. आता सदरील भागात भूमिगत जलनिःसारण वाहिनी उपलब्ध असल्याने सदरील गल्लीचे प्रयोजन नाही. तरी दोन्ही बाजूंच्या भूखंडधारकांना निम्मी गल्ली ७-६" X ५० क्षेत्राची रक्कम रू.१८४८/- जमा करून घेवून बांधकामासाठी चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यासाठी व त्या गल्लीचा केवळ सामाजिक अंतर म्हणून उपयोग करण्यासाठी वाढवून देण्यात यावी. हया गल्लीच्या जागेवर कोणत्याही बांधकामाला परवानगी दिली जाणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर मंजुर रेखांकनात भूमिगत जलनिःसारण वाहिनी उपलब्ध करून दिल्यामुळे या मंजुरा रेखांकनाच्या मागील बजूस मैला व घाण वाहून नेण्यासाठी ठेवण्यात आलेल्या १५ फुट रूंदीच्या गललीच्या प्रयोजनाची आवश्यकता भासन नसल्यामुळे अशा १५ फुट रूंदीच्या गल्लीचे दोन्ही बाजुच्या भुखंड धारकांना त्या गल्लीचे ७-६" X ५० क्षेत्राचे चटई क्षेत्र रक्कम रू.१८४८/- जमा करून घेवून चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यासाठी व त्या गल्लीचा केवळ सामाजिक अंतर म्हणून उपयोग करण्यासाठी वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

हया गल्लीच्या जागेवर भूखंड धारकांना बांधकाम परवानगी दिली जाणार नाही असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१०९३:**

**ज**लनिःस्सारण अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, सन १९८९-९० वर्षाकरीता झोन क्र.१,२,३ आणि ४,६ करीता बांबु आणि सुतळी यांचा पुरवठा करणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.५१,१५०/- चे तयार करण्यात आले आहे. करीता अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९८९-९० वर्षाकरीता झोन क्र.१,२,३ आणि ४,६ करीता बांबु आणि सुतळी यांचा पुरवठा करणेच्या कामासाठी र.रू.५१,१५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०९४ :**

स्थायी समिती प्रस्ताव क्र.७३५ दिनांक २८.१२.८८ अन्वये वार्ड क्र.१ भावसिंगपूरा येथे अर्धगोलाकार गटारीचे काम करणेसाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराचे श्री.संजय पंडीतराव सर्वदे यांचे दरपत्रकास अनवधानाने मंजुरी देण्यात आली आहे. सदरचे प्रकरणात कार्यकारी अभियंता यांनी अभिप्राय दिला आहे कि, सदरचे दर योग्य नाही अशाने कामाचा दर्जा घसरण्याची शक्यता आहे. तेव्हा द्वितीय क्रमांकाची श्री.पी.जे.तमखाने हयांची तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५५% कमी दराचे सर्वात कमी दराचे दरपत्रकास मंजुरी देण्यात यावी.. तद्अनुषंगाने गुत्तेदार श्री.पी.जे.तमखाने हयांचे तूलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५५% कमी दराचे दरपत्रकास मंजुरी देण्यात यावी. तद्अनुषंगाने गुत्तेदार श्री.पी.जे.तमखाने हयांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात द्वितीय व

अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५५% कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. असा दुरूस्त प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ भावसिंगपूरा येथे अर्धगोलाकार गटारीचे काम करणेसाठी २०% कमी दराचे दरपत्रधारक श्री.संजय पंडीतराव सर्वदे यांचे दरपत्रकाबाबत कार्यकारी अभियंता यांनी "सदरचे दर योग्य नाहीत अशाने कामाचा दर्जा घसरण्याची शक्यता आहे" असा अभिप्राय दिल्यामुळे सदरील प्रकरणात द्वितीय क्रमांकाची तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५५% कमी दराची श्री.पी.जे.तमखाने यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.१०९५ :**

सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला कि, कु.सय्यदा कौसर यांची नियुक्त शिवणकाम शिक्षिका (उर्दु) म्हणून शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत दिनांक ११.८.८८पासून वेतनश्रेणी रू.२९०-५४० वर करण्यात आली आहे. त्यांच्या सेवेस सहा महिन्याचा कालावधी दिनांक १०.२.८९ रोजी संपला आहे. करीता कु.सय्यदा कौसर यांच्या सेवेत मुदतवाढ देण्याबाबद प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.आयुक्त :** मु.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये महापालिका आयुक्तांना सहा महिन्यापर्यंत तात्पुरती नेमणूक करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार संबंधिताची नेमणूक करण्यात आली होती. आता पुन्हा सहा महिने वाढ करण्यात आली हा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवण्यासाठी ठेवण्यात आला आहे.

**मा.श्री.स.हुसेन स.अहमद :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्या सहा महिन्याचा कालावधी वाढवून देण्यात यावे व त्यानंतर कायम नेमणूक देण्यात यावी.

**मा.श्री.मोरश्वर सावे :** प्रशासनानेयापुर्वी सहा महिन्याची नेमणूक दिलेली आहे. त्यानंतर पुन्हा सहा महिने मुदतवाढ देण्याचा अधिकार स्थायी समितीस नाही. तेव्हा या प्रकरणी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :** नियमाप्रमाणे स्थायी समिती सहा महिन्याची मुदतवाढ देवू शकते.

**मा.श्री.मोरश्वर सावे :** स्थायी समितीला मुदतवाढ देण्याचे अधिकार नसल्याने या ठरावाबाबत आक्षेप नोंदविण्यात यावा.

**ठराव :**

प्रशासनाने यापूर्वी सहा महिन्याची नुमणूक दिलेली आहे. त्यानंतर पुन्हा सहा महिने मुदतवाढ देण्याच्या अधिकारी स्थायी समितीस नाही. तेव्हा या प्रकरणी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. असा आक्षेप स.सभासद श्री.मोरेश्वर सावे यांनी नोंदविला. यावर खुलासा करतांना मा. आयुक्त म्हणाले कि, नियमाप्रमाणे स्थायी समिती सहा महिन्याची मुदतवाढ देवू शकते.

यानंतर कु.सय्यदा कौसर हयांची रू.२९० ते ५४० हया वेतनश्रेणीत करण्यात आलेल्या शिवणकला शिक्षिका (उर्दु ) नियुक्तीची मुदत दिनांक १०.२.८९ रोजी संपल्याने कु.सय्यदा कौसर हयांना मुदतवाढ देण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०९६ :**

सहाय्यक आयुक्त -२ यांनी प्रस्ताव दिला आहे कि, मोंढा शहागंज मार्केट रेल्वेस्टेशन वार्ड व एस.टी.स्टँड ,हॉटले इत्यादी जागी त्यांचे व्यवसायापासून टाकवू माल,कचरा,घाण इ. तयार होते व ते महानगरपालिकेस साफ करावे लागते, उचलावे लागते. शहरात सफाई कर्मचारी कमी आहे. शहराची सफाई व वरील बाबींचीही सफाई कामगारांस करावी लागते.शहागंज भाजीमंडई ,मोंढा,मार्केट ,हॉटेल एस.टी.स्टँड, रेल्वे गार्ड पासून महानगरपालिका कोणताच कर वसूल करीत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १३७ प्रमाणे मा. आयुक्त यांना स्थायी समिती मान्य करीत अशा विशेष दराने कर निश्चित करता येतो.

प्रस्तुत कलमाखाली आयुक्त यांनी सदर कर खालील दराने लावण्याचे प्रस्तावित केले आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मोंढा व शहागंज भाजीमंडई | रू.४,५०,०००/-प्र.वर्ष |
| २ | रेल्वे यार्ड | रू.१,२०,०००/-प्र.वर्ष |
| ३ | एस.टी.स्टँड | रू. ६०,०००/- प्र.वर्ष |
| ४ | हॉटेल्स | |
| १ | मोठे हॉटेल्स | रू. ६,०००/- प्र.वर्ष |
| २ | मध्यम हॉटेल/हॉस्पीटल/थिएटर | रू. २,४००/- प्र.वर्ष |
| ३ | लहान हॉटेल | रू. १,२००/- प्र.वर्ष |
| ४ | टपरी | रू. ३६०/- प्र.वर्ष |

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.श्री.मोरश्वर सावे :** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.१ ते ३ पर्यंत लावलेला कर योग्य वाटतो. अ.क्र.४ चे व्यवसायिक मालमत्ता कर भरत असल्यामुळे त्यांचेबाबत योग्य विचार व्हावा. शहरात बऱ्याच टपऱ्या विनापरवाना आहेत. त्यांना हा टॅक्स लागू केला म्हणजे त्या कायम झाल्या असा त्याचा अर्थ होईल याचाही विचार करण्यात यावा.

**मा.आयुक्तः** सभासदांची दुसरी सूचना योग्य आहे, अशा टपऱ्यांना रेग्युलाईज करून परवाना देता येईल काय याचा विचार केला जाईल.

**मा.श्री.अलफ खॉ हुसेन खॅा :** शहरात बऱ्याच ठिकाणचे टपऱ्यामधून सायकल दुरूस्ती, बेकरी, स्टोव्ह मशीन दुरूस्ती असे छोटे छोटे उद्योग चालतात त्यांच्याकडून हा कर वसुल केला जाईल का ? याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** शहरातील ज्या टपरीधारकांकडून टाकण्यात आलेली घाण मनपाला उचलून न्यावी लागते अशा कायदेशीर टपरीधारकांडून हा कर वसूल करण्यात येईल.

**श्री.गाढे :** हातगाडया संध्याकाळी लावल्या जातात त्यांना टॅक्स लावण्यात यावा. corpn. चे जागेवर असेल तर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज भाजी मंडई, मोंढा मार्केट, हॉटेल्स, एस.टी.स्टँड, रेल्वे यार्ड इत्यादी जागी त्यांचे व्यवसायापासून तयार होणारा टाकाऊ माल, कचरा, घाण इ. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना साफ करावी लागत असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३७ अन्वये खालील दर्शविल्याप्रमाणे विशेष दराने कर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) | मोढा व शहागंज भाजीमंडई | रू.४,५०,०००/- प्र.वर्ष |
| २) | रेल्वे यार्ड | रू.१,२०,०००/- प्र.वर्ष |
| ३) | एस.टी.स्टँड | रू. ६०,०००/- प्र.वर्ष |
| ४) | हॉटेल्स | |
| | १) मोठे हॉटेल्स | रू. ६,०००/-प्र.वर्ष |
| | २ )मध्यम हॉटेल/हॉस्पीटल/थिअटर | रू. २,४००/- प्र.वर्ष |
| | ३) लहान हॉटेल टपरी/रसवंत/ज्युसबार इ. | रू. १,२००/- प्र.वर्ष |
| | ४)टपरी | रू. ३६०/- प्र.वर्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०९७ :**

शहर अभिंयता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, टाऊनहॉल येथील सर्वसाधारण सभागृह व स्थायी समिती सभागृह यामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे दान वॉटर कुलर बसवावयाचे आहेत.

सदरील कामाकरीता सा.बां. विभागाचे विद्युत विभागाचे दर सूचीप्रमाणे अंदाजपत्रक र.रू.२९,७४०/- (रूपये एकोणतीस हजार सातशे चाळीस फक्त) चे बसविण्यात आलेले आहेत. सदरील खर्च हा सामान्य प्रशासन विभागासाठी फर्निचर व इतर साहित्य खरेदी या शिर्षाखाली करण्यात येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद:**

**मा.श्री.स.अहमद एकबोलोद्दीन :** प्रशासकाचे काळात दोन वाटर कुलर घेण्यात आले ते सध्या कुठे आहेत याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता (यांत्रिकी) :** प्रशासकाचे काळात खरेदी करण्यात आलेल्या दाने वाटरकुलर पैकी एक वाचनालयात असून नादुरूस्त झालेले दुसरे यांत्रिकी कार्यशाळेत आहेत. प्रत्येक वर्षी जून महिन्यात डेडस्टाक रजिस्टरची तपासणी शहर अभिंयता यांनी करीत जावे. असे मा. आयुक्तांनी सूचित केले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल येथील सर्वसाधारण सभागृह व स्थायी समिती सभागृह यामध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे दोन वॉटर कुलर बसविण्याकरीता रक्कम रू.२९,७४०/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१०९८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे कि, (मा.आयुक्त यांचे आदेशानुसार )भावसिंगपूरा गांव येथे जाण्याकरीता भिमनगर वस्तीजवळ असलेल्या प्रस्तुतच्या पुलाची उंची वाढविणे आवश्यक आहे. कारण पावसाळयात बऱ्याच वेळा या पुलावरून पाणी वाहत

असल्याकारणाने वाहनांची रहदारी व नागरीकांना जाण्यायेण्याकरीता अडथळा येतो. करीता प्रस्तुतचा पुल काढून टाकून त्या ठिकाणी हाय लेबल आर.सी.स्लॅब पुल बांधण्याचे अंदाजपत्रक र.रू.३,९४,५००/- (सन ८८-८९ च्या डी.एस.आर.प्रमाणे ) तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च भांडवली रस्ते या सदरातून करण्यात येईल. विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** जिल्हा परिषद रोडवरील सरस्वतीभुवन येथील पुल आणि रेल्वेस्टेशन रोडवरील आर.टी.ओ. ऑफिसजवळील पुलाचे कामाबाबत मंजुरी देण्यात येऊनही अद्याप काम पूर्ण झालेले नाही. औरंगपूरा पुलाचे कामाचा कोनशिला समारंभही पार पडला पण काम झाले नाही.

**शहर अभियंता :** ६० चे पाउडेशन मिळत नाही या कामाचा पाठपुरवा करून काम पूर्ण करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भावसिंगपूरा गांव येथे जाण्याकरीता भिमनगर वस्तीजवळ असलेल्या प्रस्तुतच्या पुलाची उंची वाढविणे आवश्यक असल्या कारणाने प्रस्तुतचा पुल काढून त्या ठिकाणी हाय लेबल आर.सी.स्लॅब पुल बांधण्याचे कामासाठी र.रू.३,९४,५००/- (च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.)

**विषय क्र.१०९९ :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.४ मो.घाटी येथील सार्वजनिक प्रार्थना स्थळाभोवती अतिक्रमणे हात असल्यामुळे त्या ठिकाणी ओटा बांधणे आवश्यक आहे. त्याकरीता अंदाजपत्रक रक्कम रू.२२,५००/- चे तयार करण्यात आले असून काम "अ-१" नमुन्यावर उपलब्ध गुत्तेदार श्री.प्रकाश गायकवाड यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने करवून घेण्यास प्रस्ताव मुंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४ मो.घाटी येथील सार्वजनिक प्रार्थना स्थळाभोवती अतिक्रमणे हात असल्यामुळे त्या ठिकाणी ओटा बांधणेच्या कामाकरीता रू.रू.२२,५००/-च्या अंदाजपत्रकास तसेच कामाची तातडी लक्षात घेता सदरील काम "अ-१" नमुन्यावर उपलब्ध गुत्तेदार श्री.प्रकाश गायकवाड यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.११०० :**

उप अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला कि, वार्ड क्र.७ मोहल्ला रोझाबाग येथे खडी रस्त्यास डांबरीकरण करण्याकरीता अंदाजपत्रक र.रू.५०,७००/- चे तयार करण्यात आले असून प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७ मोहल्ला रोझाबाग येथे खडी रस्त्यास डांबरीकरण करण्याकरीता उपअभियंता (स्लम) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे र.रू.५०,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११०१ :**

कै.पंडित जवाहरलाल नेहरू (पहिले पंतप्रधान) यांच्या जन्मशताब्दी निमित्त यावर्षी १ मे ८९ रोजी "भारतीयम " विविध क्रिडा प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम शिवाजी मैदानावर आयोजित केला आहे. त्यात महानगरपालिकेच्या एकूण ४ शाळोतील ३०० ते ३५० मुले-मुली फ्रि प्ले,रींग,क्युब ड्रिल, लेझीम, पोलरिबन,दोरी रिदमिक जिम्नॅस्टिक इ.विविध प्रकारात भाग घेतील. क्रिडा साहित्य खरेदी व खेळाडूंचे गणवेश याकरीता इतर स्पर्धा योजनेमधून अंदाजे रू.१०,०००/- (दहा हाजर) खर्चास मंजुरी मिळावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कै.पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मशताब्दी निमित्त १ मे.८९ रोजी "भारतीयम" विविध क्रिडा प्रात्यक्षिकांच्या कार्यक्रमासाठी क्रिडा साहित्य खरेदी व खेळाडूंचे गणवेश याकरीता रक्कम रू.१०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.११०२ :**

मो.देवडीबाजार येथील गटारीची दुरूस्ती करणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.३७,८३०/- चे तयार करण्यात आले असून सदर काम अत्यंत तातडीचे असल्याने सदर कामाची निविदा सूचना क्र.मनपा/युजिडी/२८०/८९ दिनांक १०.३.८९ द्वारे "अ-१" नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. दर खालीलप्रमाणे आहेत.

१) अेस के रफिक ५% जास्त

२) अन्सारी जी.एम. ४.५% जास्त

३) अब्दुल सलाम ०.१% कमी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री. अब्दुल सलाम यांचे दरपत्रक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.देवडीबाजार येथील गटारीची दुरूस्ती करणेच्या कामासाठी र.रू.३७,८३०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम तातडीचे असल्यामुळे "अ-१" नमुन्यात प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. अब्दुल सलाम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.११०३ :**

वार्ड क्र. मो.दलालवाडी सादिया सिनेमाच्या पाठीमागे ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबतचे अंदाजपत्रक र.रू.५१,७००/- चे तयार करण्यात आले आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.दलालवाडी सादिया सिनेमाच्या पाठीमागे ३०० मी.मी. व्यसाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रू.५१,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.११०४ :**

रमानगर वार्ड क्र.४९ येथील समाज मंदिराचे बांधकाम करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९८८-८९ चे डी.एस.आर.दराने र.रू.१,३६,७००/- चे अदांजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील खर्च भांडवली इमारती या सदराखाली करण्यात येईल.

विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रमानगर वार्ड क्र.४९ येथील समाज मंदिराचे बांधाकाम करणेच्या कामासाठी र.रू.१,३६,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.